# समर्थकृपेचीं वचनें

## तो हा दासबोध

(श्रीदासबोध प्रवचने – स्वामी माधवनाथ)

पुष्प पहिले

डॉ. सुषमा वाटवे

मूल्य २०/- रु.

# प्रकाशकाचे निवेदन

परमहंस सद्‌गुरु स्वामी माधवनाथांची आज्ञा व स्वामीभक्तांची इच्छा याचे फलस्वरूप म्हणजे हे नव्याने प्रकाशित होणारे छोटे छोटे ग्रंथ. स्वामीजींचे विचारधन ग्रंथरूपाने साधकांच्या हाती देण्याचा संकल्प सुटला. 'सत्यसंकल्पाचा दाता भगवंत' त्या संकल्पानुसार जे ग्रंथ प्रकाशित झाले त्यातील आजचे हे **चौथे प्रकाशन**. यासाठी असंख्य परमार्थप्रेमी मंडळींकडून सर्व प्रकारचे सहकार्य अंतःकरणपूर्वक प्राप्त होत आहे. विशेषतः आर्थिक सहकार्य, प्रकाशित ग्रंथांचा प्रचार, प्रसार सर्वच बाबतीत अनेक मंडळी उत्स्फूर्तपणे आपला सहकार्याचा हात पुढे करीत आहेत. त्यामुळेच 'ना नफा ना तोटा' या भूमिकेने गेल्या सहा आठ महिन्यात तीन ग्रंथ प्रकाशित झाले. **आजचा हा चौथा छोटा ग्रंथ 'समर्थकृपेचीं वचने'.**

# द्वितीय आवृत्ती

'समर्थकृपेची वचनें' पुष्प १ या ग्रंथाला परमार्थप्रेमी वाचकांचा-साधकांचा, विशेषतः श्रीदासबोधप्रेमी समर्थभक्तांचा प्रतिसाद फारच चांगला लाभला. त्यामुळे याची पहिली आवृत्ती लवकरच संपली. अनेकांकडून ग्रंथांची मागणी येत होती. तथापि द्वितीय आवृत्ती काढायला थोडा विलंब लागला. आता ही द्वितीय आवृत्ती वाचकांसाठी छापून झाली आहे. या ग्रंथछपाईच्या कामीही अनेकांचे आर्थिक सहकार्य लाभले. त्यामुळे अल्पमूल्यात हा ग्रंथ तयार करण्यात आला आहे. सहकार्याबद्दल सर्वांना धन्यवाद.

**स्वामी माधवनाथ साहित्य प्रकाशन**

---

**प्रकाशक :**
डॉ. सुषमा वाटवे
**स्वामी माधवनाथ साहित्य प्रकाशन**
१०२०, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ,
श्रीलक्ष्मीगुरुकृपा अपार्टमेंट,
पुणे ४११०३०. दूरध्वनि : २४४७६४४२
**प्रथमावृत्ति :**
स्वामी स्वरूपानंद जयंति दिन
१५ डिसेंबर १९९७
**द्वितीयावृत्ति :**
गुरुपौर्णिमा, २ जुलै २००४

**मुद्रक :**
मा. वि. दात्ये
गणेश प्रिंटर्स
६९३ बुधवार पेठ, पुणे ४११ ००२.
दूरध्वनि : २४४५११४४
फॅक्स : (०२०)२४४५११०९
प्रकाशन : चौथे
**© सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन**

**ग्रंथप्राप्तीस्थळे**

**स्वामी माधवनाथ साहित्य प्रकाशन**
१०२०, सदाशिव पेठ, नागनाथ पाराजवळ,
श्रीलक्ष्मीगुरुकृपा अपार्टमेंट,
पुणे ४११०३०. दूरध्वनि : २४४७६४४२

**डॉ. ललिता नाडकर्णी**
१०११/१४ 'विश्वगंगा' मित्र को-ऑप. सोसायटी,
दीप बंगला चौकाजवळ, शिवाजीनगर, पुणे १६.
दूरध्वनि : २५५३५०४३

# प्रास्ताविक

"ज्ञानेश्वरीवर तुम्ही प्रवचने करीत आहात. त्याचबरोबर दासबोध हा ग्रंथही तुम्ही लोकांना समजावून सांगावा असे मला वाटते." परिव्राजकाचार्य सद्‌गुरु श्रीधरस्वामी महाराज यांचा स्वप्नदृष्टांत स्वामी माधवनाथांना झाला आणि दासबोधावर प्रवचने करण्याचा विचार स्वामी माधवनाथांनी निश्चित केला. इ. स. १९७९ पासून समर्थभक्त श्रीमती अंबूताई गद्रे यांच्या 'मातृस्मृति' ग्रंथालयात स्वामीजींनी दासबोध प्रवचनास प्रारंभ केला. त्याच वास्तूत त्यापूर्वी दर सोमवारी ज्ञानेश्वरी प्रवचने स्वामीजी करत असत. पसायदानावरील निरूपण संपले आणि दासबोध प्रवचनास प्रारंभ झाला. दहा बारा वर्षे ज्ञानेश्वरी ऐकलेले, ध्याननामादि साधना करणारे, बहुसंख्य अनुगृहीत श्रोते प्रवचनाला उपस्थित असत. त्यामुळे प्रवचने खूपच रंगत. प्रवचनात प्रामुख्याने साधनेवर भर दिला जात असल्याने साधकांना पारमार्थिक प्रगती साधण्याचे दृष्टीने प्रवचनांचा खूपच लाभ होत असे. दासबोधातील काही निवडक समास स्वामीजी प्रवचनासाठी घेत. दासबोध हा स्वामीजींचा आवडता ग्रंथ. वयाच्या पंचविशीत हातात आलेला, नित्य वाचनात असलेला ग्रंथ आणि त्यानुसार आचरण करून प्रपंचच परमार्थरूप केलेले स्वानुभूतिसंपन्न वक्ते स्वामीजी प्रवचन करीत असत. त्यावेळी ज्ञानेश्वरी आणि दासबोध दोन्ही ग्रंथांवर प्रवचने सुरू होती. त्यामुळे दोन्ही ग्रंथांची भाषा, मांडण्याची पद्धत थोडी भिन्न असली तरी ज्ञानदेव आणि समर्थ दोघांचे विचार कसे एकच आहेत हे स्वामीजी दोन्ही ग्रंथातील ओव्या उद्‌धृत करून सांगत असत. हळूहळू श्रोत्यांची गर्दी एवढी वाढली की प्रवचने त्या वास्तूमधून हलवून 'सत्यसाई निलयम्' या ले. कर्नल सोमण यांच्या वास्तूत सुरू झाली. हा प्रवचनांचा उपक्रम जवळजवळ बारा वर्षे – एक तप चालू होता. या कालावधीत पांचशेवर प्रवचने झाली. पहिल्या ओवीपासून ते आठव्या दशकातील काही ओव्यांपर्यंत निरूपण झाले. सर्व प्रवचने ध्वनिफितीवर घेतली गेली. स्वामीजी वर्षातून एक दोन वेळा परगावी जात. त्यावेळीही त्या गावी ज्ञानेश्वरी, दासबोध दोन्हीवर प्रवचने करीत. त्यातील वेगवेगळ्या विषयांवर झालेली प्रवचने या ग्रंथात संकलित केली आहेत. वाचकांना ती

आवडतील, साधनेच्या दृष्टीने त्यांचा उपयोग होईल असा विश्वास वाटतो. वाचकांनी आपल्या प्रतिक्रिया कळविल्यास नवीन ग्रंथ काढण्यास उत्साह येईल. श्री समर्थांच्या आणि स्वामी माधवनाथांच्या कृपाशीर्वादाने हाती घेतलेले काम पूर्ण झाले याचा आनंद वाटतो.

**सुषमा वाटवे**

## श्रीदासबोध प्रवचनापूर्वीची प्रार्थना

श्रीरामचंद्रा करुणासमुद्रा ।
ध्यातो तुझी राजस योगमुद्रा ॥
नेत्रीं न ये रे तुजवीण निद्रा ।
कैं भेटसी बा मजला सुभद्रा ॥

शुकासारिखें पूर्ण वैराग्य ज्याचें ।
वसिष्ठापरी ज्ञान योगेश्वराचें ।
कवी वाल्मिकासारिखा मान्य ऐसा ।
नमस्कार माझा सद्गुरु रामदासा ॥

मला वाटतें अंतरीं त्वां वसावें ।
तुझ्या दासबोधासि त्वां बोधवावें ॥
अपत्यापरी पाजवी प्रेमग्रासा ।
महाराजया सद्गुरु रामदासा ॥

जय जय रघुवीर समर्थ

# श्रीसमर्थ रामदासस्वामी

## जीवनदर्शन

श्रीसमर्थांचा जन्म जांब गांवी शके १५३० चैत्र शुद्ध नवमीस – श्रीरामनवमीचे दिवशी माध्यान्ही झाला. त्यांचे नाव नारायण, वडिलांचे नांव सूर्याजीपंत, आई राणूबाई व आडनांव ठोसर. वयाच्या बाराव्या वर्षी शके १५४२ मध्ये विवाहप्रसंगी 'सावधान' शब्द ऐकून समर्थ लग्नमंडपातून पळाले. नाशिकजवळ गोदावरीच्या काठी टाकळी येथे त्यांनी बारा वर्षे पुरश्चरण – रामोपासना केली. वयाच्या चोविसाव्या वर्षी आत्मज्ञानसंपन्न होऊन समर्थ तीर्थयात्रेसाठी बाहेर पडले. बारा वर्षे सबंध भारतभर प्रवास करून समाजस्थितीचे सूक्ष्म अवलोकन त्यांनी केले आणि शके १५६६ मध्ये वयाच्या छत्तीसाव्या वर्षी ते कृष्णातीरी आले. अंगापूरच्या डोहामध्ये रामाच्या मूर्ती त्यांना मिळाल्या. त्या मूर्तींची स्थापना त्यांनी चाफळला केली व शके १५७० मध्ये तेथे रामनवमीचा मोठा उत्सव केला. शके १५७१ मध्ये श्री समर्थांनी शिवाजी राजांना अनुग्रह दिला. शके १५७७ मध्ये शिवाजीराजांनी आपल्या राज्याची सनद भिक्षा म्हणून श्रीसमर्थांच्या झोळीत टाकली. श्रीसमर्थांनी ती सनद तशीच शिवाजीराजांना परत केली आणि राज्याचा ध्वज भगवा करण्यास सांगितले. मध्यंतरी अकरा मारुती स्थापून अकरा मठ तयार केले. त्यावर अकरा महंतांची स्थापना केली. त्यानंतरही वेगवेगळ्या ठिकाणी मठस्थापना करून त्यावर एकेका महंताची स्थापना केली.

शके १५८१ मध्ये दासबोधाचे सहा दशक चार समास लिहून पूर्ण झाले. शके १५९६ मध्ये शिवाजीराजांचा राज्याभिषेक झाला. शके १६०१ मध्ये शिवाजीराजे सज्जनगडांवर श्रीसमर्थांच्या सान्निध्यात बरेच दिवस राहिले. शके १६०२ मध्ये शिवाजीराजांनी देह ठेवला. शके १६०३ माघ वद्य नवमीस शनिवारी दुपारी श्रीसमर्थांनी सज्जनगडावर देह ठेवला.

श्रीसमर्थ आत्मसाक्षात्कारी संत – स्वानुभवसंपन्न ब्रह्मज्ञानी पुरुष होते. विषय प्रतिपादन करताना आत्मप्रचीतीला त्यांनी सर्वोच्च महत्त्व दिले. 'मुख्य हरिकथा निरूपण' असे म्हटले. श्रीसमर्थांनी उदंड वाङ्मय निर्माण केले. दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, करुणाष्टके, सवाया, अभंग,

आरत्या, पदे, ओवीबद्ध पत्रे असे त्यांचे वाङ्मय विविध प्रकारचे आहे. श्रीसमर्थांच्या मुखातून बाहेर पडणारे शब्द त्यांचे शिष्य कल्याणस्वामी टिपून घेत असत. कल्याणस्वामींच्यामुळे श्रीसमर्थांचे वाङ्मय मराठी भाषिकांना उपलब्ध होऊ शकले असे म्हणतात.

## स्वामी माधवनाथ

### जीवन, कार्य व तत्त्वज्ञान

श्री. माधव विष्णू तथा बाळासाहेब वाकडे. जन्म १ ऑक्टोबर १९१७. कोकणातील कोकबन ही जन्मभूमी, पुणे ही कर्मभूमी. वयाच्या दहाव्या वर्षी भगवद्गीतेसारखा प्रमाण ग्रंथ हाती आला. तेव्हापासूनच भगवद्गीतेचे पठन, चिंतन, मनन व तदनुसार आचरण करण्याचा प्रयत्न सुरू झाला. इतरांपेक्षा आपले जीवन काही वेगळेच आहे याची जाणीव बालवयापासून होती. भाविक पिंड, कुशाग्र बुद्धिमत्ता, विलक्षण ईश्वरनिष्ठा, कर्तव्यनिष्ठा, जिद्द, प्रेमळपणा, विवेक यासारखे व्यावहारिक व पारमार्थिक गुण मुळातच अंगी होते. त्यात पुढे दासबोध, ज्ञानेश्वरीसारखे आदर्श ग्रंथ हाती आल्यामुळे सर्वच गुण दिवसेंदिवस वर्धिष्णु होत गेले. पित्याच्या अकाली निधनामुळे संसाराची जबाबदारी वयाच्या सतराव्या वर्षीच अंगावर पडली. सामान्यतः कोकणातील मंडळी नशीब काढण्यासाठी मुंबईला जाणे पसंत करतात. पण स्वामीजी मात्र शिक्षणाचे, संस्कृतीचे माहेरघर असलेल्या पुण्याकडे वळले आणि शेवटपर्यंत पुण्यातच राहून त्यांनी आपल्या नियोजित कार्याचा प्रचार प्रसार केला. त्यासाठी अनेक माध्यमांचा उपयोग केला. प्रवचने, सत्संग, अनुग्रह, पत्रलेखन, ग्रंथलेखन, अनेक शिष्यांसह आनंदयात्रा, बालसंस्कार केंद्रे, युवा केंद्रे, सामुहिक ध्यान वगैरे.

स्वामीजींचे नियोजित कार्य शुद्ध परमार्थाचा प्रचार आणि पारमार्थिक आचारविचारांवर अधिष्ठीत अशी सुशिक्षित, सुसंस्कृत मंडळी तयार करणे. स्वामीजींचे सद्गुरु स्वामी स्वरूपानंद, पांवस यांची माधवनाथांना तशीच आज्ञा होती. इ. स. १९६८ मध्ये स्वामी स्वरूपानंदांचा अनुग्रह प्राप्त झाल्यापासून स्वामी माधवनाथांनी

सद्‌गुरुआज्ञा शिरोधार्य मानून आपली साधना व आपले कार्य याला जीवनात प्राधान्य दिले. सद्‌गुरुकृपेने लवकरच त्यांना आत्मदर्शनाचे ध्येय गाठता आले. इ. स. १९७३ मध्ये स्वामी स्वरूपानंदांनी आपल्या नाथ संप्रदायाची जबाबदारी स्वामी माधवनाथांवर सोपवली आणि १५ ऑगस्ट १९७४ या दिवशी ते निजधामी गेले. तेव्हापासून पुढची बावीस वर्षे स्वामी माधवनाथांनी संप्रदायाची जबाबदारी उत्तम प्रकारे सांभाळली. हजारो मंडळींना अनुग्रह दिला. महाराष्ट्रात आणि महाराष्ट्राबाहेरही शिष्यवर्ग तयार करून परमार्थ प्रचाराचे कार्य पुढे चालू रहावे अशी योजना आखली. त्याप्रमाणे कार्य चालू आहे. शके १९१८ गुरुपौर्णिमा ३० जुलै १९९६ या परम पावन दिनी पुणे येथे स्वामी माधवनाथ सद्‌गुरुचरणी लीन झाले.

**तत्त्वज्ञान :**

१) प्रपंच आणि परमार्थ हे एकमेकांना पूरक असून ते एकाच वेळी साधण्याचा प्रयत्न करावा. प्रपंचच परमार्थरूप करावा.

२) आपली सर्व प्राप्त कर्तव्ये परमार्थाच्या पायावर अधिष्ठित असावीत.

३) लहानपणापासूनच पारमार्थिक संस्कार मनावर होणे आवश्यक आहे.

४) परमार्थ हा प्राधान्याने सत्त्वगुणी मंडळींचाच प्रांत आहे.

५) भगवद्‌गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी यासारख्या आदर्श ग्रंथात सांगितलेल्या पद्धतीने जीवन जगणे म्हणजे परमार्थी होणे आहे.

६) सुसंस्कृत व्यक्ति घडवणे हे संतांचे महत्त्वाचे कार्य आहे.

७) वैयक्तिक मोक्षप्राप्तीच्या साधनेबरोबरच आणखी काही मंडळींना परमार्थ साधनेची गोडी लावणे हे साधकाचे काम आहे.

८) संप्रदाय अनेक असावेत. पण सांप्रदायिक अभिनिवेश नसावा. सर्व संप्रदाय एक. सर्व सद्‌गुरु एक.

९) ठराविक साधकांना वर्षानुवर्षे मार्गदर्शन करून त्यांना परमार्थ मार्गावर स्थिर करणे हे महत्त्वाचे आहे.

१०) समाजातील सर्व संप्रदायातील सत्त्वगुणी मंडळी जर एकत्र आली तर त्या साधक विश्वातून समर्थांचे 'आनंदवनभुवना'चे, श्रीज्ञानेश्वर महाराजांचे 'अद्वयबोधपाटणा'चे स्वप्न साकार होऊ शकेल.

॥ श्रीराम ॥

माझी काया आणि वाणी । गेली म्हणाल अंतःकरणीं ।
परी मी आहें जगजीवनीं । निरंतर ॥
आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ॥
माझी काया गेली खरें । परी मी आहे जगदाकारें ।
ऐका स्वहित उत्तरें । सांगेन तीं ॥
नका करूं खटपट । पाहा माझा ग्रंथ नीट ।
तेणें सायुज्याची वाट । ठाईं पडे ॥
राहा देहाच्या विसरें । वर्तो नका वाईट बरें ।
तेणे मुक्तिचीं द्वारें । चोजवीती तुम्हांसी ॥
रामी रामदास म्हणे । सदा स्वरूपीं अनुसंधान ।
करा श्रीरामाचें ध्यान । निरंतर ॥

**श्रीसमर्थ रामदासस्वामी**

## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| १) ग्रंथा नाम दासबोध | ९ |
| २) आधीं अध्यात्मश्रवण | २१ |
| ३) आत्मनिवेदन भक्ति | ३८ |
| ४) अजपानिरूपण | ५३ |
| ५) देहातीत वस्तु आहे | ६२ |

**१. श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ ।**
**श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ॥** दा. १-१-१
**ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।**
**येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ॥** दा. १-१-२

**[स्वामी माधवनाथ यांचे श्रीक्षेत्र सज्जनगडावरील प्रवचन]**

आज या परम आनंदाच्या दिवशी रामप्रभू समोर आहेत. समर्थ समोर आहेत. परम भाग्याचा मंगल दिवस आहे. समर्थांचाच ग्रंथ आपल्या समोर आहे. ग्रंथकर्त्याला आपल्या ग्रंथाइतके काही प्रिय नसते. कारण त्या ग्रंथामध्ये सर्वच्या सर्व त्याचे विचारधन साठवलेले असते.

जेणें ज्ञान हें प्रबळे । जेणें वृत्ती हे मावळे ।
जेणें भक्तिमार्ग कळे । या नांव कवित्व ॥ दा. १४-३-४९
जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधू आटे ।
जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ॥ दा. १४-३-५०

असा हा दासबोधासारखा ग्रंथ. समर्थ स्वतः देहाने असते तरी आपल्याला त्यांचे जेवढे विचार कळू शकले नसते, तेवढे दासबोध या ग्रंथाच्या द्वारे आपल्याला कळतात. असे हे महाधन आपल्या हातात आहे म्हणून मी परम भाग्य म्हटले. समर्थांना परम आनंद आहे. कारण दासबोध ग्रंथाची पारायणे होऊ शकतात, दासबोधावर चर्चा होऊ शकते, प्रवचने होऊ शकतात. हा ग्रंथ लोकांच्या अंतःकरणात थोडा फार रुजतो आहे. यामुळे समर्थांना निश्चितच परम आनंद होत असला पाहिजे. असा हा ग्रंथराज साररूपाने आपल्या हाती आहे. एवढी वर्षे ज्ञानेश्वरीवर प्रवचने केली, करतो आहे. आता दासबोधावरही करतो. दोन्ही ग्रंथांची भाषा भिन्न असली तरी सांगण्याचा मथितार्थ एकच आहे. समर्थ, ज्ञानदेव दोघेही महापुरुष. ज्ञानदेवांनंतर चारशे वर्षांनी समर्थ झाले. ज्या दासबोधाने महाराष्ट्रभूमीला जीवनदान दिले असा हा ग्रंथ. समर्थांना अशी खात्री होती की दासबोध हा ग्रंथ समाजापुढे ठेवला असता त्यातून अशी काही मंडळी निर्माण होतील की ती जगाला सांगतील आम्ही तुम्हाला मार्ग सांगतो. जेथे तुम्ही थांबलात तेथून पुढे जाण्यासाठी, मन मजबूत

करण्यासाठी आम्ही तुम्हाला मार्ग सांगतो. ज्यायोगे सुखदुःखाने न डळमळणारे, नाना आघातांनी न खचणारे, स्तुतीनिंदेत सारखे राहणारे, लाभ अलाभ सारखे मानणारे असे समाहित मन आपल्याला निर्माण करता येईल. त्यासाठी हा ग्रंथराज लिहिला गेला आहे. नुसती पारायणे करून या कानांनी ऐकून त्या कानांनी सोडून द्यायचा असा हा ग्रंथ नाही. त्याचे श्रवण, मनन, निदिध्यास पाहिजे.

श्रवणापरीस मनन सार । मननें कळे सारासार ।
निजध्यासें साक्षात्कार । निःसंग वस्तु ।। दा. ११-१-४१
श्रवण मनन निजध्यास । प्रचितीने बाणता विश्वास ।
रोकडा साक्षात्कार सायास - । करणेंचि नलगे ।। दा. १०-९-३०

असे समर्थांचे शब्द आहेत. त्या शब्दांमध्ये जणू सर्व विश्वाची शक्ति एकरूप झालेली आहे. साऱ्या विश्वामध्ये ज्या ज्या ऋषिमुनींनी, साधुसंतांनी साधना-तपश्चर्या केली, आत्मधन मिळवले त्या प्रचंड शक्तीचा आविर्भाव दासबोधातील शब्दाशब्दामध्ये आढळून येतो.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ भगवद्गीतेवर आधारित आहे. 'शब्दाची कोर न सांडता' ज्ञानेश्वरी हा ग्रंथ ज्ञानेश्वर महाराजांनी लिहिला. जीवन उत्तुंग करण्याचा, जीवनाचे सार्थक करण्याचा मार्ग अर्जुनाला भगवंतांनी भगवद्गीतेत सांगितला. त्यातील सातशे श्लोकांना धरून मी बोलली असे ज्ञानदेव म्हणतात. काही ठिकाणी पदांचे विस्तृत विवरण ज्ञानदेवांनी केले आहे. दासबोध ग्रंथाचे स्वरुप वेगळे आहे. यात शिष्य प्रश्न विचारतात आणि सद्गुरु उत्तरे देतात, असा हा गुरुशिष्याचा संवाद आहे. दासबोध वाचल्याखेरीज जीवन कसे जगायचे हे कळू शकत नाही. महाराष्ट्रात जन्म घेऊन दासबोध, ज्ञानेश्वरी, नाथ भागवत, तुकोबांची गाथा यापैकी एकही ग्रंथ ज्याने वाचला नाही त्याचे जीवन फुकट गेले असे समजावे.

ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीत एवढी अलंकारिक भाषा वापरलेली आहे, शब्दांची एवढी कसरत केली आहे की सामान्याला तो ग्रंथ कळणे कठीण. मग ज्ञानेश्वरी फार गोड आहे एवढे ते म्हणतील. अतिशय भावाने ती वाचतील, तिची पारायणे करतील. पण त्या शब्दांच्या आत प्रवेश करून त्या शब्दांचा अर्थ पाहणारी मंडळी फारच थोडी.

समर्थांना अपेक्षित आहे ते म्हणजे शब्दात रंगून न जाता त्याचा अर्थ पहावा. त्यानुसार आचरण करावे. म्हणून दासबोधाची भाषा साधी, सरळ, थोडी खडबडीतच आहे. पण त्यातील रस इतका गोड आहे की त्यात सहजच रंगून जायला होते.

'श्रोते पुसती कोण ग्रंथ ।' हा श्रोता वक्ता संवाद आहे. समर्थांच्यापुढे कोणीतरी श्रोते असले पाहिजेत आणि त्यांनी समर्थांना प्रश्न विचारले असावेत. येथे स्वतः समर्थ वक्ता आहेत आणि श्रोते आहेत कल्याणस्वामी, उद्धवस्वामी, आक्काबाई यांच्यासारखी मंडळी. वक्त्याला वक्त्याचे गुण आणि श्रोत्याला श्रोत्याचे गुण असतील तर संवाद होणार. येथे श्रोते तयार आहेत. ज्यांनी उपनिषदे, भगवद्‌गीता, पंचदशी आदि ग्रंथांचा अभ्यास केलेला आहे, जे नित्यनेमाने दोन चार तास ध्यानाला बसत आहेत, ज्यांची वक्त्यावर निष्ठा, प्रेम, श्रद्धा आहे असे श्रोते आहेत. वक्ता सांगतो त्याप्रमाणे करण्यात आपले कल्याण आहे असे वाटले पाहिजे, तर तो श्रोता आणि तो वक्ता. श्रोता वक्ता यांचा सुसंवाद पाहिजे. श्रोता कदापि दुश्चित असता कामा नये. समर्थ म्हणतात –

विषइ लोक श्रवणीं येती । ते बायकांकडेच पाहाती ।
चोरटे लोक चोरून जाती । पादरक्षा ।। दा. १८-१०-२६

एकदा एका ठिकाणी माझे दासबोधावर प्रवचन होते. आम्ही आमची पादत्राणे खाली ठेवून त्याचा बिल्ला जवळ ठेवला होता. प्रवचन संपवून आम्ही खाली आलो तो पादत्राणे नाहीत. बिल्ला आमच्या हातात. म्हणजे ही ओवी मी प्रवचनात सांगितली ती चोराने उचलली. बहुतेक चोराला वाटले असावे की हे प्रवचनकार सज्जन दिसतात. यांच्या पादत्राणांचे अपहरण केल्याने आपले कल्याण होईल. म्हणून त्याने ती नेली असावीत. म्हणजे हा श्रोता तेथे कशाकरता आला होता?

चांगला श्रोता होणे ही परमार्थातील पहिली महत्त्वाची गोष्ट आहे. तुम्ही सर्व उत्तम श्रोते आहात हे गृहीत आहे. वक्ता एकवेळ तेवढा चांगला नसला तरी चालेल. पण श्रोता उत्तम पाहिजे. काय बरोबर काय चूक हे त्याला कळले पाहिजे. त्याला शास्त्राचे अध्ययन घडलेले पाहिजे. वेदान्त, योगशास्त्र, सांख्यशास्त्र, प्रकृतिपुरुष विचार, योगामध्ये काय सामर्थ्य

आहे, योगाभ्यास कशाकरता करायचा हे सगळे श्रोत्याला माहिती पाहिजे. वेदान्ताचे प्रॅक्टिकल – प्रात्यक्षिक म्हणजे योग. वेदान्ताने सांगितले, 'जीव ब्रह्मरूपच आहे'. हा बोध व्हायला हवा असेल तर त्या बोधाच्या आड येणारे मन उन्मन करायला पाहिजे. त्यासाठी दीर्घकाल, निरंतर अभ्यास करायला पाहिजे.

स तु दीर्घकालनैरन्तर्यसत्कारासेवितो दृढभूमिः ।। योगसूत्रे

जीवाला स्वरूपबोध व्हायला पाहिजे असेल तर आड येणारे मन शांत करायला पाहिजे. मनात नाना वितर्क येत असतील तर ते सत्तर्कानि बाजूला सारले पाहिजेत. बाणाला बाणानेच छेद द्यायचा.

वितर्कबाधने प्रतिपक्षभावनम् । योगसूत्रे

ध्यान करायला लागले की अनेक गोष्टी आड येतात.

व्याधिस्त्यानसंशय प्रमादालस्याविरतिभ्रान्तिदर्शनालब्ध -
भूमिकत्वानवस्थितत्वानि चित्तविक्षेपास्तेऽन्तरायाः ।। योगसूत्रे

व्याधि, स्त्यान, संशय, प्रमाद, आलस्य, अविरति, भ्रांतिदर्शन, अलब्धभूमिकत्व आणि अनवस्थितत्व असे हे नऊ अंतराय म्हणजे योगमार्गातील विघ्ने आहेत. हे सर्व त्या साधकाला-श्रोत्याला माहिती पाहिजेत. वेदान्त माहिती झाला की आपण पूर्ण झालो असे नसून योगसूत्रांप्रमाणे तो काही साधना करत असेल तरच या नरजन्मामध्ये त्याला पूर्णत्व येण्याचा संभव आहे. यासाठी त्याचा अभ्यासच करायला पाहिजे. म्हणून अभ्यास केलेले श्रोते समोर असले पाहिजेत. त्याचबरोबर त्यांच्याजवळ भाव, श्रद्धा पाहिजे. वस्तुतः भगवंतांनी म्हटले आहे, 'श्रद्धामयोऽयं पुरुषः' पण जर भाव, श्रद्धा नसेल, संत सांगतात त्यावर विश्वास नसेल तर कठीण आहे. कारण परमात्मा हा दृश्य स्वरूपात नाही. देवाचे स्वरूप सांगत असताना समर्थांनी चार प्रकारचे देव मानले आहेत. (१) नाना प्रतिमा – बहुतेकांचा दंडक प्रतिमा पूजनात असतो. (२) अवतार महिमा – राम कृष्ण आदि अवतारी पुरुषांच्या ठिकाणी भाव असतो. (३) अंतरात्मा (४) निर्विकारी – जो सर्वत्र व्यापून आहे, पण व्यापून आहे असेही म्हणता येत नाही. कारण व्याप्य, व्यापक असे नसून तोच तर सर्वत्र आहे. तोच परमात्मा, परब्रह्म, निर्विकारी, अक्षय, अनंत

असून तेथे भक्तीच्या अंगाने आपल्याला जायचे आहे. त्यासाठी भाव, श्रद्धा, निष्ठा पाहिजे.

श्रोते विचारतात "कोण ग्रंथ" समर्थ म्हणतात, "ग्रंथा नाम दासबोध ।" श्रोते तयार तसा वक्ता तयार पाहिजे. वक्ता तयार पण श्रोते अनधिकारी असतील तर! 'उत्तम बीज परी समंध । खडकेंसि पडिला ।' खडकावर पडलेले बीज फुकट जाते. तसे सद्‌गुरु तयार पण शिष्य तयार नसेल तर उपयोगी नाही. त्याउलट शिष्य अधिकारी आहे पण सद्‌गुरु मंत्रतंत्र सांगतो, तरी चालणार नाही. म्हणून सद्‌गुरु आणि सत्‌शिष्य एकत्र आले तर त्यांचा संवाद अशा ग्रंथरूपाने जगाला तारतो. सद्‌गुरु आणि शिष्य एकरूप झालेले, एकाच बोधाच्या पातळीवर जर असतील, जसे समर्थ-कल्याण, निवृत्तिनाथ-ज्ञानदेव, वसिष्ठ-रामचंद्र असे असतील तर सद्‌गुरु वचन कानावर पडल्याबरोबर शिष्य मीच ते आहे 'अहं ब्रह्मास्मि' म्हणून बोध घेऊन उठतो.

कानावचनाचिये भेटी – । सरिसाचि पै किरीटी ।
वस्तु होऊनि उठी । कवणि एकु जो ।। ज्ञा. १८-९९१

असा शिष्य, असा गुरु, असा श्रोता, असा वक्ता जर असेल तर त्यांच्यामध्ये सुंदर संवाद घडतो. 'श्रोते पुसती कोण ग्रंथ.' वक्ता सांगतो–

ग्रंथा नाम दासबोध । गुरुशिष्यांचा संवाद ।
येथ बोलिला विशद । भक्तिमार्ग ।।

नरदेहाचे सार्थक करण्यासाठी म्हणून आवश्यक ती भक्ति प्रत्येकाने करावी ही समर्थांची इच्छा.

भक्तिचेन योगें देव । निश्चयें पावती मानव ।
ऐसा आहे अभिप्राव । ईये ग्रंथीं ।। दा. १-१-४

भक्तीने देवाप्रत निश्चितपणे जाता येते असे समर्थ म्हणतात. देवाप्रत जायचे म्हणजे करायचे काय? देव ओळखायचा कसा? देवाची लक्षणे काय? मनुष्य कोणाला म्हणायचे? जो करतो आणि चुकतो तो मनुष्य. जो करतो पण चुकत नाही तो देव; आणि जो करतही नाही आणि चुकतही नाही, पण नाही म्हणण्याची सोय नाही ते ब्रह्म. जो सृष्टीची रहाटी करतो, पण चुकत नाही. सूर्य चंद्र ठरल्यावेळी उगवणार; नद्या तशाच वाहणार; डोंगर तसेच राहणार.

परमेश्वराने जी द्वैतरूपाची सृष्टी निर्माण केली, ती परमार्थाला विरोधी नाही. जीवाने केलेली सृष्टी परमार्थाला विरोधी आहे. मनोकल्पित सृष्टी परमात्म्याच्या आड येते आहे. देवाशी एकरूप होताना ही द्वैतरूपी सृष्टी आड येते. म्हणून भक्तीने देवाप्रत जाता येते असे समर्थ म्हणतात. त्या भक्तीचे लक्षण काय? देव कशाला म्हणायचे?

देव हा सर्वज्ञ, सर्व कर्ता, अनंत आहे असे समजले जाते. वस्तुतः देव काहीच करत नाही. त्याच्यापासून जे निर्माण झाले ते त्याच्यापासून वेगळे काढता येत नाही. कारण जे जे निर्माण झाले त्या सर्वांमध्ये तो अनुस्यूत आहे. 'एकोऽहं बहुस्याम् प्रजायैय इति ।' मी एक आहे तो अनेक रूपांनी नटावे असे त्याला वाटले. त्याप्रमाणे विविध रूपांनी तो नटला, विविध स्वभावांनी, आकारांनी तो नटला तरी तो एकच आहे. त्याच्यामध्ये काही बदल झालेला नाही. सुष्ट दुष्ट माणसातही तोच एक आहे, असा बोध अखंड रहाणे हे देवाला मिळणे आहे.

दासबोधात आणखी बऱ्याच गोष्टी सांगितल्या आहेत. ब्रह्म म्हणजे काय? सद्‌गुरूंची लक्षणे, शिष्याची लक्षणे, बद्ध मुमुक्षु साधक सिद्ध, ब्रह्मांडाची उभारणी व संहारणी, जीवनाला आवश्यक असणारे, देह मन बुद्धीला आवश्यक असणारे, सगळे दासबोधात आलेले आहे. 'न भूतो न भविष्यति ।' असा हा ग्रंथ आहे. चाळीस वर्षांहून अधिक काळ हा ग्रंथ माझ्या हातात असून त्याचा कंटाळा आला असे मला कधी झाले नाही.

दासबोध म्हणजे दासाला झालेला बोध किंवा दासांनी जगासाठी खुला केलेला बोध.

श्रोते पुसती कोण ग्रंथ । काय बोलिलें जी येथ ।
श्रवण केलियानें प्राप्त । काय आहे ।। दा. १-१-१
आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।। दा. १-१-२८

काही साधना करायला नको. श्रवणाचे फळ ताबडतोब मिळते. अंतःकरण पालटून जाते. कोणत्या ग्रंथाने असे फळ सांगितले आहे?

मार्ग सांपडे सुगम । न लगे साधन दुर्गम ।
सायोज्यमुक्तीचें वर्म । ठाईं पडे ।। दा. १-१-२९

या ग्रंथाच्या श्रवणाने सायुज्यमुक्ति मिळते. त्यासाठी काही सायास करावे लागत नाहीत. अरण्यात जाऊन उग्र तपश्चर्या करण्याचेही कारण नाही. समर्थ म्हणतात, “दासबोध ग्रंथाचे जो श्रवण, वाचन, मनन करेल त्याला सायुज्यमुक्ति मिळेल.” सायुज्यमुक्ति म्हणजे?

आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ती ।
तये नांव सायोज्यमुक्ति । सत्य जाणावी ।। दा. ८-८-१९

आत्मनिवेदनाच्या शेवटी जी अभेदभक्ति घडते ती सायुज्यमुक्ति. ती सत्य जाणावी. आत्मनिवेदन म्हणजे?

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ।। दा. ८-८-१३

मी आणि परमात्मा एकच आहे हे आत्मनिवेदनाचे लक्षण आहे. मी जीव त्या परमात्म्यापासून भिन्न नाही. मी देहमनबुद्धीचे म्हणजे एकूण संसाराचे ओझे उगीचच डोक्यावर घेतलेले आहे. ते ओझे जर मी टाकले, ‘मी जीव मज बंधन । मज आहे जन्ममरण ।’ असे जे संकल्पविकल्प आहेत ते जर मी सोडले तर जीव परमात्माच आहे ‘परमात्माचि परि निदसुरा ।’ असे ज्ञानोबा म्हणतात. मी जीव आहे, मला बंधन आहे, मला जन्ममृत्यु आहे, या सर्व चुकीच्या कल्पना जर जीवाने सोडल्या तर ‘जीवा ब्रह्मत्व आहे । संकल्प लोपी ।’ ‘मी देह’ हा संकल्प टाकल्याबरोबर जीव ब्रह्मच होतो हे येथे सांगितले आहे. आत्मनिवेदन झाल्याबरोबर जी स्वाभाविक कृती होत असते, त्याला ‘भक्ति’ असे म्हणतात. मग तो बोलेल अथवा बोलणार नाही, प्रवचन करेल अथवा करणार नाही, तो तीर्थयात्रेला जाईल अथवा जाणार नाही. मग तो गेला अथवा नाही गेला तरी ती यात्राच. अशा प्रकारे सहज जे होते ती भक्ति. समर्थ म्हणतात, “आत्मस्वरूपापासून कधीही विभक्त नसणे म्हणजे भक्ति.”

आपल्या जीवनाचे सार्थक कशाने होते ते दासबोध ग्रंथात सांगितले आहे. नाना मतांचा निश्चय, नाना संदेहांचे निराकरण, स्वरूपबोध, स्वरूपस्थिती म्हणजे काय, संत कुणाला म्हणायचे ते सांगितले.

सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळा ।। दा. ८-९-९

बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं ।

सत्‌शिष्याची लक्षणे तर अगदी स्पष्टपणे सांगितली आहेत.

मुख्य सच्छिष्याचे लक्षण । सद्‌गुरुवचनीं विश्वास पूर्ण ।
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ।। दा. ५-३-१९
शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परमदक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष । लक्षी ऐसा ।। दा. ५-३-२२
लागतां सद्‌गुरुवचनपंथें । जालें ब्रह्मांड पालथें ।
तरी जयाच्या शुद्ध भावार्थे । पालट न धरिजे ।। दा. ५-३-५१

असा शिष्य पाहिजे. तो निर्मळ, आचारशील, विरक्त, अति उदार, परमार्थविषयी अति तत्पर, परोपकारी, निर्मत्सरी, परम सावध, प्रज्ञावंत, प्रेमळ, भक्त, युक्तिवंत, बुद्धिवंत, दृढव्रती असा नाना गुणांनी युक्त पाहिजे. दासबोध ग्रंथात शिष्याची जी लक्षणे सांगितली ती इतरत्र कोठे आढळत नाहीत. सद्‌गुरु ओळखायचे कसे यासंबंधीही मार्गदर्शन या ग्रंथात आहे.

मुख्य सद्‌गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिती ।। दा. ५-२-४५
याहिवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषईं ।। दा. ५-२-४६
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ।
तेथें बहु भक्त जन । विश्रांति पावती ।। दा. ५-२-५०
म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ।। दा. ५-२-५२
यामधें येक उणें असे । तेणें ते विलक्षण दिसे ।
म्हणौन सर्वहि विलसे । सद्‌गुरुपासीं ।। दा. ५-२-५३

असे सद्‌गुरु आणि शिष्य यांच्यामधील संवाद म्हणजे दासबोध ग्रंथ. आपले जीवन सफल, उत्तुंग करण्याचा मार्ग – गुह्य परमार्थ तो सगळा यात सांगितला आहे आणि हा दासबोध ग्रंथ श्रवण करण्याचे फळ 'सायुज्यमुक्ति' हे सांगितले आहे.

नवविधाभक्ति यात सांगितली आहे. 'श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् --' आणि त्या प्रत्येकाची लक्षणे सांगितली आहेत.

ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधून घ्यावें ।
असार ते जाणोनि त्यागावें । या नांव **श्रवण**भक्ति ॥ दा. ४-१-२९
सगुणकथा या नांव **कीर्तन** । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ दा. ४-२-२३
**नाम स्मरे** निरंतर । तें जाणावें पुण्यशरीर ।
माहादोषांचे गिरिवर । रामनामें नासती ॥ दा. ४-३-२२
**पादसेवन** तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्‌गुरूचे पाय सेवावे । सद्‌गतिकारणें ॥ दा. ४-४-२
काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंतआर्चनें । या नांव **आर्चनभक्ती** ॥ दा. ४-५-२९
जेथें दिसती विशेष गुण । तें सद्‌गुरूचें अधिष्ठान ।
याकारणें तयासी **नमन** । अत्यादरें करावें ॥ दा. ४-६-९
सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा सन्निधचि असावें । देवद्वारीं ॥ दा. ४-७-२
देवास जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीतीं ।
येणें करितां भगवंतीं । **सख्य** घडे नेमस्त ॥ दा. ४-८-३
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोहि वेचावा ॥ दा. ४-८-८
नवमी भक्ती **आत्मनिवेदन** । न होतां न चुके जन्ममरण ।
हें वचन सत्य प्रमाण – । अन्यथा नव्हे ॥

आत्मनिवेदन जोपर्यंत झालेले नाही तोपर्यंत जीवशिवाचे ऐक्य नाही. आत्मनिवेदन म्हणजे सोऽहं. मी कोण, परमात्मा कोण ते ओळखायचे; आणि दोन्ही अनन्य कसे आहे ते पहायचे, हे आत्मनिवेदन. परमार्थात गूढ काही नाही, सर्व प्रगट आहे. पण प्रगटच गुप्त झाले आहे, त्याला काय करणार? आमच्या परमार्थाबद्दलच्या काही विचित्र कल्पना आहेत. मुलीचे लग्न ठरले, किंवा मुलगा पास झाला म्हणून सत्यनारायण. वस्तुतः या गोष्टींचा परस्पर काय संबंध! अभ्यास केला तर मुलगा पास होईल.

भक्ति म्हणजे अभेद भजन. ते होण्यासाठी प्रथम देव आणि भक्त असे होऊन देवाची पूजाअर्चा करावी लागते. अशी वेगळेपणाने भक्ति

करत असता - 'पूजा घेताती प्रतिमा । आंगा येतो अंतरात्मा ।' असे होऊन जाते. 'तोच मी आहे' या बोधात मनुष्य येतो. त्याला पूर्ण बोध होतो. आत आत्म्याचा प्रकाश आणि त्या प्रकाशात सारी कर्मे असे त्या व्यक्तीचे जीवन निःस्वार्थी, निष्काम, आनंदरूप होऊन जाते. जे संतांना, भगवतद्गीतेला अभिप्रेत आहे असे त्याचे जीवन होते. हा भक्तीचा महिमा आहे. अभेद भजन एकदम होऊ शकत नाही.

अभेद भजनाचा हरिख । देव भक्त झाले एक ।
कोठे न पुरे भेदवाणी । अवघी बुडाली कहाणी ।
हारपले देवभक्तपण । जनी जाहला जनार्दन ।
एका जनार्दनी देव । पुढे उभा स्वयमेव ।।

हे अभेद भजन आहे. 'तुज मज ऐसी परी । जैसा तरंग सागरी ।' हा अभेद आहे. परमात्मा सच्चिदानंद तसा मीही सच्चिदानंद. या बोधाच्या आड येणारे मन उन्मन करून क्षण दोन क्षण चिदाकाशात लीन करून ठेवणे. अखंड नामजप करणे, अखंड पूजाअर्चा, ध्यानधारणा करणे, सर्वांशी नेहमी गोड बोलणे. समर्थ म्हणतात –

आपणास चिमोटा घेतला । तेणें कासाविस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ।। दा. १२-१०-२४
जगामधें जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ।

आपल्या बोलण्यावरून हा मनुष्य भला आहे असे तरी लोकांना वाटावे. 'मोकळे मन रसाळ वाणी' पाहिजे.

जीव हा शिवरूपच आहे असा बोध असेल तर आपल्या स्वाभाविक कर्मांनी भक्ति होत असते. त्यासाठी भगवंत म्हणतात –

यत्करोषि यद्श्नासि यज्जुहोषि ददासि यत् ।
यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ।। भ. गीता ९-२७

"जे जे तू करशील ते मीच म्हणजे भगवंतांनीच केले आहे असे म्हण. तू वेगळेपणाने काही केलेस असे बोलू नकोस, समजू नकोस."

मी कर्ता ऐसें म्हणसी । तेणें तू कष्टी होसी ।
राम कर्ता म्हणतां पावसी । येश कीर्ती प्रताप ।। दा. ६-७-३६

राम कर्ता आहे. मी कोणी नाही. सगळे रामाचेच आहे. मी त्याच्याशी

एकरूप आहे. त्याच्या चरणाचा दास आहे. अशी 'दासोऽहं' पासून 'सोऽहं' पर्यंतची वाटचाल करायची आहे.

हो कां तरंगु लहानु । परी सिंधूसी नाहीं भिन्नु ।
तैसा ईश्वरीं मी आनु । नोहेचि गा ।। ज्ञा. १४-३८६
ऐसेनि बा समरसें । दृष्टि जे उल्हासे ।
ते भक्ति पैं ऐसे । आम्ही म्हणों ।। ज्ञा. १४-३८७

जसा तरंग लहान परंतु सिंधूसी अभिन्न आहे तसा जीव जरी लहान असला तरी त्या परमात्म्याशी एकरूप आहे. हा बोध जो इतर ग्रंथातून आहे तोच दासबोधात आहे. तो बोध जर आपल्यामध्ये मुरायला लागला तर समर्थांना अतिशय आनंद होईल. ही आनंदभूमी आहे. या आनंदभूमीत विचरणारी माणसेदेखील पूर्ण आनंदरूप पाहिजेत. कसले दुःख! वेदान्तशास्त्राच्या दृष्टीने आनंद हाच खरा. दुःख हे खोटे आहे. सुखदुःख हे साक्षिभास्य आहे. आपण वस्तुतः आनंदरूप आहोत.

आनंदाद्धयेव खल्विमानि भूतानि जायन्ते । आनन्देन जातानि जीवन्ति । आनन्दं प्रत्यन्त्यभिसंविशन्तीति ।। म्हणून देवाला भक्तीने पावायचे. 'भक्तिचेन योगे देव । निश्चयें पावती मानव ।'

पूजा, नामस्मरण, ध्यान हे सगळे त्या भक्तीमध्ये आले. आपण बारा तास काही ध्यानाला बसू शकत नाही. म्हणून सर्व प्रकारची साधना करावी. आपण जी साधना करतो त्याचा परिणाम आपल्या वागण्याबोलण्यातून दिसला पाहिजे. एखादा मनुष्य ब्रह्मविद् झाला हे कशावरून समजायचे?

ब्रह्मींचे विसवणेंवरी । उन्मेख लाहे उजरी ।
जें वाचेतें इयें करी । सुधासिंधु ।। ज्ञा. १५-१०

पहिला परिणाम वाचेवर होतो. वाचा सुधासिंधु होते. 'जिह्वामें मधुमत्तमा' अशी जिह्वा मधुमत्तम होवो. किती लोकांची वाणी मधुमत्तम असते! कारण परमार्थ मुरतच नाही. परमार्थ जसजसा मुरेल, जसजशी साधनेत प्रगती होईल तसतसा पहिला परिणाम जिभेवर होईल.

सूर्ये अधिष्ठिली प्राची । जगा राणीव दे प्रकाशाची ।
तैसी वाचा श्रोतयां ज्ञानाची । दिवाळी करी ।। ज्ञा. १५-१२
नादब्रह्म खुजे । कैवल्यही तैसें न सजे ।

ऐसा बोलु देखिजे । जेणें दैवें ।। ज्ञा. १५-१३
श्रवणसुखाच्या मांडवीं । विश्व भोगी माधवीं ।
तैसी सासिन्नली वरवी । वाचावल्ली ।। ज्ञा. १५-१४
ठावो न पवता जयाचा । मनेंसी मुरडली वाचा ।
तो देवो होय शब्दाचा । चमत्कारु ।। ज्ञा. १५-१५

संतांची वाचा पहावी. कधी कठोर शब्द नाही. आपण त्यांचे शिष्य म्हणवतो, मग आपली वाचा कठोर का? नामस्मरण चालू असेल तर वाणी कदापि कठोर होणार नाही. कठोर बोलणे हा गुन्हा आहे. कोणाला आपण बोलतो आणि बोलणारा कोण? प्रत्येकजण जर भगवद्रूप आहे तर आपण कोणाला कठोर बोलणार? कोणीही येवो आपले वागणे विनम्र, भाषण मृदु पाहिजे. ज्याची साधना सिद्ध झाली त्याला हे सहज आहे.

समर्थ म्हणतात, “हे सगळे मी दासबोधात सांगितले आहे.” असा हा अगाध, अपार ग्रंथ आपण प्रत्यही वाचत आहात. त्याचे मनन करत आहात. ‘घासामागें घास घेतला । आवकाश नाहीं चावायला ।’
असे आपले होत नाही. आपण श्रवणानंतर मनन करत असल्याने आपोआपच आपल्या लक्षात येते की देव भक्त एकरूपच आहेत. हाच दासबोध ग्रंथाचा आणि इतर सर्व ग्रंथांचा अभिप्राय आहे. भक्त जर देवच असेल तर देव जसे वागतात तसे भक्ताने वागले पाहिजे. हे सांगायला नको. रामचंद्र कसे होते? अत्यंत कृपाळू, दयाळू, परम प्रेमळ, कर्तव्यनिष्ठ, एकवचनी असे सर्वगुणसंपन्न होते. मनात एक, वाणीत दुसरे, आणि कार्यात तिसरे असे नव्हते.

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ।। दा. १२-१०-३९

अशी थोर थोर मंडळी रामचंद्र, समर्थ, श्रीधरस्वामी हे आपल्यापुढे चालले आहेत. त्यांच्यामागून जाता जाता त्यांची जी पदधूली आहे ती सहजच आपल्यावर उडत असणार. त्या धूलीने आपण पवित्र होऊ या.

ॐ तत् सत्
जय जय रघुवीर समर्थ

●

## २. आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन । पुढें आत्मनिवेदन । सद्‌गुरुप्रसादें ॥ दा. ६-२-४०

**[स्वामी माधवनाथ यांचे आनंदाश्रम, पुणे येथील प्रवचन]**

आज मोठा आनंदाचा दिवस आहे. संबंध महाराष्ट्रभर श्रीसमर्थांचा त्रिशताब्दि महोत्सव आपण साजरा करीत आहोत. दासबोधाचा सहावा दशक, दुसरा समास – ब्रह्मपावननाम समास त्यातील ही ओवी आपण येथे सेवेसाठी घेतली आहे.

दासबोध हा अत्यंत जीवनस्पर्शी ग्रंथ आहे. साधकाला जे काय पाहिजे ते नेमके समर्थांनी दासबोधात सांगितले आहे. दासबोध, ज्ञानेश्वरी दोन्हीमध्ये विषय एकच आहे. परंतु ज्ञानेश्वरी कळणे कठीण. त्यातील शब्ददेखील कळणे कठीण. त्यामुळे ज्ञानेश्वरी ग्रंथ आपल्याला कळला असे म्हणण्याची कुणीची छाती होत नाही. तसा कोणताच ग्रंथ पूर्णपणे कळला असे म्हणता येत नाही. मग ज्ञानेश्वरी कळणे तर कठीणच. काही ओव्या पाहिल्या की लक्षात येईल.

तिन्ही अवस्थांचेनि द्वारें । उपाध्युपहिताकारें ।
भावाभावरूप स्फुरे । दृश्य जें हें ॥ ज्ञा. १८-११८६
तें हें आघवेचि मी द्रष्टा । ऐसिया बोधाचा माजिवटा ।
अनुभवाचा सुभटा । धेंडा तो नाचे ॥ ज्ञा. १८-११८७
जया सोहंभाव हा अटकु । मोक्ष सुखालागोनि रंकु ।
तयाचिये दिठीचा झणें कळंकु । लागेल तुझिया प्रेमा ॥ ज्ञा. ६-११५

ज्ञानेश्वर महाराजांनी हे किती उंच उंच नेलेले आहे पहा.

निगिजे पूर्वीलिया मोहरा । कीं येइजे पश्चिमेचिया घरा ।

काही ज्ञानेश्वरीत या ओवीचा अर्थ असा दिलेला आहे की पूर्वेकडून निघायचे आणि पश्चिमेकडे यायचे. ही योगाची ओवी आहे. योगाची प्रक्रिया जर माहिती नसेल तर याचा अर्थ काय सांगणार? म्हणून ज्ञानेश्वरी अवघड आहे. पण जे ज्ञानेश्वरीत आहे तेच समर्थांनी दासबोधात सोप्या शब्दात सांगितले आहे.

जेथ चहूंकडे जळत वणवा । तेथूनि न निगिजे केवीं पांडवा ।

तेवीं लोकां येऊनि सोपद्रवां । केवीं न भजिजे मातें ।। ज्ञा. ९-४९२
असे ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, तर समर्थ म्हणतात –

अग्न गृहासी लागला । आणि सावकाश निजेला ।
तो कैसा म्हणावा भला । आत्महत्यारा ।। दा. ११-३-७

दोघांचे सांगणे एकच. काय फरक आहे?

अध्यात्मशास्त्र आदिअंती एकच आहे. जे ज्ञानोबांनी, नाथांनी सांगितले तेच तुकोबांनी सांगितले. उपनिषदे, भगवद्‌गीता यांनीही तेच सांगितले. अध्यात्मशास्त्राविषयी ज्ञानेश्वरीत वेगळे दासबोधात वेगळे असे नाही. दोन्ही ग्रंथ एकच सांगतात. गेली तीस चाळीस वर्षे मी या दोन्ही ग्रंथांचा अभ्यास केल्यावर हे सांगतो आहे. किंबहुना दासबोधाचे वैशिष्ट्य हे की हा गुरुशिष्याचा संवाद असल्यामुळे आणि बहुतेक शिष्य सामान्य पातळीवर असल्यामुळे त्यांनी जे प्रश्न विचारले तसे समर्थ बोलले. दिवस कसा घालवावा? काय करावे? वागावे कसे?

जगामधे जगमित्र । जिव्हेपासीं आहे सूत्र ।

जीभ सांभाळावी. आपण गोड बोललो तर सर्व जगात आपल्याला मित्र मिळतील. कडू बोललो तर शत्रुत्व वाढेल. साध्या वाटणाऱ्या गोष्टी पण समर्थांनी मुद्दाम सांगितल्या.

सोहं आत्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण ।
हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ।। दा. ८-८-३३
ऐक शिष्या येथीचें वर्म । स्वयें तूंचि आहेसि ब्रह्म ।
ये विषईं संदेह भ्रम । धरूंचि नको ।। दा. ५-६-४५

येथपर्यंत सांगितले. म्हणजे अगदी सामान्य व्यावहारिक गोष्टींपासून ते परमार्थातील उच्चतम गोष्टीपर्यंत – सोऽहं बोधापर्यंत समर्थांनी आपल्या हाताला धरून मुलाच्या चालीने चालविले आहे.

समर्थांचे जीवनाकडे दृष्टी टाकली तर इ. स. १४३० त त्यांचा जन्म झाला. बारावे वर्षी लग्न समारंभातून ते निघून गेले. पुढे बारा वर्षे त्यांनी पुरश्चरण केले. त्यानंतर बारा वर्षे त्यांनी तीर्थाटन केले. देशाची अवनत स्थिती त्यांनी पाहिली. त्यांना अत्यंत खेद वाटला. 'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम्' यासाठी भगवंतांचा, संतांचा जन्म असतो.

समर्थांचे कार्य तेच होते. भारताचे मनाला व्यथित करणारे चित्र पाहून त्यांनी विचार सुरू केला. हे चित्र पालटण्यासाठी एक शक्ति उभी करण्याचे त्यांनी ठरवले. शिवाजी राजांच्या रूपाने शक्ति उभी राहिली. त्याला समर्थांच्या युक्तीची जोड मिळाली आणि भारत पुन्हा उभा राहिला.

मतमतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला ।

अशी परिस्थिती त्यावेळेला होती. अशा परिस्थितीत हा दासबोध ग्रंथ लिहिलेला आहे. यात जे सांगायचे होते ते सुस्पष्ट सांगितले आहे. शब्दांची कसरत नाही. दासबोधात रोकडा परमार्थ आहे. बाकी राजकारण, समाजकारण सगळ्या गोष्टी आहेत. पण त्या गौणत्वाने आहेत. त्या त्या परिस्थितीला योग्य अशा पद्धतीने सर्व सांगितले आहे. आता तीच परिस्थिती राहिलेली नाही. थोडी वेगळी झाली आहे. परिस्थिती कशीही असो त्या परिस्थितीला तोंड देण्यासाठी माणूस तयार पाहिजे. असा सर्वांगाने उत्तम माणूस कसा तयार करता येईल हे समर्थांनी सांगितले. या तऱ्हेने समर्थांचा दासबोध हा आपल्या उपयोगाचा आहे. कारण सर्वकाळी, सर्वस्थळी तो माणूस निर्माण करण्याचे कार्य दासबोधाने केले. आपल्याला समजेल अशा पद्धतीने दासबोध लिहिला गेला आहे.

मुख्य हरिकथा निरूपण । दुसरें ते राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्वविषईं ।। दा. ११-५-४

हरिकथा निरूपण हे मुख्य. अध्यात्माच्या, परमार्थाच्या पायावर राजकारण, समाजकारण सर्व काही व्हावे ही समर्थांची, सर्व संतांची इच्छा आहे. संसार टाकून नव्हे तर संसार करूनच परमार्थ करावा अशी त्यांची आज्ञा आहे.

ज्ञानदेवांचे चरित्र नामदेवांच्यामुळे आपल्या हातात आले. समर्थांनी स्वतः चरित्र लिहिले नाही आणि इतरांनी त्यांचे चरित्र लिहिले ते शंभर वर्षानंतर. तेव्हा दासबोध हेच त्यांचे चरित्र. समर्थांनी स्वतः तसेच म्हटले आहे.

आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ।
असतां न करावा हो खेद । भक्तजनीं ।।

स्वतःसिद्ध जे स्वरूप तेच आत्माराम, दासबोध आहे. आपल्या अंतःकरणात असलेला जो बोध – स्वरूपबोध तोच द्यायला हे दोन्ही ग्रंथ

कटिबद्ध आहेत.

१६४४ मधे समर्थ कृष्णा खोऱ्यात आले आणि मग लोकांना सांगायला लागले –

देवाच्या सख्यत्वासाठी । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं – । प्राण तोहि वेचावा ।। दा. ४-८-८
देव म्हणिजे आपुला प्राण । प्राणासी न करावें निर्वाण ।
प्रत्यये बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ।
नाना मार्ग सांडून त्याला – । शरण येती ।। दा. १५-२-१९
परी तो कोठे आडळेना । कोणें स्थळीं सांपडेना ।
वेष पाहातां हीनदीना – । सारिखा दिसे ।। दा. १५-२-२०
उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें येशकीर्तिप्रतापे । सीमा सांडिली ।। दा. १५-२-२१

हे सगळे समर्थांचे चरित्रच आहे.

बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाची वचनें प्रमाणें । मानिती जनीं ।। दा. १२-१०-३९

आधी त्यांनी केले आणि मग ते बोलले. अशी प्रमाणभूत शेकडो वचने समर्थांच्या वाणीतून प्रगट झाली आहेत. त्यापैकीच एक वचन आज आपण समर्थांच्या सेवेसाठी घेतले आहे. येथे एक व्यक्ति कोणी मोठी नसून आपण एकमेक जमून समर्थांना समजून घेतो आहोत. समर्थांना काय सांगायचे आहे नेमके ते आपण समजून घेत आहोत.

राजकारण, समाजकारण सर्व गोष्टी अध्यात्माच्या पायावर व्हायला पाहिजेत. परंतु आज राजकारण, समाजकारण बिघडत चाललेले दिसते. त्याचे कारण हा अध्यात्माचा पायाच नाहीसा झाला आहे. आज हिंदु धर्माविषयी अनास्था वाढते आहे. याचे कारण हा पायाच गेला आहे. भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध यातील शिकवण लोक विसरले आहेत. समर्थ म्हणतात, "ज्याला प्रपंच धड करता येत नाही त्याच्याने परमार्थ काय होणार?"

प्रपंची जो सावधान । तो परमार्थ करील जाण ।
प्रपंची जो अप्रमाण । तो परमार्थी खोटा ।। दा. १२-१-९

यापेक्षा संतांनी काय, किती आणि कसे सांगावे म्हणजे आम्हाला कळेल? प्रपंच आणि परमार्थ दोन्हीत फरक नाही. किंबहुना परमार्थ सिद्ध झाला की मग सर्व प्रपंचच परमार्थरूप होतो असे संतांचे म्हणणे आहे.

जयां ऐहिक धड नाहीं । तयांचें परत्र पुससी काई ।

ज्याचा प्रपंच धड नाही त्या करंट्याला परमार्थ कसा होणार?

प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ।। दा. १२-१-३

ही समर्थांची वचने आहेत. आपले जीवन उत्तम व्हायला हवे असेल, आपल्या जीवनाला उंची मिळायला हवी असेल तर आपणाला कसेतरी जीवन घालवून चालणार नाही. केव्हातरी उठायचे, कसेतरी काम करायचे, काहीतरी खायचे, प्रत्येक गोष्टीचा कंटाळा हे बरोबर नाही.

आंगेंआंग मोडामोडी । कार्यजातीं अनावडी ।
नुसती परवडी । जांभयांची ।। ज्ञा. १४-१८०

जे जीवन कोणीही जगू नये अशी संतांची – विशेषतः समर्थांची इच्छा होती तसे जीवन लोक जगताना पाहून समर्थांना काय वाटत असेल? समर्थ दोन्ही गोष्टी एकदम सांगतात. प्रपंच आणि परमार्थ. प्रपंचातून थोडा वेळ काढून एकान्तात शांत बसायला समर्थ सांगतात.

जयास येकांत मानला । अवघ्या आधीं कळे त्याला ।
येकांतीं उगेंच बैसावें । तेथें हें समजोन पाहावें ।
अखंड घ्यावें सांडावें । प्रभंजनासी ।। दा. १७-५-६
येकांती मौन धरून बैसे । सावध पाहातां कैसें भासे ।
सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।। दा. १७-५-९
ते शब्द सांडून बैसला । तेथें कोण शब्द जाला ।
सोहं ऐसा भासला । अंतर्यामी ।। दा. १७-५-१०

किती सुस्पष्ट विवरण आहे? समर्थांच्या सर्व वाङ्मयात कोठेही असे आढळत नाही की या महापुरुषाने काही हातचे राखून ठेवले आहे. सगळे त्यांनी मोकळे केले आहे.

या रे या रे लहान थोर । याति भलती नारीनर ।

तुम्ही या. मी तुम्हाला देतो ते तुम्ही घ्या. समर्थांना लोकांविषयी खूप

तळमळ होती. भारतभ्रमण करून आल्यावर ते म्हणू लागले. मी आता माझ्या दृष्टीने पूर्ण आहे. कोण येईल त्याला मुक्त करायला मी समर्थ आहे. पण कोणी येईल तेव्हा ना! कोणी आलेच नाही तर काय करणार?

आपल्या वयाच्या पांचव्या वर्षी 'चिंता करितो विश्वाची' असे म्हणणारा हा महापुरुष. जेव्हा त्यांनी महाराष्ट्रातील, भारतातील दयनीय स्थिती पाहिली तेव्हा त्यांना किती दुःख झाले असेल याची कल्पनाच केलेली बरी. आपण फार सुखी आहोत आत्ता. पण जर आपण सुखासीन झालो तर तीच संकटे पुन्हा आल्याखेरीज राहणार नाहीत. म्हणून समर्थांची वचने आपण पाहू या. अध्यात्माच्या पायावर जर सगळा व्यवहार, प्रपंच – सर्व जीवन उभे करायचे असेल तर आपण अध्यात्माचा पाया काय तो प्रथम जाणून घेऊ या. काय केले असता अध्यात्म सिद्ध होईल? काय केले असता आत्मदर्शन होईल, स्वरूपाचा आनंद आपण प्राप्त करू शकू? काय केले असता जीवनाचे चरम लक्ष्य आपल्याला प्राप्त होईल? त्यासंबंधीची  ही ओवी आहे.

आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्‌गुरुप्रसादें ।। दा. ६-२-४०

मला नेहमी वाटते समर्थांची एक एक ओवी तराजूच्या एका बाजूला ठेवावी आणि दुसऱ्या बाजूला एक कोट रुपये. तरी ओवीची बाजू जड होऊन खाली राहील. इतक्या मोठमोठ्या, मौल्यवान ओव्या आहेत.

अहं आत्मा हे कधीचि । विसरो नये ।
सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्ध लक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ।। दा. ८-९-१२

सगळ्या महाराष्ट्राला, भारतवर्षाला इतकेच नव्हे तर सर्व जगाला या ओव्यांच्या रूपाने अमोल देणे समर्थांनी दिले आहे. आधीं अध्यात्मश्रवण – समर्थ म्हणतात, "प्रथम अध्यात्माचे श्रवण करावे" श्रवणच जर झाले नाही तर पुढे काही कळणार नाही. श्रवणावर समर्थांचा फार मोठा विश्वास आहे.

ऐका परमार्थाचें साधन । जेणें होये समाधान ।

तें तूं जाण गा श्रवण । निश्चयेंसीं ॥ दा. ७-८-१

परमार्थाचे मुख्य साधन आहे श्रवण, मग मनन आणि निदिध्यास.

श्रवण मनन निजध्यास । प्रचितीनें बाणता विश्वास ।

रोकडा साक्षात्कार सायास – । करणेंचि नलगे ॥ दा. १०-९-३०

समर्थ पैजेने सांगतात. जसे ज्ञानेश्वर महाराज पैजेने सांगतात –

तेणें कारणें मी बोलेन । बोलीं अरूपाचे रूप दावीन ।

अतींद्रिय परी भोगवीन । इंद्रियांकरवीं ॥ ज्ञा. ६-३६

तसेच समर्थ सांगतात. श्रवणात सायास कसले? अखंड ध्यान, अखंड बोध आहे. त्याचे अनुसंधान ठेवले पाहिजे. त्यासाठी थोडे विवेक, वैराग्य पाहिजे. श्रवणाचा अभ्यास ठेवला नाही तर महंत देखील बुडतील. म्हणून श्रवण पाहिजे.

श्रवणाचे एवढे महत्त्व ऐकूनही आपण श्रवणाला का जात नाही! तर कोणाकडून अध्यात्मश्रवण करायचे हा प्रश्न आहे. अधिकारी वक्त्याकडून श्रवण करायचे. वक्ता निदान साधक तरी पाहिजे. संत मिळणे दुर्मिळ. परंतु समर्थांनी सांगितलेली साधना करणारी मंडळी दासबोधावर बोलायला पाहिजेत. जे कधीकधी एकान्तात जातात, स्वरूपी विश्रांतीला जातात आणि मग लोकान्तात येतात असे वक्ते पाहिजेत.

अखंड येकांत सेवावा । अभ्यासचि करीत जावा ।

काळ सार्थकचि करावा । जनासहित ॥ दा. ११-१०-१७

जो कधी एकान्तात जात नाही, अभ्यासच करीत नाही, स्वरूप अथवा स्वरूपस्थिती म्हणजे काय हे ज्याला माहिती नाही, केवळ देह मन बुद्धीचाच विचार जो करतो आहे, 'यो बुद्धेः परतस्तु सः' त्या सः चा आठवच ज्याच्या जीवनात नाही असा जर वक्ता असेल तर श्रवण कुणाकडून करायचे? समर्थांवर बोलणारे काही वक्ते समर्थांनी समाजकारण, राजकारण कसे केले ते सांगतात. ते ठीक आहे. पण समर्थांचे जीवन त्यांनी समाजकारण, राजकारण किती केले यासाठी नाही. समर्थांचे माहात्म्य आहे, त्यांच्या जीवनाचा विचार आहे तो त्यांनी अध्यात्म किती केले यासाठी आहे. भारतातील ऋषिमुनींचे, व्यासादिकांचे नांव जे प्रसिद्ध आहे ते त्यांनी प्रपंच कसा केला! राजकारण काय केले यासाठी

नाही. त्या आता कालबाह्य गोष्टी आहेत. त्या त्या काळाला योग्य अशा गोष्टी त्या त्या संतांनी सांगितल्या. ज्ञानेश्वर महाराजांनी तत्कालीन अशा गोष्टींवर फारसा भर दिला नाही. कारण त्या काळात परकीयांचे आक्रमण अजून झालेले नव्हते. सर्वत्र आबादीआबाद होती. समर्थांच्या वेळी वातावरण फारच वाईट होते. सर्वत्र संघर्ष होता. आपले लोक परकीयांचे नोकर झाले होते. मतमतांचा गल्बला होता. अशा परिस्थितीत ज्ञानेश्वरीतील शब्द दासबोधात कसे येणार? पण अध्यात्म दोन्ही कालात एकच. व्यासांपासून स्वरूपानंदांपर्यंत अध्यात्मात कुठेही बदल नाही. म्हणून न बदलणारे जे तत्त्व – त्या तत्त्वाचे श्रवण हे अध्यात्मश्रवण.

आधी अध्यात्मश्रवण – श्रवणाला बसले, पण खूप जेवून आले. त्यामुळे तहान लागली, जीव कासावीस झाला. इकडे वक्ते सांगत आहेत. पण त्याला श्रवण कसे होणार? थोडे बेताने जेवून यायला पाहिजे. किती व्यावहारिक सूचना दिल्या पहा! समर्थांना जे दिसत होते ते त्यांनी लिहिले. 'कीर्तनी बैसता निद्रे नागविले' ज्ञानोबा, नामदेवांच्या काळीही हेच होते. श्रवण का होत नाही? बोधच नसतो. त्या विषयाची तयारीच नसते. त्यामुळे सांगणारा आणि ऐकणारा यांच्यात विचाराचा मेळच बसत नाही.

एकदा एका गावाला बालगंधर्वांची नाटके सुरू होती. नाटक पहायला एक दिवस एक पाटील आले. खूप श्रीमंत होते. पण नाटक पहाण्याची संवय नव्हती. पहिल्या रांगेचे तिकिट काढून पहायला बसले. पडदा वर गेला. नाटक सुरू झाले. 'नाही मी बोलत आता नाथा' गाणे सुरू झाले. दोन तीन वेळा तोच चरण कानावर पडला. पाटलांना आश्चर्य वाटले. बोलत नाही म्हणजे काय? आम्ही पैसे दिले आहेत. यांनी बोलायला पाहिजे. पाच सहा वेळा आळवून आळवून तोच चरण म्हटला गेला. तेव्हा मात्र पाटलांना ते असह्य झाले. ते खुर्चीवरुन उठले. त्यांनी डोक्यावरचा फेटा काढून हातात घेतला आणि आपला हात उंच करून मोठ्याने ओरडले, "बोलत नाहीस तर बोलू नकोस. पण माझे पैसे टाक." आता अशा माणसाला प्रत्यक्ष गंधर्व जरी गात असले तरी काही कळेल का? त्या गाण्यात तो रमेल का? संगीताचे ज्ञानच ज्याला नाही तो संगीतात रमणे शक्य नाही. ज्याला गाण्याचा कान किंवा समज आहे,

गाणे ऐकून बरे वाटते आहे एवढे तरी हवे. गाण्याचा तिटकारा असेल तर त्याच्या समोर उत्तम गायक आणून बसविला तरी काय उपयोग! त्याला संगीताचे श्रवण घडणे कसे शक्य आहे? म्हणून श्रवण घडत नाही. ज्या विषयाचे श्रवण करावयाचे तो अध्यात्मविषय थोडातरी आपल्या परिचयाचा असल्याशिवाय श्रवण घडण्याची शक्यताच नाही. काही थोडे 'मनाचे श्लोक' माहिती हवेत. त्यात समर्थांनी भक्ताची लक्षणे अतिशय सुंदर सांगितली आहेत.

सदा आर्जवी प्रीय जो सर्वलोकीं । सदा सर्वदा सत्यवादी विवेकी ।
न बोले कदा मिथ्य वाचा त्रिवाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥
सदा सेवि आरण्य तारुण्यकाळीं । मिळेना कदा कल्पनेचेनि मेळीं ।
चळेना मनी निश्चयो दृढ ज्याचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥

नुसते मनाचे श्लोक वाचले, त्याचे मनन केले आणि त्याप्रमाणे करण्याचा थोडासा प्रयत्न जरी केला तरी पुष्कळ झाले. सर्वस्वी तसे होणार नाही. कारण खूप अवघड श्लोक आहेत. 'अनंत राघवाचा शोध' या नांवाचे माझे एक पुस्तक या मनोबोधांवर आहे. त्यात थोडे या श्लोकांवर दिग्दर्शन केले आहे. वस्तुतः हजार पानांचा ग्रंथ या श्लोकांवर होईल एवढे ते महत्त्वाचे आहेत. 'स्वरूपाच्या अनुसंधानातून जरादेखील चळू नका' असा मनाच्या श्लोकाचा इत्यर्थ आहे.

मनाचीं शतें ऐकतां दोष जाती । मतीमंद ते साधनायोग्य होती ।
चढे ज्ञान वैराग्य सामर्थ्ये आंगीं । म्हणे दास विश्वासतां मुक्तिभोगीं ॥

असे हे मनाचे श्लोकदेखील ज्यांनी वाचले नसतील त्यांना श्रवण कसे घडणार! 'तो गे तोचि तो राम सर्वत्र पाहें' इतकी त्याची तयारी नसली तरी चालेल. पण निदान श्लोक वाचले पाहिजेत. त्याचे थोडे मनन केले पाहिजे, तर त्याला श्रवण घडेल. ज्यांनी कधी समर्थांचे वाङ्मय, कोणत्याही संतांचे वाङ्मय कधी पाहिले नसेल, संबंध आयुष्यभर उद्योगधंदा, संसार, मुलेबाळे, नाटक, सिनेमा यातच आयुष्य काढले असेल अशी व्यक्ति जर 'आधी अध्यात्मश्रवण --' हे ऐकायला आली तर तिला श्रवण कसे घडेल! म्हणून श्रवणाच्या आड अनेक गोष्टी येतात.

एकदा एक गृहस्थ होते. त्यांच्या पत्नी संगीतज्ञ होत्या. संगीताच्या

अभ्यासासाठी त्यांनी पाचपंचवीस वर्षे खर्च केली होती. त्या गृहस्थांना संगीताची अजिबातच गोडी नव्हती. एकदा एक प्रसिद्ध गायक गावात आले होते. त्यांच्या मैफलीला या गृहस्थांनी यावे म्हणून त्यांची पत्नी त्यांना आग्रह करीत होती. त्यांनी बरीच टाळाटाळ केली. पण शेवटी नाइलाजाने ते गृहस्थ पत्नीसह मैफलीला गेले. गाणे सुरू झाले. एवढा मोठा गायक. त्याचे आलाप, ताना बराच वेळ सुरू होते. एक तासभर गेल्यावर त्या गृहस्थांच्या चेहेऱ्यावर चिंता दिसू लागली. पत्नीला आश्चर्य वाटले. एवढे चांगले गायन चालू असताना यांना चिंता कसली वाटते? तिने न राहवून पतिराजांना प्रश्न विचारला, "तुम्हाला कशाची चिंता वाटते?" पतिराज म्हणाले, "पूर्वी आपल्याकडे एक बकरा होता. तो त्याच्या मृत्युपूर्वी दहा पंधरा मिनिटे बँ बँ असे कळवळून ओरडत होता. पण पुढे तो मेला. येथे मी पहातो तर तास होऊन गेला. हे गायक तसेच ओरडत आहेत. पण अजून आहेत."

त्यांच्या पत्नीने कपाळाला हात लावला. आता अशा मनुष्याला संगीताचे श्रवण कसे घडणार?

समर्थ सांगतात, श्रवण व्हायला पाहिजे, त्याची अनुभूति यायला पाहिजे. त्यासाठी श्रवणाला श्रोत्याची पूर्वतयारी पाहिजे. वक्ता व्हायचे तर आणखी वेगळी तयारी पाहिजे. वक्ता आणि श्रोता दोघे तयार असतील तर श्रोतावक्ता एकरूपच होऊन जातात. मग त्या श्रवणाची गोडी काही अजबच असते. म्हणून अध्यात्मश्रवणाला एवढ्या गोष्टी पाहिजेत.

अध्यात्म हा सूक्ष्म विचार आहे. त्यामुळे इतर विषयांचे श्रवण करायला जी तयारी लागते, त्यापेक्षा अध्यात्माचे श्रवण करायला अधिक तयारी लागते. जर बुद्धि अग्र असेल तरच श्रवण शक्य आहे. अध्यात्म म्हणजे आत्म्याविषयी विचार. आत्मा हा अत्यंत गूढ आहे. सर्वांनी हेच सांगितले.

एष सर्वेषु भूतेषु गुढोत्मा न प्रकाशते ।
दृश्यते त्व्ग्रयया बुद्धया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ।
इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयानघ ।। भ. गीता. १५-२०

"हे अत्यंत गुह्यतम शास्त्र आहे. कारण मी आत्म्याविषयी सांगतो आहे"

असे भगवंत म्हणतात. परमेश्वर, परमात्मा, आत्मा हा अत्यंत गुह्य, गुप्त आहे. याला जाणून घेण्यासाठी अधिक तयारी लागते. नवविधा भक्ति पहिल्यापासून शेवटपर्यंत करायला लागते. तरच आत्म्याविषयी श्रवण होऊ शकते. नचिकेता यमराजांकडे आत्मविचार ऐकण्यासाठी गेला. यमराजांनी नाना प्रलोभने दाखवून नचिकेताला आत्मज्ञान मिळवण्यापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला.

शतायुषः पुत्रपौत्रान् वृणीष्व बहून पशून हस्तिहिरण्यमश्वान् ।
भूमेर्महदायतनं वृणीष्व स्वयं च जीव शरदो यावदिच्छसि ॥
इमा रामाः सरथाः सतूर्या न हीदृशा लम्भनीया मनुष्यैः ।
आभिर्मत्प्रत्ताभिः परिचारयस्व नचिकेतो मरणं मानुप्राक्षीः ॥

पण नचिकेताने सगळ्या गोष्टी बाजूला सारून आत्मज्ञानाचा हट्ट धरला.

श्वोभावा मर्त्यस्य यदन्तकैतत् सर्वेन्द्रियाणां जरयन्ति तेजः ।
अपि सर्वं जीवितमल्पमेव तवैव वाहास्तव नृत्यगीते ॥

"या देहाला मृत्यु आहे मग बाकीच्या गोष्टींची काय किंमत! मला आत्मरूप होण्याचे ज्ञान पाहिजे." नचिकेता यमराजांना म्हणाला.

'अध्यात्म श्रवण करा' असे सांगणे म्हणजे 'अध्यात्म श्रवणाचे अधिकारी व्हा' असे पर्यायाने समर्थांचे सांगणे आहे. अध्यात्माचा विचारच ज्यांच्या मनात नाही त्यांना अध्यात्मश्रवण घडत नाही. येथे जमलेले सर्व श्रोते अध्यात्माचे अधिकारी आहेत म्हणून ही ओवी घेतली. भगवद्‌गीता सांगताना ज्ञानेश्वर महाराजांनी हेच सांगितले.

जें अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभविजे संतीं ।
सोऽहं भावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥ ज्ञा. १-५३
जें आकर्णिजे भक्तीं ॥

जे भक्त आहेत त्यांनी भगवद्‌गीता ऐकायची. तसे अध्यात्मश्रवण जे भक्त, योगी, ज्ञानी आहेत, निदान जे साधक आहेत त्यांनी करावे.

आधी अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन ।

अध्यात्मश्रवण झाल्यावर एक औत्सुक्य असते की आता आत्मज्ञान व्हायला पाहिजे. त्यासाठी श्रवण पुन्हापुन्हा तेच करायचे असते. त्याला दुसरा मार्गच नाही. समर्थ म्हणतात –

सेविलेंच सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवण मनन । केलेंचि करावें ।। दा. ७-८-४७

'आवृत्तिरसकृदुपदेशात्' असे ब्रह्मसूत्रच आहे. पुन्हापुन्हा आवृत्ति करावी. एकदा श्रवण केल्याबरोबर 'मी आत्मज्ञानी आहे' असे म्हणून उठणारे एकच झाले ते म्हणजे ज्ञानेश्वर महाराज!

कानावचनाचिये भेटी – । सरिसाचि पैं किरीटी ।
वस्तु होऊनि उठी । कवणि एकु जो ।। ज्ञा. ९-९९१

असे क्वचित होते. बहुतेक वेळा श्रवण झाले, मार्ग कळला तरी नेमका मार्ग जाणून घेण्यासाठी सद्गुरूंना शरण जावे लागते.

सद्गुरु ब्रह्मनिष्ठ, श्रोत्रिय पाहिजेत. शिष्यांच्या नाना शंका असतात. त्याचे समाधान सद्गुरूंना करता आले पाहिजे. ते ज्ञानाचे अधिकारी असावेत. मग –

तरी गुरु दाविलीया वाटा । येऊनि विवेकतीर्थतटा ।
धुऊनिया मळकटा । बुद्धीचा तेणें ।। ज्ञा. १८-१०११

असे करायला लागते. सद्गुरूंची लक्षणे सांगताना समर्थ म्हणतात –

म्हणोनि ज्ञान वैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन ।
कथा निरूपण श्रवण मनन । नीति न्याये मर्यादा ।। दा. ५-२-५२
यामधें एक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणौन सर्वहि विलसे । सद्गुरुपासीं ।। दा. ५-२-५३

सद्गुरु बाहेर सामान्यासारखे दिसतात. पण आत अखंड स्वरूपाचे अनुसंधान असते. तोच मी आहे, सच्चिदानंदच मी, देहसंघाताकडून होणाऱ्या सर्व कर्मांचा मी साक्षी आहे. तांबड्या मखमलीवर स्फटिकाचा खडा ठेवला म्हणजे तो जसा तांबडा दिसतो तसा मी देहमनबुद्धीच्या संयोगामुळे कधी कामी, क्रोधी, लोभी दिसतो. पण त्याचा माझ्याशी तिळमात्र संबंध नाही. असे पूर्ण बोधावर असलेले जे सद्गुरु असतात, तेच शिष्याला बोध देऊ शकतात. त्यांची सेवा करावी. पाच दहा वर्षे श्रवण घडले, त्याची गोडी लागली, आत्मज्ञानाची तळमळ लागली की मग जाऊन सद्गुरूंची भेट घ्यावी, त्यांची सेवा करावी.

शैले शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे ।

साधवो न हि सर्वत्र चन्दनं न वने वने ।।

वाटेल त्याला सद्‌गुरु म्हणता येत नाही. सद्‌गुरूंची परीक्षाच घ्यावी. त्यांच्या मनामध्ये काय इच्छा आहे ते समजून घ्यावे. त्यांचे अंतर वैराग्याने भरलेले आहे की नाही? प्रपंचामधून ते मोकळे आहेत की नाही? अलिप्त आहेत की नाही ते पहावे.

तोही नेत्रीं पाहे । श्रवणीं ऐकतु आहे ।
परि तेथींचा सर्वथा नोहे । नवल देखें ।। ज्ञा. ५-४१

असे सद्‌गुरु पूर्ण बोधावर असतात. सर्व व्यवहार करत असताना पूर्ण अलिप्त असतात. अशी सद्‌गुरूंची लक्षणे सत्‌शिष्याने पारखून घ्यावीत. मग एकदा सद्‌गुरु केले की मग कदापि त्यांच्यापासून वेगळे व्हायचे नाही. ते म्हणतील ते करायचे. केवळ ग्रंथ एवढाच गुरु होऊ शकत नाही.

पुस्तकज्ञानें निश्चये धरणें । तरी गुरु कासया करणें ।
याकारणें विवरणें । आपुल्या प्रत्यये ।। दा. १२-७-३०

उपनिषदे, भगवद्‌गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी, पंचदशी, ब्रह्मसूत्रे, योगसूत्रे सर्व ग्रंथ असले तरी मार्गदर्शनासाठी प्रत्यक्ष सद्‌गुरु समोर पाहिजेत. सद्‌गुरुकृपा झाल्याशिवाय ग्रंथाचा अर्थ कळत नाही.

भांडारगृहें भरलीं । परी असती आडकिलीं ।
हातास न येता किली । सर्वही अप्राप्त ।। दा. ७-२-१३
सद्‌गुरुकृपा तेचि किली । जेणें बुद्धि प्रकाशली ।
द्वैतकपाटें उघडलीं । येकसरीं ।। दा. ७-२-१५

पण ही सद्‌गुरुकृपा केव्हा होते?

सद्‌गुरुकृपा कळे त्यासी । जो शोधील आपणासी ।
पुढें कळें अनुभवासी । आपेंआप वस्तु ।। दा. ६-१०-११

स्वामी स्वरूपानंद म्हणत – "सद्‌गुरुकृपा कशी होते हे कळायला वीस वर्षे लागतात, असा माझा अनुभव आहे." म्हणजे जे पूर्ण ब्रह्मज्ञानी, मुळात अत्यंत सत्त्वगुणी प्रकृती त्यांना सद्‌गुरुकृपा कळायला वीस वर्षे लागली असे म्हणतात. ज्ञानदेवांना तत्काळ बोध झाला असे दिसले तरी त्यांनीच म्हटले आहे –

तेणें बहुतीं जन्मीं मागिलीं । विक्षेपांचीं पाणिवळें झाडिलीं ।

म्हणोनि उपजतखेंवो बुडाली । लग्नघटिका ।। ज्ञा. ६-४७१
अनेक जन्म साधना घडली, म्हणून मला ताबडतोब ज्ञान झाले. एऱ्हवी आत्मज्ञान तत्काळ होणे शक्य नाही. त्यासाठी 'सद्‌गुरु पादसेवन' करावे लागते. पादसेवन म्हणजे सद्‌गुरूंचे पाय चेपणे, डोके चेपणे नव्हे. ती सेवा अत्यंत गौण आहे.

एका सद्‌गुरूंचे दोन शिष्य नित्य त्यांच्या जवळ राहून त्यांची सेवा करत होते. एक शिष्य त्यांचे उजवे अंग चेपत असे, एक डावे अंग चेपत असे. एक दिवस उजवे अंग चेपणारा शिष्य गैरहजर राहिला. तेव्हा सद्‌गुरूंनी सांगितले, "आज उजवे अंग तूच चेप." त्यावर त्या शिष्यांनी सद्‌गुरूंचे डावे अंग नित्याप्रमाणे चांगले चेपले. पण उजवे अंग दातओठ खाऊन चेपले. कारण ती आपली बाजू नव्हती. शेवटी सद्‌गुरु त्याला म्हणाले, "बाबा रे! ही सेवा पुरे." दुसरे दिवशी दुसरा शिष्य आला. सद्‌गुरूंनी त्याला आदल्या दिवसाची हकिकत सांगितली. त्याबरोबर तो शिष्य रागावून म्हणाला, "असे त्याने केले काय? मी बघून घेतो." शेवटी सद्‌गुरु म्हणाले, "तुमची सेवा आता पुरे." म्हणून असे 'सद्‌गुरु पादसेवन' होऊ शकत नाही.

एका टेकडीवर एक सद्‌गुरु रहात होते. त्यांना दमा होता. एक दिवस रात्री बारा वाजताच त्यांना दम्याचा खूप त्रास व्हायला लागला. म्हणून त्यांनी एका शिष्याला बोलावून सांगितले, टेकडीच्या पायथ्याशी एक व्यक्ति रहाते. तिच्या कडून एक विशिष्ट पद्धतीने तयार केलेले पान घेऊन ये. त्याने माझा दमा कमी होईल." ते ऐकून तो शिष्य म्हणाला, "आपले चरण सोडून कसा जाऊ?" सद्‌गुरु काय ते समजले. त्यांनी दुसऱ्या शिष्याला पान आणण्यास सांगितले. त्याप्रमाणे दुसरा शिष्य ताबडतोब टेकडी उतरून पान घेऊन आला.

त्यानंतर काही दिवसांनी गावातील एक श्रीमंत गृहस्थ सद्‌गुरूंना आपल्याकडे भोजनाला बोलविण्यास आले. सद्‌गुरूंजवळ दोन्ही शिष्य होतेच. सद्‌गुरु त्या गृहस्थांना म्हणाले, "मी कोठेही भोजनाला जात नाही. पण माझे हे शिष्य आहेत. यांच्यापैकी एकजण येईल. सद्‌गुरूंनी दोन्ही शिष्यांकडे पाहिले. एक शिष्य म्हणाला, "मी येथे आपल्याजवळ राहतो."

दुसरा शिष्य जो पूर्वी टेकडी उतरून औषध आणायला तयार नव्हता तो भोजनाचे निमंत्रण स्वीकारायला ताबडतोब तयार झाला. तो म्हणाला, "आपली आज्ञा कशी मोडू?" मग पहिली आज्ञा नव्हती का?

सद्‌गुरु पादसेवन म्हणजे सद्‌गुरूंनी जे सांगितले ते करणे. त्यांनी सांगितले 'श्रीराम जय राम जय जय राम' म्हण. तर रात्रंदिवस नाम चालू पाहिजे. त्याचा ध्यास घेतला पाहिजे. आपल्याला परमार्थामध्ये जर काही उंची गाठायची असेल, नरजन्म सार्थक करून घ्यायचा असेल तर सद्‌गुरु सांगतील त्याप्रमाणे साधना करायला पाहिजे. नरजन्म ही पुन्हापुन्हा मिळणारी गोष्ट नाही.

वरकड देहे हें काबाड । नरदेह मोठें घबाड ।
परंतु पाहिजे जाड । विवेक रचना ।। दा. २०-५-२६

आत्मानात्म विवेक पाहिजे. आत्मा कोण, अनात्मा कोण हा जर विवेक नसेल तर नरजन्म वाया जातो.

नरदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं सुकल्पं गुरुकर्णधारं ।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा ।।

तो आत्मघातकीच आहे. समर्थांनी आत्महत्यारा असा शब्द वापरला आहे. याचा अर्थच असा की या नरजन्मात येऊन जर आपणाला तरून जायचे असेल तर या पद्धतीने जायला पाहिजे. 'आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन ।' सद्‌गुरूंची सेवा करताना कदापि कंटाळा येता कामा नये. त्यासाठी प्रथम सद्‌गुरूंचा शोध घ्यायला पाहिजे. सद्‌गुरु आपोआप समोर येऊन उभे रहात नाहीत. 'सद्‌गुरु आपैसा भेटेचि गा' असे ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले असले तरी आपण त्या भ्रमात राहू नका. त्यांचा विचार फार वेगळा आहे. काही मंडळी तेवढेच लक्षात ठेवून सद्‌गुरु आपोआप भेटतील असे समजतात. ते खरे नाही.

एकदा एका ऐंशी वर्षाच्या वृद्ध गृहस्थाने मला प्रश्न विचारला. किती अज्ञान असते ते पहा. ते म्हणाले, "'जो जे वांछील तो ते लाहो' असे ज्ञानेश्वर महाराजांनी म्हटले आहे. आम्ही जन्मभर ज्ञानेश्वरी वाचत आलो. पण आमची एकही इच्छा पूर्ण झाली नाही हे काय?" मी त्यांना म्हटले, "त्याच्या पूर्वीच्या ओव्या वाचा. 'दुरिताचे तिमिर जावो.' तो

पापाचा अंधकार फिटला का? मग 'जो जे वांछील तो ते लाहो' पथ्य पाळले का? पथ्य नसेल तर औषधाचा उपयोग काय? ज्यांनी पहिले सगळे केले असेल त्यांना ज्ञानेश्वरांचे वचन प्रमाण. पण मग तो मागणारच नाही दुसरे काही. तो म्हणेल, "मला आत्मसाक्षात्कार होऊ दे. देव कोण ते कळू दे. गीता, ज्ञानेश्वरी, दासबोधाचा अर्थ कळू दे." असे त्याचे मागणे असेल आणि अशा मागण्या तृप्त करण्याचे सामर्थ्य या संतांजवळ असते.

एकदा एक भगिनी माझ्याकडे आल्या आणि म्हणाल्या, "मी पावसला जाणार आहे. पण तेथे स्वामी स्वरूपानंद फारसे बोलत नाहीत असे कळले." मी म्हटले, "हो. पण आपली अडचण काय आहे? परमार्थातील काही विचारायचे आहे का?" त्या म्हणाल्या, "परमार्थ जाऊ द्या हो! पण माझे आणि यजमानांचे अजिबात पटत नाही, त्यासंबंधी विचारायचे आहे." त्या भगिनी अत्यंत श्रीमंत होत्या. बंगला, गाड्या सर्व होते. पण ते पतिपत्नी एकमेकांसमोर आले की बिनसायचे. मी त्यांना म्हटले, "हा प्रश्न स्वामीजी सोडवणार नाहीत. ते म्हणतील, 'तुम्ही परमेश्वराचे नाम घ्या.' ध्यानाला बसा. तुमचे पाहून कदाचित् तुमचे यजमानदेखील शांतपणे ध्यानाला बसतील. दोघांचे मन पालटेल. संघर्ष मिटेल."

सद्‌गुरुंपाशी गेल्यावर आपण काय मागायचे ते कळले पाहिजे. "मी कोण आहे? परमात्मा कोण आहे? परमात्मा आणि मी एकच आहे असे सर्व संत सांगतात त्याची अनुभूती मला द्या." असे मागावे.

देवपद आहे निर्गुण । देवपदीं अनन्यपण ।
हाचि अर्थ पाहतां पूर्ण । समाधान बाणे ।। दा. ६-६-३२

देव निर्गुण आहे. मीही तोच आहे. हे अनुसंधान कदापिही ढिले होता कामा नये. मी सच्चिदानंद आहे अशा बोधात रहायचे तर ते याच जन्मात.

याचि देही याचि डोळा । पाहे मुक्तीचा सोहळा ।

म्हणून सद्‌गुरूंना शरण जावे.

आधीं अध्यात्मश्रवण । मग सद्‌गुरुपादसेवन ।
पुढें आत्मनिवेदन । सद्‌गुरुप्रसादें ।। दा. ६-२-४०

सद्‌गुरूंची सेवा करत असता त्यांचा प्रसाद प्राप्त होतो. सत्यनारायणाचा प्रसाद वेगळा. लोक पोथीला न जाता प्रसादाला जातात. असत्य भाषणाने काय होते ते पोथीत सांगितले आहे. 'नेहमी सत्य बोलावे' हा त्याचा मतितार्थ आहे.

सद्‌गुरुकृपा झाल्यानंतर प्रथम लक्षात येते ते 'तो आणि मी एकरूप आहे. विभक्त नाही.'

आत्मनिवेदनाचें लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।
मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ।। दा. ८-८-१३
आपला आपणास लाभ । हें ज्ञान परम दुल्लभ ।
जें आदिअंती स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ।। दा. ५-६-१५

त्याला स्वरूपानंद प्राप्त होणारच. सद्‌गुरूंची प्रसन्नता केव्हा प्राप्त होते?

मग अभिन्ना इया सेवा । चित्त मियांचि भरेल जेव्हां ।
माझा प्रसादु जाण तेव्हां । संपूर्ण जाहला ।। ज्ञा. १८-१२६९

अभिन्न सेवा म्हणजे आत्मनिवेदन.

आत्मनिवेदना उपरी । निखळ वस्तु निरंतरी ।
आपण आत्मा अंतरी – । बोध जाला ।। दा. ६-२-४१
त्या ब्रह्मबोधें ब्रह्मचि जाला । संसारखेद तो उडाला ।
देहो प्रारब्धीं टाकिला । सावकाश ।। दा. ६-२-४२
यासी म्हणिजे आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
परब्रह्मीं अभिन्न । भक्तचि जाला ।। दा. ६-२-४३
आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां ।
तुटली मनातील आशंका । जन्ममृत्याची ।। दा. ६-२-४४
संसारीं पुंडावें चुकलें । देवां भक्तां ऐक्य जालें ।
मुख्य देवास वोळखिलें । सत्संगेकरूनि ।। दा. ६-२-४५

ॐ तत् सत्

जय जय रघुवीर समर्थ

●

**३.   तस्मात् विचार करावा। देव कोण तो वोळखावा।**
**आपला आपण शोध घ्यावा। अंतर्यामीं॥** दा. ४-९-७
**मी कोण ऐसा निवाडा। पाहों जाता तत्त्वझाडा।**
**विचार करितां उघडा। आपण नाहीं॥** दा. ४-९-८
**तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे। तेव्हां आपण कैंचा उरे।**
**आत्मनिवेदन येणेंप्रकारें। सहजचि जालें॥** दा. ४-९-९

**[स्वामी माधवनाथ यांचे 'सत्य साई निलयम्' पुणे या वास्तूतील नित्याचे प्रवचन]**

दासबोध चौथा दशक, नववा समास चालू आहे. आत्मनिवेदन भक्ति. 'श्रवणं कीर्तनं' पासून भक्तीचे प्रकार सुरू झाले. ते 'आत्मनिवेदना'मध्ये परिणत झाले, परिपूर्ण झाले. आत्मनिवेदन ही मुख्य भक्ति आहे असे समर्थ समजतात. आत्मनिवेदन याचा थोडक्यात अर्थ आपण देहाने न उरणे. माझा देह, माझे मन, माझी बुद्धि, माझ्या बुद्धीला हे पटत नाही असे आपण म्हणत असतो. म्हणजे देह मन बुद्धीपेक्षा मी कोणीतरी वेगळा आहे, असे आपण समजतो.

परवा एक वृद्ध भगिनी भेटल्या. सत्तरी ओलांडलेल्या. वृद्धपणाची सर्व चिन्हे देहावर दिसू लागली होती. त्यांनी मला विचारले, "मी आता काय साधना करू?" मी त्यांना म्हटले, "आता साधना अशी काही करणे शक्य होणार नाही. योगाचा अभ्यास आता जमणार नाही. ज्ञान सोऽहं – तोच मी या बोधात येणे आता शक्य नाही. त्याचा सराव लहानपणापासून करायला पाहिजे. त्यासाठी पथ्यपाणी पाळले पाहिजे. आता ते होणार नाही. तेव्हा सोपा उपाय म्हणजे रामनाम घ्या." त्या म्हणाल्या, "तेथे मन जडत नाही. त्या शंबूकाला रामाने मारले हे माझ्या बुद्धीला पटत नाही." आता आली पंचाईत. मी म्हटले, "इतर साधना जमणार नाहीत, म्हणून मी तुम्हाला नाम घ्यायला सांगितले. परंतु रामनाम घेणे तुमच्या बुद्धीला पटत नाही. राम म्हणजे तुम्ही एखादी मनुष्याकृति समजलात का? एखादा ठराविक आकार, स्वभाव असे समजलात का?" भगवंत म्हणतात –

अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ।
परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ।। भ. गीता ९-११

मी जरी मनुष्याकृति धारण केली असली तरी मी परमात्माच आहे हे पुष्कळ मूढ लोकांना कळत नाही. हा भगवद्‌गीतेतील श्लोक त्यांना सांगितला. विनोबाजींचे वचन सांगितले, 'दशरथाने आपल्या पुत्राला ज्याचे नांव ठेवले तो राम.' समर्थांनी सांगितले –

ऐसा सर्वात्मा श्रीराम । सगुण निर्गुण पूर्णकाम ।
उपमाच नाही निरोपम । रूप जयाचें ।। आत्माराम

सर्वात्मा, अंतर्यामी असलेला आत्माराम तोच हा दृश्य राम. रामाने कुणाला मारले हे आपल्याला काय करायचे? आपला मृत्यु जवळ आला. आपण पुढे काय करायचे ते ठरवावे. वाल्ह्यापासून स्वरूपानंदांपर्यंत हजारो लोक राम राम म्हणून मुक्त झाले. मग आपल्या बुद्धीत शंका का येते? त्या काळात जो प्रघात होता, जी आश्रम व्यवस्था होती त्याप्रमाणे त्यांनी केले. आता आपण त्याला कसोट्या लावून त्याचे ते मनुष्यकर्म मानून तो मनुष्यच होता, देव नव्हता; तो मनुष्य, मीही मनुष्य असे म्हणणार का? ही काय बुद्धि? अशी ही आपली बुद्धि, असे हे मन, असा हा देह. आता परमार्थ कुठला? राम कुठला?

आत्मनिवेदन म्हणजे देह मन बुद्धीने न उरणे. माझे हे मत आहे, मला असे वाटते हे न बोलणे. "परमेश्वरा! तुझेच सारे आहे. ही बुद्धीही तुझीच. मी जे काय चांगले वाईट बोलत असेन ते सर्व तू जाण, तू काय ते समज. माझे मन पूर्वजन्मींच्या संस्कारानुसार काय ते बनले आहे. तू समजून घे. माझे मन ठीक नाही हे मला कळते. परंतु तू पुरुषोत्तम - उत्तम पुरुष आहेस. मी तुला शरण आलेलो आहे. 'पतितपावन' असे तुझे नाम आहे. मी पतित असलो तरी मला पावन करायला तू समर्थ आहेस." असे म्हणत परमेश्वराच्या चरणी शरणागत होणे. 'मी कोणी नाही' असे समजणे, ही आत्मनिवेदनाची पहिली स्थिती आहे; आणि मग त्या पलिकडे जाऊन शरणागती –

तया अहं वाचा चित्त आंग । देऊनियां शरण रिग ।
महोदधी का गांग । रिगालें जैसें ।। ज्ञा. १८-१३१९

ही आत्मनिवेदनाची शेवटची अवस्था. आत्मनिवेदन म्हणजे मी न उरणे. समर्थ आपल्या खास शैलीमध्ये 'आपण कैचा', 'आपण कैचा' असे प्रत्येक ओवीमध्ये म्हणतात.

तत्त्वें तत्त्व जेव्हां सरे । तेव्हा आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन येणेंप्रकारें । सहजचि जालें ।। दा. ४-९-९

'तत्त्वांचे गांठोडे' हे शरीर आहे. तत्त्वात तत्त्व मिसळले म्हणजे आपण कुठे उरतो? म्हणून आत्मनिवेदन आपोआपच आहे असे समर्थ म्हणतात. पण आपल्याला ते मान्य नाही. आपल्याला हे शरीर एवढे मोठे वाटते की ते पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश आहे असे कोणी म्हणायला लागले तर आपण म्हणू "छे! छे! माझे शरीर बघा. दूध, तूप, लोणी, शुद्ध आहार विहार याने कसे सुंदर बनले आहे. मला काही झालेले नाही." असा शरीराचा वृथा अभिमान आपल्याला आहे. पण शरीर हे नाशवंत आहे. 'माशी पांख पांखडी तंव हे सरे' यामध्ये शंका बाळगण्याचे काय कारण? 'काल होते, आज नाही' असे घडते. साऱ्या संतांनी हेच सांगितले. आपला अनुभवही तोच आहे. शास्त्रेही तेच सांगतात. मग त्या शरीराची एवढी मिजास कशाला? समर्थ सांगतात –

तत्त्वें तत्त्व मेळविलें । त्यासी देह हें नाम ठेविलें ।
तें जाणते पुरुषीं शोधिलें । तत्त्वें तत्त्व ।। दा. ६-३-२०

हे तत्त्व जेव्हा सरते तेव्हा आपण 'कैंचा उरे' – कुठे उरतो? किती गोड सांगितले? खरं तर मला नेहमी वाटते हे ग्रंथ आपल्या जीवनात आपल्याला इतके सांभाळून नेतात तरी आपण सांभाळले जात नाही हे काय तंत्र आहे कळत नाही. आपली अशी बुद्धि कोणी केली कोणास ठाऊक? बहुधा आपले जन्मजन्मांचे संस्कार त्याला कारण आहेत.

तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ।। दा. ४-९-१०

जगताचा सर्व पसारा तत्त्वरूप आहे. 'तत् पाञ्चभौतिकं राम षष्ठं किञ्चित् न विद्यते' हे सगळे पांचभौतिक आहे. सहावे काही येथे नाही. असे वसिष्ठ ऋषि जेव्हा रामचंद्रांना उपदेश करतात तेव्हा सांगतात.

देह तंव पांचांचें जालें । हें कर्माचें गुणीं गुंथलें ।

भवतसें चाकीं सूदलें । जन्ममृत्यूच्या ।। ज्ञा. १३-११०३
जन्ममृत्यूची जी चक्रे फिरतात त्यावर जणू हा देह घातलेला आहे. हे जन्ममृत्यु असू देत. जीवनाचा शेवट मृत्यूमध्ये आहे हे सर्वांना पटलेले आहे. पण तोपर्यंत जीवन कसे घालवायचे हा प्रश्न आहे. लोक विचारतात, "What is after death?" संत सांगतात, "What is before death याचा विचार करा." मृत्युपर्यंत जीवन जर उत्तम घालवले, व्यवहार उत्तम केला, लोकांशी चांगले वागणे घडले, ध्यानधारणा, नामस्मरण केले, सद्‌गुरुकृपा संपादन केली, सद्‌गुरूंनी सांगितलेल्या मार्गाने चालायला लागला, उपनिषदे, भगवद्‌गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध आदि ग्रंथांचे वाचन केले. शास्त्रांनी जे सांगितले तेच माझ्या सद्‌गुरूंनी सांगितले, तेच मी करतो आहे आणि माझीही तीच अनुभूति आहे असे झाले की संपले.

एक संपूर्ण गंगेचा प्रवाह चालत आलेला आहे, असा जीवाचा प्रवाह आहे. गंगेच्या काठी उभे असताना एकदा रामकृष्ण म्हणाले, "नदीतून एखादा लाकडाचा ओंडका वहात येताना दिसतो. तो आपल्याला दिसतो त्यापूर्वी शेकडो मैल तो वहात आलेला असतो आणि आपल्या दृष्टीआड झाल्यानंतरही तो शेकडो मैल वहात जातो. त्याचा प्रवास अनुस्यूतच आहे. तो दिसायला लागला की त्याला आपण 'जन्म' म्हणतो, तो दृष्टिआड झाला की 'मृत्यु' असे समजतो. वस्तुतः असे काही नाही. जी तुम्ही मंडळी परमार्थ करता आहात ती काही आकाशातून एकदम आलेली नाहीत. ती या मार्गाने काही जन्म चालत आली ती आता येथे आली. आपण म्हणतो याचा जन्म इ. स. १९५० चा. पण त्यापूर्वी तो चालत आला आहे आणि पुढेही चालत राहणार आहे. मधल्या काळात – सध्याच्या जीवनात त्याने काय करावे हा प्रश्न आहे. समर्थ म्हणतात, "आपण उरू नव्हे म्हणजे आत्मनिवेदन झाले."

त्यासाठी प्रत्येक कर्म केले की 'ॐ तत् सत् ब्रह्मार्पणमस्तु' म्हणून परमेश्वराला ते अर्पण करावे. त्याचा आपल्याला लेप लागता कामा नये.

एकदा एका साधकाने एकेक रुपया वर्गणी काढून एक सुंदर मंदिर बांधले. त्याच्या उद्‌घाटनाला आपल्या सद्‌गुरूंना बोलावले. सर्व समारंभ उत्तम प्रकारे पार पडला. नंतर तो साधक सद्‌गुरूंना म्हणाला, "आता मी

काय करावे?" सद्गुरु म्हणाले, "खूप कष्ट घेऊन मी हे मंदिर बांधले हे विसरावे. जणू काही झालेच नाही असे असावे." पण सगळ्यात अवघड ही गोष्ट आहे. आपल्या मानमरातबाच्या काही कल्पना असतात. त्यामुळे कुणी मान दिला नाही की वाईट वाटते, राग येतो.

तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ।। दा. ४-९-१०

सगळा पांचभौतिकाचा पसारा आहे. विवेकाने त्याकडे पहायला गेले की काय होते? नाना प्रकारची माणसे, पशु, झाडेझुडपे दिसतात. पण विचारपूर्वक पाहिले तर लक्षात येते की हा नुसता आभास आहे. एखादे मूल जन्माला आले, चळवळ करायला लागले की त्याला 'आला' असे म्हणतात. ती चळवळ बंद झाली की 'गेला' असे म्हणतात.

एखादा कोणी ज्ञानी झाला तर तो म्हणेल, "मी जन्मालाच आलो नाही. तेव्हा मला मृत्यूही नाही. मी बद्धच नाही, तेव्हा मला मुक्त होण्याचाही प्रश्न नाही. मी अखंड, अनुस्यूत, माझ्या आनंदात सच्चिदानंदरूपाने स्थित आहे. मी सच्चिदानंदच आहे. माझ्यात दिसणारे काम, क्रोध, मत्सर, दंभ हे सगळे प्रकृतीचे खेळ असून मी स्वतःला या प्रकृतीपासून केव्हाच अलग केले आहे. काय अवघड आहे यात? पण प्रत्यक्षात अवघड झाले आहे खरे. व्यासांपासून सर्व संत सांगत आले. 'तत त्वम् असि' 'तेच तू आहेस.' म्हण 'अहं ब्रह्मास्मि' वेदान्तामध्ये सर्वात मोठी आंतरिक साधना सांगितली आहे, ती म्हणजे 'अहं ब्रह्मास्मि' यालाच 'अहं ग्रहोपासना' म्हणतात. मीच ब्रह्म आहे. वेदान्ताच्या साधनेच्या ज्या कल्पना आहेत त्यात आठ तऱ्हेच्या आंतरिक साधना सांगितल्या आहेत. त्या म्हणजे विवेक, वैराग्य, शमदमादि साधनसंपत्ति आणि मुमुक्षत्व; श्रवण, मनन, निदिध्यासन आणि तत् त्वम् पदार्थचिंतन. अशा त्या आठ आहेत. या आठात विशेष अंतरंग साधना म्हणजे 'तत् त्वम् पदार्थ चिंतन' तेच तू आहेस.

यात 'तत्'चा वाच्यार्थ आहे 'ईश्वर,' लक्षार्थ आहे 'ब्रह्म'. 'त्वम'चा वाच्यार्थ आहे 'जीव', लक्षार्थ आहे 'कूटस्थ'. 'कूटस्थ' आणि 'ब्रह्म' हे एकरूप आहेत असे आपण सद्गुरूंकडून, आपल्या अनुभवाने समजून

घेणे आणि त्याप्रमाणे साधना करणे ही अगदी अंतरंगातील अंतरंग साधना म्हणून वेदान्त समजतो; आणि याच साधना संतांच्या वाङ्मयातही आहेत. पण जर हे 'तत् त्वम् असि' कळले नाही तर काय करावे? मग दुसऱ्या साधना आहेत. ध्यानाला बसावे. ध्यान जमत नसेल तर नामस्मरण करावे. इतर साधना कराव्या. कोणतीही साधना केली तरी शेवटी 'तत् त्वम् असि' यावरच जाता येते. 'तोच मी आहे' या बोधातच आपण जाणार. 'राम राम' म्हणत असताना तो 'रामच' होऊन जातो. विचार करावा. विचार केला की तत्त्वे रहात नाहीत. ही जी तत्त्वे पसरलेली आहेत त्यामुळे हा विश्वाचा आभास आहे. हे विश्व आभासित आहे याविषयीच जर शंका असेल तर गोष्ट निराळी. पण विश्वाचा आभास दिसतो हे जर खरे असेल तर काही थोडे ज्ञान आणि बरेचसे अज्ञान यामुळे तो दिसतो. जसा थोडा प्रकाश आणि बराचसा अंधार असेल तर रज्जूवर सर्प दिसतो.

मी जंजिऱ्याला शिकायला होतो. त्यावेळी मी दहा बारा वर्षाचा असेन. समुद्र किनारा जवळ होता. रोज रात्री आठ साडेआठला जेवण झाले की आम्ही काही विद्यार्थी त्या किनाऱ्यावर जाऊन वाळवंटात शांत पडत असू. सागराचा तो घनगंभीर आवाज. खूप छान वाटत असे. दुपारी शाळेच्या मधल्या सुट्टीत आम्ही बरेच वेळा त्या किनाऱ्यावर जात असू. त्यावेळेला त्या उन्हात वाळवंटातील शिंपले रुप्यासमान भासत असत. आता हे रुपे आले कुठून? तर आमचीच भ्रांती, आमचेच अज्ञान यातून रुपे निर्माण झाले. मुळात रुपे नाही शिंपीच आहे. तसे सर्प नाही, रज्जूच आहे. दोरीवर जसा सर्प आभासित आहे, तसा मुळात विश्व या नांवाचा पदार्थ नाही, परमात्माच आहे. त्याच्यावर विश्वाचा आभास आहे. त्याला वेदान्ताचा शब्द 'अध्यास' आहे. म्हणजे विश्व खोटे आहे, आरोपित आहे. मग जर हे आरोपित आहे तर ते कुठून आले, कसे आले याचा विचार तरी कशाला करावा? विचार करू नये हे चांगले. पण तो भास इतका जबरदस्त आहे की ते कसे आले याचा विचार करावा लागतो. मग सांगावे लागते की आपल्या अज्ञानाने, भ्रांतीने हे विश्व दिसते आहे. मुळात ते नाही.

येक परब्रह्म संचलें । कदापि नाहीं विकारलें ।

त्यावेगळें भासलें । तें भ्रमरूप ।। दा. १०-६-९

परमात्म्यावेगळा तुला जो भास होतो आहे तो भ्रमरूप आहे. आता भास निर्माण कसा झाला असे जर विचारशील तर ही जी पंचमहाभूते निर्माण झाली त्यातून हा आभास निर्माण झाला. नीट विचार केला तर हा विश्वाचा आभास संपेल आणि मूळ जो परमात्मा तेथे बुद्धि जाईल.

तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहातां निरसे ।

सर्व भास पंचमहाभूतांचा असून तू विवेक कर. आत्मा कोण, अनात्मा कोण? सार काय असार काय? सार एक परमात्माच आहे. जे तुला दिसते ते असार, नाश पावणारे आहे. 'यद्दष्टंतन्नष्टं' ही स्थिती आहे. पण कोणालाही कितीही सांगितले तरी लक्षात येत नाही. अनेक भगिनी अंतकाळी म्हणतात, 'माझे माझे भ्रांतीचे ओझे' म्हणजे शेवटी कळते की हे भ्रांतीचे ओझे आहे. वस्तुतः आधी लक्षात यावे की आपली चाळीशी उलटून गेली. आता तरी हरिस्मरण करावे म्हणजे हे भ्रांतीचे ओझे आपोआप नष्ट होईल. हे विश्व आभासित आहे, असत् आहे असे संतांनी कितीही सांगितले तरी आपल्याला ते खरेच वाटते. ही खरेपणाची जी भ्रांती ती जायलाच नामस्मरण करायला पाहिजे. परमेश्वर प्राप्तीसाठी एकही साधना नाही. कारण आपण स्वतःच परमात्मा आहोत. पण आपल्या आणि परमात्म्याच्या आड येते आहे ते हे विश्व.

अगा पैं पंडुकुमरा । येतां स्वरूपाचिया घरा ।
करीतसे आडवारा । विश्वाभासु जो ।। ज्ञा. १५-४६

भगवंत म्हणतात, "अरे अर्जुना, तू जर स्वरूपबोधावर यायला लागलास तर तुला अडथळा करणारा हा विश्वाचा आभास आहे.

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा
गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ।
अधश्च मूलान्यनुसंततानि
कर्मानुबन्धीनि मनुष्यलोके ।। भ. गीता १५-२

वर ब्रह्मदेवापासून खाली स्थावर जंगमापर्यंत आणि मध्ये ती सगळी माणसे असा तो संसारवृक्ष तुटायचा कसा?

असङ्गशस्त्रेण दृढेन छित्त्वा ।।

तुझा त्याच्याशी संबंधच नाही हे तू समजून घे. विवेक कर. विचार कर." हा जर वृक्ष खरा असता तर एवढा मोठा प्रचंड वृक्ष उलथून टाकणे, तोडणे कोणाला शक्य झाले असते? दहाही दिशा, चंद्रसूर्य, सर्व देव, ऋषिमुनी, यक्ष, गंधर्व, किन्नर आणि आपल्यासारखी माणसे, स्थावर जंगम सर्व गोष्टी ज्या वृक्षामध्ये आहेत असा हा वृक्ष तुटणार कशाने?

जे तुटलिया मुळापाशीं । उलंडेल कां शाखांशीं ।
परी तैशी गोठी कायसी । हा सोपा नव्हे ॥ ज्ञा. १५-५०

असे ज्ञानोबा म्हणतात. म्हणजे हा वृक्ष खरा नव्हे. मग या असत्‌शी तुझा संग जडतो कसा? तेव्हा माझा या विश्वाशी यत्किंचित्‌ही संबंध नाही. मी परमात्माच आहे अशा बोधात तू रहा; आणि मग त्या परमधामाला जायचे आहे.

ततः पदं तत्परिमार्गितव्यं
यस्मिन्गता न निवर्तन्ति भूयः ।
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये
यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ भ. गीता १५-४

जेथून पुन्हा कधी कोणी परत येत नाही, तेथे ते मिळूनच जातात. जशी गंगा सागराला गेली की पुन्हा कधी मुरडून मागे येत नाही. तसा हा जीव पूर्ण परमात्मरूपच होतो. एकदा आत्मसागराला मिळाल्यानंतर पुन्हा माघारी येत नाही. अशी स्थिती प्राप्त होण्यासाठी काय करायला पाहिजे याचा विचार करायला हवा. हे शरीर-हा पिंड आणि हे ब्रह्मांड हे दोन्ही त्या तत्त्वांचेच बनले आहे. मी तर सच्चिदानंद आहे. माझा आणि विश्वाचा यत्किंचितही संबंध नाही. जो काही विश्वाचा संबंध आहे असे मला व दुसऱ्याला वाटते तोही आभासच आहे. पण हे एकाएकी पटत नाही. कारण व्यवहार आपल्यामध्ये इतका मुरून गेलेला आहे की या विश्वामध्ये वावरणारा मी आणि हे विश्व दोन्ही असत्‌ आहे हे कितीही आणि कोणीही सांगितले - अगदी ज्ञानदेव, समर्थ यांच्यासारख्या महापुरुषांनी सांगितले तरी आपण ते नुसते ऐकतो आणि विश्वाच्या पसाऱ्यात शिरलो की सर्व विसरून जातो. तत्त्वरूप सकळ भासे । विवेक पाहतां निरसे । जेवढा भास आहे तो तत्त्वांचा. विवेकाने हे आपोआप निरसून जाते.

जे जगत् झाले ते पांचभौतिक आणि माझा देहही पांचभौतिक म्हणून त्या दोन्हीचा एकमेकांशी जवळचा संबंध जडला. जशी एखाद्या व्यसनी, दारुड्या माणसाची दुसऱ्या व्यसनी, दारुड्या माणसाशी गट्टी जमते तसे हे झाले, आणि या देहाविषयी व विश्वाविषयी सत्यत्व बुद्धि आली की त्या सत्यत्त्वबुद्धीला तेथून काढणे संतांनादेखील शक्य होत नाही. म्हणजे कल्पना करा ही सत्यत्त्वबुद्धि किती दृढ झालेली आहे. 'उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत' असे स्पष्टपणे उपनिषदे सांगत आली 'उठा, जागे व्हा.' समर्थ म्हणतात, "काही मंडळी हलवल्यावर जागी झाल्यासारखी वाटतात पण पुन्हा घट्ट डोळे मिळून झोपून जातात. म्हणजे त्यांची ती स्वप्नातील जागृती असते." ते म्हणतात, "आम्हाला सर्व कळले. आम्ही सद्‌गुरूंना शरण गेलो. त्यांनी आम्हाला 'तत् त्वम असि' हा उपदेश केला. 'श्रीराम जय राम जय जय राम' म्हणायला सांगितले. त्याप्रमाणे आम्ही साधना करायला लागलो." पण ही स्वप्नातील जागृती आहे. कारण उगीचच तुम्ही हे सर्व करता आहात. अजून तुमच्या लक्षात येत नाही का की आपण स्वयमेव परमात्मा आहोत."

परंतु एवढा मोठा परमार्थ आपल्याला पचणारा नाही तेव्हा भ्रम असू दे. पण साधना हा संवादी भ्रम आहे. आपण साधनेची धडपड करत का होईना परमेश्वराच्या दारात जाऊ. प्रत्यक्ष भगवंत, संत जीवाला याचे आश्वासन देतात. म्हणून आपण साधना करतो.

भ्रमेणाहं भ्रमेण त्वं भ्रमेणोपासका जनाः ।
भ्रमेण ईश्वरभावत्वं भ्रममूलं इदं जगत् ।।

सत्य परमार्थ कळणे खरोखरीच कठीण आहे. वस्तुतः आपण आत्ता जसे आहो तसे परमात्मरूपच आहोत यावर विश्वास ठेवावा. विश्वास नाही बसत तर हरिस्मरण करावे. ध्यान करावे. चिंतन मनन करावे. एकदा आपल्याला कळले की हा देह असत् आहे की आपोआप आपण परमात्म्याशी एकरूप होऊन जाऊ. एकदा देहावरची सत्यत्वबुद्धि गेल्याबरोबर 'मी अमुक स्वभावाचा, या नांवाचा' हे सर्व जाऊन 'मी परमात्माच आहे. माझे प्रकृतिगत विचार काय आहेत ते मला माहिती नाहीत' असे होऊन जाते.

इदं शरीरं कौन्तेय क्षेत्रमित्यभिधीयते ।

एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ।। भ. गीता १३-१

क्षेत्रक्षेत्रज्ञ विचार चटकन् करावा. देह हे क्षेत्र, मी क्षेत्रज्ञ, सगळ्या ठिकाणी मी भरून आहे.

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ।

सर्व देहामध्ये असलेला जो अहं तो मीच नटून आहे. ती मूळ अहंता मीच – ज्याच्यावर तो बाहेरचा अहं स्फुरतो आहे तो मीच आहे अशा बोधात जाण्याचा प्रयत्न करायचा. तसे केल्याबरोबर आपले स्वरूप आपोआपच आपल्याला कळून येईल. हा विवेक आहे, हा विचार आहे. समर्थ म्हणतात, "असा विवेक केल्याबरोबर सहजच लक्षात येते की हे असत् आहे आणि देहाच्या, विश्वाच्या ठिकाणी असत्‌बुद्धि झाली की सहजच जीव रामरूप होऊन जातो. पण अडचण हीच आहे की निश्चळाच्या गोष्टी बोलतात, पण पुन्हा चंचळाकडे धावतात. चंचळचक्रातून बाहेर पडली अशी मंडळी थोडी."

या निश्चळाच्या गोष्टी सांगती । पुन्हां चंचळाकडे धांवती ।

चंचळचक्रीं निघोन जाती । ऐसे थोडे ।। दा. ११-२-३

जे असत् ते असत्, सत् ते सत्. सत् असत्‌चा निवाडा करून सत्‌ला चिकटून राहणारे अगदी थोडे असतात, जसे समर्थ, तुकोबा. 'जाळोनि संसार बैसलों अंगणीं' असे तुकोबा म्हणतात. पण 'जाळोनि' याचा अर्थ घराला काडी लावणे नाही. मनातून संसार काढून टाकणे. सामान्य मनुष्याला केवढा अभिमान संसाराचा! माझा संसार, माझी मुले, मी मोठा बंगला बांधला, नवीन गाडी घेतली. आचार्य म्हणतात – ततः किम्

विदेशेषु मान्यः स्वदेशेषु धन्यः ।

सदाचारवृत्तेषु मत्तो न चान्यः ।

मनश्चेन्न लग्नं गुरोरङ्घ्रिपद्मे ततः किम् ।।

यात काय मिळवलेस? तू विदेशात मान्यमान्यता पावलास, स्वदेशात धन्यता मिळवलीस, मोठा झालास, पण त्याचा उपयोग काय? तुझे परमेश्वराकडे लक्ष लागत नाही. 'जीव ब्रह्मच आहे' एवढा मोठा बोध होत नसेल तर मी जीव आहे, परमेश्वराचा भक्त आहे असे तरी धरावे.

म्हणजे मग तो भक्त भक्ति करता करता केव्हातरी परमेश्वराशी मिळून जाईल. मग तो परमेश्वरापासून विभक्त राहणार नाही, आणि आत्मनिवेदन सहजच होऊन जाईल.

संसारात अगदी रमून गेलेल्या माणसाला शेवटी वाटते की मी उगीच 'माझे माझे' केले.

माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।
बुडतांहि न सोडी फुंजे । कुळाभिमानें ।। दा. ३-१०-६

वस्तुतः असे म्हणावे की संसार जसा आहे, तसा मी करतो आहे. 'संसार करा' हे सांगायला ज्ञानोबा, तुकोबा, समर्थ हे कोणी नकोत. संसार माझ्या शक्तिबुद्धीनुसार जसा होईल तसा मी सावरतो आहे. योग्य मार्गाने पैसा मिळवतो आहे. मुलांची शिक्षणे चालू आहेत. सर्वांना आवश्यक तेवढे अन्न वस्त्र निवारा मी पुरवतो आहे हे ठीक आहे. पण एवढे झाले की संसाराचे चिंतन नको. सारखे काहीतरी 'हवे' असे नसावे.

रामकृष्ण परमहंस त्यांचे शिष्य मथुराबाबू हे लक्षाधीश. त्यांना एकदा वाटले की आपण आहोत तोपर्यंत रामकृष्ण व त्यांचे कुटुंबीय यांच्यासाठी आपण काही करू शकलो आहोत. पण आपल्या पश्चात् यांच्यासाठी काही पैशाची व्यवस्था करावी. पण यासंबंधी विचारायचे कुणाला? रामकृष्णांसमोर तर पैशाचा विषय काढण्याची सोयच नव्हती. म्हणून मथुराबाबूंनी रामकृष्णांच्या मातोश्रींना विचारले, "तुम्हाला काही द्यावे असे मला वाटते. तर काय द्यावे?" मातोश्री म्हणाल्या, "माझ्याजवळ सगळे आहे. एक साडी अंगावर आहे. एक वाळत टाकली आहे. जेवायला येथे आहेच. रहायला तुमचे घर आहे. खरं सांगू? मला काही नको. पण तुम्ही विचारता म्हणून सांगते. मला दोन पैशाची तंबाखू आणून द्या." काय हे मागणे! मथुराबाबूंच्या डोळ्यात अश्रू आले. ते म्हणाले, "अशा मातेच्या पोटीच रामकृष्ण जन्माला येतात." निरभिलाष, निरासक्त जीवन. आसक्ति नाही हे केव्हा कळते? जेव्हा माणसे द्यायला आली तरी आपण घेत नाही असे होते, तेव्हा कळते. कोणी येतच नाही द्यायला मग निरासक्त आहे की नाही हे कसे कळणार? आसक्ति आपल्या नसानसातून आहे. त्यामुळे आपण विवेकभ्रष्ट होतो. आपल्याला आपल्या देहाबद्दल

आणि जगाबद्दल अत्यंत सत्यत्वबुद्धि आहे ती समर्थ उडवून लावतात. ते म्हणतात, "जे दिसते तो भास आहे. काय वाटेल ते करा. रामनामाचा धोशा लावा, ध्यानाला सात आठ तास बसा. भगवद्‌गीता, दासबोध, ज्ञानेश्वरी याचे चिंतन मनन करा. काहीही करा. परंतु देहाच्या आणि विश्वाच्या ठिकाणी जी सत्यत्त्वबुद्धि आहे तेवढी काढून टाका. शेवाळ बाजूला केले की पाणी आहेच. अभ्रे गेल्याबरोबर चंद्र आहेच. तसे देह, विश्व याच्या ठिकाणची सत्यत्वबुद्धि गेली की आपण परमात्मस्वरूपच आहोत. त्यासाठी दुसरे काही करायला नको. देहघट लवंडून टाकायचा आहे.

'प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ॥' प्रकृतिनिरास झाल्याबरोबर आपण देहाने उरतोच कुठे? आणि प्रकृती म्हणजे पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश, मन, बुद्धि, अहंकार याचाच देह आणि विश्व बनले आहे. पिंड ब्रह्मांड एकरूप. या प्रकृतीविषयीची सत्यत्वबुद्धि गेल्याबरोबर खुशाल आपण जगामध्ये वावरू शकतो, देहामध्ये वावरू शकतो. मग जर कुणी विचारले की तुम्ही कशासाठी देह धारण केला जर हा असत् आहे! तर त्यांना सांगा, "मी परमेश्वरस्वरूपच आहे. मी देह धारण केल्यासारखा तुम्हाला दिसतो ना ते खोटे. मी देह धारण केलेला नाही. जे दिसते ते असत्, क्षणभंगूर आहे याची तुम्हालाही जाणीव असावी, मलाही जाणीव आहे. मी सत्‌स्वरुप असून अखंड, शाश्वत, स्थाणु, अचल, सनातन पुरुष आहे. यालाच 'आत्मनिवेदन' म्हणतात.

येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ॥ दा. ४-९-११

मीपणा, देहावरची आसक्ति जाण्यासाठी जर मानायचीच झाली तर दोन तत्त्वे मानता येतील. वस्तुतः एकच तत्त्व आहे. पण आपण समजुतीसाठी दोन तत्त्वे मानली. एक प्रकृती, एक परमेश्वर. जसे ज्ञानोबा म्हणतात, "हाच विचार सांख्यांच्या पद्धतीने – एक प्रकृती, एक पुरुष अशा पद्धतीने तुला सांगतो. मी एकच आहे, मीच सर्व भरून आहे वगैरे चटकन् कळणार नाही. प्रकृतीचा निरास करून पुरुषाकडे जायचे आहे असे म्हटले तर कळेल. 'एक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति

जगदाकारु ।' हे तुला मान्य आहे. पंचभूतात्मक ही प्रकृती जगताचा आकार धारण करून तुझ्यापुढे उभी आहे. त्याची तुझी अत्यंत गट्टी जमलेली आहे. अशी ही प्रकृती आणि एक परमात्मा जो जगतामध्ये अदृश्य असलेला, आतबाहेर व्यापून असलेला असा आहे. जशी गोडी गुळाच्या ढेपेला व्यापून असते, उष्णता अग्नीला व्यापून असते किंवा द्रवता पाण्याला व्यापून असते तसा तो परमात्मा सर्वाला व्यापून आहे पण तो दिसत नाही. गोडी दिसत नाही म्हणून गोडी कळण्यासाठी गोड पदार्थ जिभेवर ठेवावा लागतो. तसे परमात्म्याची गोडी जर कळायला हवी असेल तर आपल्याला त्याच्याशी एकरूप व्हायला हवे. एकमेकांना खाऊन टाकायचे, गिळून टाकायचे. 'एक एकाते गिळी' असेच म्हटलेले आहे.

येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।। दा. १

समर्थ म्हणतात, "एक परमेश्वर आहे, एक प्रकृती म्हणजे जगत् जे दिसते आहे ते. आता तू ज्याला मी म्हणतोस तो 'मी' चोर कुठला आला मध्ये? जगत् आणि तू – तुझा देह दोन्ही एकरूपच आहे. कारण दोन्ही पंचमहाभूतात्मक आहे. मग मी मी हा जो फुंज आहे, मला पाहिजे, हे माझे आहे हे कुठून आणलेस?

सगळ्या संतांना आपण आपल्या आचारविचाराने, बोलण्याने, अभिलाषेने, आसक्तीने त्राही भगवान् करून टाकले आहे असे मला वाटते.

भगवंतांपासून सर्व संत राम कृष्ण आदि अवतारी पुरुष यांना आपण अगदी हैराण करून टाकले आहे. आपण जणू त्यांना आव्हान देत आहोत की "तुम्ही सुधारूनच दाखवा मला. आम्हाला जो काय बोध द्यायचा तो तुम्ही द्या. आम्ही श्रवण करू. पण पुन्हा आम्हाला जे काय करायचे ते आम्ही करू." उपनिषदांपासून अनेक ग्रंथ या महात्म्यांनी आजपर्यंत लिहिले. ते सर्व वाचले. चार मोठे आचार्य झाले. शंकराचार्य, रामानुजाचार्य, वल्लभाचार्य, मध्वाचार्य यात कोणी द्वैती, कोणी विशिष्टाद्वैती, कोणी केवलाद्वैती असे झाले. त्यांचे सगळे ग्रंथ आम्ही वाचून ते पचवले. वल्लभाचार्यांचे शुद्ध अद्वैत आणि भक्ति दोन्ही एकत्र असल्यामुळे वल्लभ संप्रदाय खूप मोठ्या प्रमाणावर पसरलेला आहे.

सगळ्या संतांनी तो मान्य केला आहे. म्हणजे अद्वैताचा बोध – 'तोच मी आहे' हा बोध आणि पुन्हा भक्ति. फार गोड भजने म्हणत असतात ही मंडळी. असे सगळे आचार्य थोर थोर आहेत. त्यांच्या ग्रंथांवर टीका लिहिताना जाणकार म्हणतात, 'ते चारही आचार्य ईश्वराचे अवतार आहेत.' परंतु अद्वैताचा बोध एकदम होणार नाही हे लक्षात घेऊन दुसऱ्या आचार्यांनी प्रथम द्वैताचा बोध देऊन ते ग्रंथ सुधारण्याची पराकाष्ठा केली. काही ठिकाणी द्वैत काही ठिकाणी अद्वैत मानावे असेही त्यांनी सांगितले. असे मोठमोठे आचार्य निर्माण होऊन ते बोध देऊन गेले. हजारो पानांचे ग्रंथ झाले. आपण ते मननपूर्वक वाचले आणि मननपूर्वक त्याचा त्याग करून आपले आचरण जसेच्या तसे ठेवले.

सर्व उपनिषदांचे सार अशी भगवद्‌गीता आम्ही वाचली. अठरा अध्याय मुखोद्‌गत केले. त्यातील कर्मयोग, भक्तियोग, ध्यानयोग, ज्ञानयोग सगळे वाचले. 'यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः' वाचले. आम्हाला जीवनात 'श्री' पाहिजे 'विजय' पाहिजे असे म्हटले. पण या दोन मंडळींना आम्ही कधीच विचारले नाही. 'यत्र योगेश्वर कृष्णः' आम्हाला नको. 'यत्र पार्थो धनुर्धरः' - भक्त तोही आम्हाला नको. आम्ही या दोघांना बाजूला सारून आमच्या पद्धतीने 'श्री' मिळवली. आम्ही सगळे ग्रंथ पचवून आमचे काही सोडले नाही हे आमचे वैशिष्ट्य. अशी जी मंडळी 'मी'पणाने राहिली त्यांना समर्थ 'चोर' म्हणतात.

अत्यंत आनंदरूप जीवन जगावे असा आपण प्रयत्न करतो आहोत. जसजसे हे प्रयत्न यशस्वी होतात तसतसा हा आपल्यामधे असलेला चोर निघून जातो. मी कोणी नाही. परमात्माच एक आहे. तो यंत्री मी यंत्र. तो सागर मी तरंग या तऱ्हेचा बोध आपल्याला हळूहळू होत जातो. ज्यांना हा बोध होत नसेल त्यांना समर्थ तळमळून सांगतात –

येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मधें ।। दा. ४-९-११

मुख्य तो परमात्मा आहे. तो एकमेवाद्वितीय आहे. पण तुम्हाला जर हे कळत नसेल आणि जगत् दिसत असेल तर दुसरी पंचमहाभूतात्मक प्रकृती आहे. ती देहासकट जगताचा आकार धारण करून आहे. आता ज्याला

तू 'मी' म्हणतोस तो तिसरा चोर आहे. 'ऐसें हें सिद्धचि असतां' – सगळ्या शास्त्रांनी हे सिद्ध करून ठेवलेले आहे. 'नाथिली लागे देहअहंता' मग देह अहंता राहिली कोठे? विचार करून पहा. पाच तत्त्वे एकत्र आली आणि देह निर्माण झाल्यासारखा दिसला. तत्त्वे बाजूला काढली म्हणजे देहही नाही. काहीच नाही.

ऐसें हें सिद्धचि असतां । नाथिली लागे देहअहंता ।
परंतु विचारें पाहों जातां । कांहींच नसे ।। दा. ४-९-१२

ॐ तत् सत्
जय जय रघुवीर समर्थ

●

कल्याण करी रामराया । जनहित विवरी ।।धृ।।
तळमळ तळमळ होतचि आहे । हे जन हाती धरी ।।१।।
अपराधी जन चुकतचि गेले । तुझा तूंचि सावरी ।।२।।
कठीण त्यावरी कठीण झालें । आता न दिसे उरी ।।३।।
कोठे जावें काय करावें । आरंभिली बोहरी ।।४।।
दास म्हणे आम्ही केलें पावलो । दयेसी नाही सरी ।।५।।

## ४. अजपा-निरूपण

**[स्वामी माधवनाथ यांचे सहकारनगर पुणे येथील प्रवचन]**

आज मोठा आनंदाचा, भाग्याचा दिवस आहे. साधकांच्या मेळाव्यात बसता उठताना मोठा आनंद वाटतो. कारण साधक श्रोत्यांसमोर बोलणे, विचारांचे देणे घेणे हे फक्त अध्यात्माचेच होऊ शकते, आणि त्या अध्यात्मामध्येच सारे सुख, सारे समाधान, आनंद अंतर्भूत आहे.

दासबोधातल्या दशक सतरा, समास पांच या अजपानिरूपण समासावर काही बोलावे अशी सर्व मंडळींची इच्छा आहे म्हणून हा समास घेतला. १७/५ हा अतिशय महत्त्वाचा समास आहे. सोऽहं बोधाचा, सोऽहं साधनेचा हा समास आहे. नाथ संप्रदायात जी साधना चालत आलेली आहे ती निर्गुण उपासना आहे हे प्रथम लक्षात घेतले पाहिजे. सोऽहं साधना ही निर्गुण उपासना आहे. निर्गुणच सगुण झालेले आहे. निर्गुण आत्मतत्त्व काही आकार घेऊन सगुण होते, जसे ते दत्तात्रेय, आदिनाथ, श्रीरामचंद्र, गोपाळकृष्ण, निरनिराळे संत यांच्या आकाराने सगुण झाले. वासच जसा फूल व्हावा, गोडीच जशी साखर व्हावी, तशी मूळ स्वरूपाची गोडी पाहिजे असेल तर या महापुरुषांना शरण गेल्याने ती मिळते. नुसती गोडी म्हटले की आपल्याला काही कळत नाही. पण श्रीखंड म्हटले की कळते. 'गोडी कळाया कारणे । गूळ लागे देणे' गुळाचा खडा दिला की गोडी कळते. तसे दत्तात्रेयांना, आदिनाथांना शरण गेले की निर्गुण कळते.

सगुणाचेनि आधारें । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासार विचारें । संतसंगे ।। दा. ६-६-५५

याच पंथाची आमची साधना आहे. सोऽहं ही निर्गुण साधना आहे. त्यालाच 'अहं ग्रहोपासना' म्हणतात. म्हणजे पूर्ण अद्वैताचा हा बोध आहे आणि ही साधनाही तशीच आहे. सोऽहं हा बोध आहे. सोऽहं ही साधना आहे. येथे साधना आणि साध्य दोन्ही एकच आहे. वस्तुतः सगुणाची उपासना आणि निर्गुणाची साधना हीदेखील एकच आहेत. राम राम म्हणता रामचि होइजे –

रामनामी रंगे मन । कैची भूक कैची तहान ।।

कैचा राहे देहभाव । नुरे दिक्कालासी ठाव ।।
कैची आधी केची व्याधी । अवघी संपली उपाधी ।।
नित्य निवांत निर्भय । स्वामी झाला राममय ।।

– स्वामी स्वरूपानंद

म्हणजे रामनाम घेत घेत स्वामी स्वरूपानंद रामरूपच झाले. गोंदवलेकर महाराज रामरूपच झाले. सगुण उपासना करा; निर्गुण उपासना करा. दोन्हीचे साध्य एकच आहे. सगुणापासून सुरवात करून निर्गुण उपासनेमध्ये जायचे आहे आणि तो सच्चिदानंद प्रभूच मी आहे असा बोध करून घ्यायचा आहे.

कोणतीही साधना करायची तर प्रथम एकान्तात बसायला पाहिजे आणि मौन धरायला पाहिजे. अखंड लोकान्तात राहिले तर साधना होणार नाही. केवळ प्रवचने ऐकून अथवा प्रवचने करून भागणार नाही.

नायमात्मा प्रवचनेन लभ्यः न मेधया न बहुना श्रुतेन ।
यमेवैष वृणुते तेन लभ्यस्तस्यैष आत्मा विवृणुते तनुं स्वाम ।।
जनी सांगता ऐकता जन्म गेला । परी वादवेवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभधारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ।।

कोणतीही साधना एकान्तात बसूनच करायची. आपण बघा – कोणतेही संत दिवसाचे पहिले चार पाच तास आपले आपल्याजवळच असतात. 'देव माझा, मी देवाचा' एऱ्हवी तो संतच नाही. तो सारखाच जर फिरत राहिला तर साधना कशी होणार? गिरनार पर्वतावर दत्तात्रेयाचे स्थान जर पाहिले तर लक्षात येईल की एवढ्या उंचीवर जेथे आपण वाऱ्यावर उडून जाऊ की काय असे वाटते तेथे दत्तात्रेयांनी साधना केली. एखाद्याला उपरति झाली की लक्षात येते, एकान्तात बसल्याखेरीज साधना शक्य नाही. पण एकान्तात बसून करायचे काय हा प्रश्न पडतो. समर्थ सांगतात "एकान्त आणि मौन दोन्ही आवश्यक आहे." १७/५ मध्ये ते म्हणतात –

एकवीस सहस्र सासें जपा । नेमून गेली ते अजपा ।
विचार पाहातां सोपा । सकळ कांहीं ।। दा. १७-५-१
येकांती मौन्य धरून बैसे । सावध पाहतां कैसें भासे ।
सोहं सोहं ऐसे । शब्द होती ।। दा. १७-५-७

एकान्तात म्हणजे आपण एकटेच पाहिजे. दुसरा साधक जवळ असता कामा नये. आपली साधना झाली की मग इतर साधकांबरोबर थोडे फिरायला हरकत नाही. पण एकान्तात साधना नसताना लोकान्त करू नये. मुख्य एकान्त मग लोकान्त.

कांहीं गल्बला काही निवळ । ऐसा कंठित जावा काळ ।
जेणेंकरितां विश्रांती वेळ । आपणासी फावे ।। दा. १९-९-२९

एकान्तात काय करायचे? अंतर्मुख होऊन आपला श्वास कसा चालला आहे ते बघायचे. श्वास हळूहळू कमी करायला पाहिजेत. संत श्वासावरून ओळखले जातात. संतांचा श्वास जोराने भराभर चालत नाही. आपले श्वास साधारणपणे मिनिटाला १५ ते १८ एवढे पडत असतात. पण सत्पुरुष जेव्हा एकान्तात असतात तेव्हा मिनिटाला ३-४ दरम्यानच त्यांचे श्वास चाललेले असतात. त्यांचा श्वास सहजच शांत घेतला जातो तो किंचित काळ वर ठेवला जातो आणि पुन्हा हळूहळू खाली सोडला जातो. त्या श्वासाबरोबरच श्वास घेत असताना सो आणि सोडताना हं असे आपोआप चालू राहते. याला अजपाजप म्हणतात. यात मुद्दाम जप करायला लागत नाही म्हणून याला अजपाजप म्हणतात.

अजपा नाम गायत्री । योगिनामपि मोक्षदा ।
अस्याः स्मरणमात्रेण । नरः पापैः प्रमुच्यते ।
अनया सदृशी विद्या । अनया सदृशो जपः ।
अनया सदृशं पुण्यं । न भूतो न भविष्यति ।।

असे गोरक्षनाथांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे. म्हणून या सोऽहं ला अतिशय महत्त्व आहे. सः म्हणजे तो विश्वव्यापक प्रभु आणि अहं म्हणजे हा जीव – ज्याला 'मी' 'मी' असे म्हणतो; माझे घर, माझा पैसा, माझी पत्नी, माझी मुले असे म्हणतो; पण हा मी कोण? Who am I? मी म्हणजे देह, मन का बुद्धि? मी देह असे म्हटले तर हा देह पूर्वी लहान होता, तो आता मोठा झाला. या देहाला षड्विकार आहेत आणि 'देहच मी' असे म्हटले की आपण नाशवंत ठरतो. संत सांगतात आपण नाशवंत नाही. आपण आत्मा आहोत.

आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।

अहमात्मा हें कधींचि । विसरों नये ।। दा. ५-१०-३८
ज्याची बुद्धि होये ऐसी । वेद वर्णिती तयासी ।
शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ।। दा. ८-८-२९
ऐश्वर्य ऐसे तत्त्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां ।
देह मी ऐसे भावितां । अधोगती ।। दा. ८-८-३०

तो सः म्हणजे विश्वव्यापक प्रभु आणि अहं म्हणजे या देहामध्ये देहाचे अधिष्ठान असलेला जीव, दोन्ही एकच आहेत – जसा सागर आणि तरंग.

एकान्तात मौन धरून बसताना डोळे मिटलेले असावेत आणि शांतपणे आपल्या आतमध्ये जो श्वास चालू आहे तिकडे लक्ष असावे.

धरितां सो सांडितां हं । अखंड चाले सोहं सोहं ।
ऐसी हे अजपा सकळासी । परंतु कळे जाणत्यासी ।
सहज सांडून सायासीं । पडोंच नये ।। दा. १७-५-१३

एकान्तात मौन धरून बसल्यावर बाहेरचे सगळे शब्द बंद. बाहेरचा कसलाही आवाज आपल्या अनुसंधानात नाही. आता आपले एकच अनुसंधान लागलेले आहे. आता श्वासाबरोबर चाललेला तो अत्यंत सूक्ष्म सोऽहं ध्वनी ऐकायचा आहे. एकांतात शांत बसल्यावर असा भास होतो की त्या जीवाचे सोऽहं सोऽहं असे अखंड चालूच आहे. आतील सूक्ष्म सोऽहं ध्वनी सारखा चालू असतो. पुढे तेही शब्द संपतात.

ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला ।
योगाभ्यासाचा गल्बला । याकारणें ।। दा. १७-५-९

दत्तात्रेय, आदिनाथ, गोरक्षनाथ यांनी केली ती ही साधना आहे. बाहेरचे स्थूल शब्द सोडून आतला सोऽहं चा सूक्ष्म ध्वनी ऐकत रहायचे. त्या ध्वनीबरोबर हळूहळू मी विश्वाकार आहे असा बोध होत जातो. प्रत्येकाचे जन्मजन्मांचे जे काय संस्कार असतील त्याप्रमाणे त्याला कमी जास्त वेळ लागेल. तथापि कोण जर चिकाटीने साधना करील तर हे होऊन जाईल. याला छत्तीस वर्षे साधना करावी लागेल. सद्गुरूंचा अनुग्रह झाल्याबरोबर दोन दिवसात सोऽहं हंसारूढ झाला असे होत नाही आणि असे होणारही नाही. आजपर्यंत असे कोणाला झाले नाही. गोरक्षनाथांनी एका

अंगठ्यावर उभे राहून किती तपश्चर्या केली ती त्यांची त्यांनाच ठाऊक! आपल्याला त्या मानाने त्यांनी मार्ग सोपा करून ठेवला आहे.

मार्ग दाऊनी गेले । दयानिधी संत ते ॥
तेणेचि पंथे चालो जाता । न पडे गुंता कोठे कांहीं ॥
मोडोनिया नाना मतें । देती सिद्धांते सौरसु ॥
निळा म्हणे ऐसे संत । कृपावंत गुणसिंधू ॥

तेव्हा संतांनी मार्ग दाखवला. त्या पूर्वीच्या ऋषिमुनींनी जो कोणी साधक जिद्दीने साधना करणार असेल त्याच्यासाठी मार्ग सोपा करून ठेवला आहे. त्या मार्गावरून सरळ नुसते चालायचे आहे. त्यासाठी प्रथम एकान्त, मग मौन आणि ध्यान. धावत पळत ही साधना होणार नाही. 'आसीनः सम्भवात्' असे ब्रह्मसूत्रच आहे. साधना बसूनच संभवते. ब्रह्मसूत्रांपेक्षा आणखी प्रमाण काय? उपनिषदांचा विषय करूनच पांचशे पंचावन्न ब्रह्मसूत्रे व्यासांनी लिहिली. बसूनच उपासना संभवते. प्रथम दोन तीन तासांची बैठक पाहिजे. त्याखेरीज 'सदा येता जाता उठत बसता' साधना होणार नाही. ध्यानाची बैठक प्रथम. मग जे सूक्ष्म शब्द आहेत 'ते शब्द सांडून बैसला' देह स्वस्थ आहे, बुद्धि स्वस्थ आहे, मग मनही स्वस्थ होऊन जाते. 'स्वस्मिन् स्थितः' असे त्याला म्हणतात. आपण हे सगळे नीट लक्षात घेतले पाहिजे. दासबोधातील हा अत्यंत महत्त्वाचा समास आपण विचारासाठी घेतला आहे. आपण स्वस्थ बसलेलो आहोत. देह स्वस्थ आहे, बुद्धीही स्वस्थ आहे. पण मन स्वस्थ नाही. मन अत्यंत चंचल असून त्याचे चांचल्य सहजासहजी जाणारे नाही. मनाचे चांचल्य रजोगुणामुळे आहे. मन 'हे रजोगुणाच्या खांदी । तरळत असे' असे म्हटले आहे. मनाला पैसा, गाडी, बंगला सारखे काहीतरी पाहिजे आहे हा रजोगुण जाणार कसा? सत्त्वगुणाने रजोगुणाला छेद जातो. साधे राहणे, साधे बोलणे, साधे विचार, साधे अन्न, संतांची संगती, रामनाम, ध्यान या सत्त्वगुणांनी तमोगुण निघून जातो. मग मनाचे चांचल्यही जाते आणि मग तो स्वस्थ होतो. नाहीतर ध्यानासाठी डोळे मिटले रे मिटले की विचार सुरू. म्हणून ध्यानाची वेळ ठरलेली पाहिजे. त्यावेळी कोणाचीही भेट घ्यायची नाही. अगदी पंतप्रधान आले तरी नाही.

गुरुदेव रानडे यांची एक गोष्ट सांगतात. ते ध्यानाला बसले असताना त्यावेळचे राष्ट्राध्यक्ष डॉ. राधाकृष्णन् त्यांना भेटण्यासाठी अचानक आले. कदाचित् आधी वेळ ठरलेली असेलही. पण ध्यानाची केव्हा कोणाला लहर येईल ते सांगता येत नाही. ती आतून येणारी स्फूर्ती आहे. आतून येणारे निमंत्रण आहे. ते केव्हा येईल ते सांगता येत नाही. मग त्यावेळी किती वाजले, भोजनाची वेळ झाली असे काही नसते. त्याप्रमाणे राधाकृष्णन् भेटायला यायचे हे गुरुदेवांना माहिती होते. पण त्यांना ध्यानाची स्फूर्ती आली आणि ते दार लावून बसले. ते बसले तेवढ्यात राधाकृष्णन् आले. चौकशी केल्यावर कळले की गुरुदेव ध्यानाला बसले आहेत. त्यावर राधाकृष्णन् दाराबाहेर हात जोडून उभे. राष्ट्राध्यक्ष आणि दाराबाहेर हात जोडून उभे. असे आहे ध्यानाचे महात्म्य. राव ते रंक आम्हापुढे असे स्वामी स्वरूपानंदांनी म्हटले त्याचे कारण मूळ आत्मज्ञान जे आहे ते मन-चित्त स्थिर झाल्याखेरीज होत नाही. चित्त रजोगुणावर आधारित असल्यामुळे रजोगुण जेव्हा जाईल तेव्हा ध्यान लागेल. रजोगुण फार आधिक्याने असेल तर ध्यान कदापि लागणार नाही. पन्नास टक्के असेल तर थोडे फार ध्यान लागणे शक्य आहे. पण रजोगुण शक्यतो दहा वीस टक्के इतकाच रहावा. मनाला एखादी लहर लागली आणि त्याप्रमाणे तो ताबडतोब करायला लागला तर समजावे याला ध्यान कदापि शक्य नाही. सदा वृत्ती बहिर्मुख असेल तर ध्यान जमणे कठीण.

पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः ।
तस्मात् पराङ् पश्यति नान्तरात्मन् ॥
कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्ष- ।
दावृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन् ॥ कठोपनिषद्

अमृतत्वाची इच्छा करणारा कोणी एखादा धैर्यवान पुरुष या सर्व इंद्रियांची जी बहिर्गामी प्रवृत्ती आहे ती आवरून ध्यानाला बसतो, आणि हे ज्ञान प्राप्त करून घेतो. जोपर्यंत दुसऱ्याची भांडणे ऐकण्यासाठी कान लांब होतात, तोपर्यंत हे जमणार नाही. साधकाने परमार्थ, नामस्मरण याखेरीज जिभेने काही बोलता कामा नये. सात्त्विक आहार सेवन करायला पाहिजे. वाटेल ते वाटेल त्याच्या हातचे खाता येणार नाही. कारण असल्या

आहाराने - पाणीपुरी, भेळ वगैरे - रजोगुण दिवसेंदिवस बलिष्ठ होत जातो. मनाचे चांचल्य वाढते. रजोगुण कमी झाला की शांतपणाने मौन धरून स्वस्थ बसता येते. देह स्वस्थ, बुद्धि स्वस्थ, मन स्वस्थ. मग -

चित्तचि हारपले अवघे । चैतन्यचि झाले हो ।
देखता देखता अवघे । विश्व मावळले ।
पाहता पाहता अवघे । सर्वस्व ठकले ।
मन रामी रंगले अवघे । मनचि राम झाले ।
सबाह्य अभ्यंतरी अवघें । रामरूप कोंदले ।।

असे होऊन जाते. त्यासाठी –

तू मन हें मीचि करी । माझिया भजनीं प्रेम धरीं ।
सर्वत्र नमस्कारी । मज एकातें ।। ज्ञा. ९-५१७

सगळ्या ठिकाणी एकच परमात्मा आहे असा बोध झाला की चित्त चैतन्यरूप होते. ज्या मनाचा व्याप असतो ते मनच स्वरूपामध्ये निमग्न होऊन जाते. त्या मनाला तो छंदच लागतो. स्वरूपाच्या ठिकाणी विश्रांती आहे. इतर ठिकाणी विश्रांती नाही हे मनाला एकदा कळले की ते स्वरूपामध्येच डूब देऊन राहते अशी ही ध्यानाची स्थिती आहे.

ते शब्द सांडून बैसला – स्वस्थ झाला. उपनिषदे म्हणतात –

यदा पञ्चावतिष्ठन्ते ज्ञानानि मनसा सह ।
बुद्धिश्च न विचेष्टति तामाहुः परमां गतिम् ।

पंच ज्ञानेंद्रिये, कर्मेंद्रिये जेव्हा मनासहित स्वस्थ बसतात, बुद्धि कसलीही चेष्टा म्हणजे हालचाल न करता स्वस्थ राहते त्याला 'परमगती' म्हणतात.

तेव्हा मन स्थिर करण्यासाठी रजोगुण ताब्यात आणायला पाहिजे. मन स्थिर होते याचाच अर्थ ते स्वरूपामध्ये डूब देऊन राहते. एऱ्हवी मन स्थिर होणेच शक्य नाही. मन स्थिर होण्यासाठी ते चैतन्यरूपच व्हायला पाहिजे. बाकी कशाने मन स्वच्छ करणार? एखाद्या उत्तम साबणानी कोळसा धुतला तर तो काय स्वच्छ होईल? त्याला एकच मार्ग आहे. ज्या निखाऱ्यातून तो आला तेथेच त्याला टाकायचा म्हणजे तो लालभडक होतो. त्याचा काळेपणा जातो. तसे मन जर शुद्ध, निर्मल करायचे असेल त्यातील काम, क्रोध, मत्सर, दंभ इत्यादि विकार जर काढून टाकायचे असतील

तर ते मन स्वरूपामध्येच लीन करायला पाहिजे. तुकोबा म्हणतात तसे व्हायला पाहिजे.

काम नाही काम नाही । झालों पाहीं रिकामा ॥१॥
फावल्या त्या करूं चेष्टा । निश्चळ द्रष्टा बैसोनि ॥२॥
नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदे विव्हळतसे ॥३॥
एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ॥४॥

असे जर झाले तर तो मनुष्य कोणावरही रागावत नाही, काम क्रोध टाकून देतो. जर कधी रागवायचेच झाले तर आई जशी मुलावर रागावते तसा त्याचा राग असतो.

परी अहितीं कोपोनि सोप । लालनीं मऊ जैसें पुष्प ।
तिये मातेचें स्वरूप । जैसे कां होय ॥ ज्ञा. १६-१२३

आई मुलाच्या कल्याणासाठी त्याच्यावर रागावते, तसे ते इतरांच्या कल्याणासाठी त्यांच्यावर रागावतात. नाही तर रागवतच नाहीत. शांत राहतात. मी स्वामी स्वरूपानंदांना कधी रागावलेले बघितले नाही. त्यांच्या मनाविरुद्ध काय थोड्या गोष्टी होत असतील का? किंबहुना संतांचे आणि इतर लोकांचे नेहमीच बिनसलेले असते. संत ज्या पातळीवर असतात त्या पातळीची – त्यांच्या मनाची, बुद्धीची कल्पना सामान्य लोकांना कदापिही येणार नाही. लोक आपल्या फूटपट्टीने संतांना मोजायला जातात आणि ती फूटपट्टी अत्यंत तोकडी असते. संतांना आपपरभाव नाही, लोभ नाही. त्यांना काम नसतो, पण प्रेम असते. मग त्या प्रेमाने ते काही गोष्टी करायला गेले की लोकांना वाटते तेही आपल्यासारखेच एक आहेत.

तेव्हा देह स्वस्थ झाला, मन स्वस्थ झाले, रजोगुण गेला, बुद्धि शांत आहे, भलते निश्चय करीत नाही, मग –

ते शब्द सांडून बैसला । तो मौनी म्हणावा भला ।

अशा तऱ्हेने जर कोणी साधक बसला तर त्यावर ज्ञानोबांची एक सुंदर ओवी आहे.

शरीर वाचा मानस । पियाली कृतनिश्चयाचा कोश ।
एक मीवाचूंनि वास । न पाहती आन ॥ ज्ञा. १३-६०४

प्रथम शरीर, मन, वाचा यांना आवरायचे आहे आणि मग ध्यानाला

बसायचे आहे. शरीर काहीही करते आहे, मन कुठेही भटकते आहे, वाणी काहीही बोलते आहे, असे जर झाले तर चिदाकाश म्हणजेच मूर्ध्नि आकाश, हृदयाकाश यामध्ये ते मन प्राणासहित स्थिर होणे, लीन होणे शक्य नाही. म्हणून हे सर्व सांभाळावे लागते.

हा 'अजपाजप' सहज असल्यामुळे मुद्दाम त्याचा जप करावा लागत नाही. गोरक्षनाथांपासून सर्व संतांनी हाच जप सांगितला. मच्छिंद्रनाथांकडून गोरक्षनाथांना उपदेश झाला त्यात ते म्हणाले, "मी तुला मार्ग सांगितला. तथापि पुढचा मार्ग दत्तात्रेय तुला सांगतील." म्हणून गोरक्षनाथ दत्तात्रेयांकडे गेले. तेथून नाना संप्रदाय शाखोपशाखा ज्ञानोबांपासून पुढे अशा आलेल्या आहेत. बहुतेक सर्व संप्रदायात 'सोऽहं साधना' या ना त्या प्रकारे आलेली आहे.

'सोऽहं' 'तोच मी' ही केवढी मोठी गोष्ट आहे. पण आपण देहच मी आणि देहाला लागले ते माझे. बाकीचे परके असा आपल्या बोधाचा आपण संकोच केला. वस्तुतः मी विश्वव्यापक आहे. मीच विश्व व्यापून राहिलो आहे. मीच प्रभु, मीच भोक्ता.

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।
न तु मामभिजानन्ति तत्त्वेनातश्च्यवन्ति ते ।। भ. गीता ९-२४
हे विश्वचि माझें घर । ऐसी मती जयाची स्थिर ।
किंबहुना चराचर । आपण जाहला ।। ज्ञा. १२-२१३
मग याहीवरी पार्था । माझिया भजनीं आस्था ।
तरी तयातें मी माथा । मुकुट करी ।। ज्ञा. १२-२१४

आपण हा सोऽहं बोध करून घेऊ या. संप्रदाय अनेक असले तरी सांप्रदायिक अभिनिवेश न ठेवता आपण सर्व मंडळी एकत्र येऊ या आणि समर्थांचे तीनशे वर्षांपूर्वीचे 'आनंदवनभुवना'चे स्वप्न आपण साकार करू या.

ॐ तत् सत्
जय जय रघुवीर समर्थ

●

## ५. देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे । देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥ दा. ८-८-२८

**[स्वामी माधवनाथ यांचे बारामती येथील प्रवचन]**

श्रीसमर्थांचा दासबोधासारखा हा पवित्र ग्रंथ आणि आपण भाविक साधक श्रोते असा हा दुर्लभ संगम आज येथे आहे. वक्ता नुसता उपयोगी नाही. त्याला श्रोता पाहिजे. श्रोता भाविक, ज्ञानी असला तरी उपयोगी नाही. त्याला वक्ताही तसाच पाहिजे. श्रोता वक्ता दोन्ही चांगले मिळाले तर अध्यात्माचा पूर या ग्रंथामध्ये आहे.

दासबोध, ज्ञानेश्वरी, नाथ भागवत, तुकोबांची गाथा हे महाराष्ट्रातील चार वेदच आहेत. वेद कळणे कठीण. कारण वेदांची जुनी संस्कृत भाषा आहे. ती सर्वांना कळणे सुगम, सुलभ नाही. त्यामुळे त्यात आपला प्रवेश होऊ शकत नाही. म्हणून संतांनी मोठ्या कृपाळूपणाने हे चार ग्रंथ लिहून ठेवलेले आहेत. ऐहिक जीवन आणि परमार्थ यांची सांगड घालणारा दासबोधासारखा उत्कृष्ट ग्रंथ दुसरा नाही. साधकांना नेमके अचूक मार्गदर्शन करणारा हा ग्रंथ आहे. येथे सगळ्या कल्पना सुस्पष्ट करून साध्या शब्दात मांडलेल्या आहेत. संत कोणाला म्हणावे?

जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥ दा. ६-१-१६

आता याखेरीज दुसरी संतांची लक्षणे सांगायला नको. संत म्हणजे काय याविषयी कोणाच्या मनात भ्रम, शंका असेल तर या ओवीचे स्मरण केले तरी लक्षात येईल की हा संत आहे, हा संत नाही. आपल्या बुद्धीने संतांची पारख होत नाही. संतच संतांची पारख करू शकतात. तेव्हा थोर थोर संत मंडळींनी संतांविषयी काय म्हटले ते बघितले म्हणजे संत कोण आणि इतर मंडळी कोण हे लक्षात येते. शाश्वत काय अशाश्वत काय, सत् काय असत् काय, क्षणभंगुर काय, चिरकाल टिकणारे काय याचा निवाडा निश्चितपणे जो करतो तो संत.

चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव ।
तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ दा. ६-१-१७
जो जनामधें वागे । परि जनावेगळी गोष्टी सांगे ।

ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ।। दा. ६-१-१८

लोकांमध्ये असलो की आपण सहजच संसाराच्या गोष्टी बोलायला लागतो. संत तो जो जनामध्ये राहतो, त्यांच्यासारखाच दिसतो. तथापि तो अशा गोष्टी करत नाही. रामकृष्ण परमहंस म्हणत, “माझ्या साधकावस्थेमध्ये कोणी संसाराच्या गोष्टी करू लागला की माझ्या डोक्यात काठी मारल्यासारखे वाटत असे.” संसाराच्या त्याच त्याच गोष्टी बोलून लोकांना कंटाळा कसा येत नाही? म्हणजे संत संसारात असतात, पण संसाराच्या गोष्टीत रमत नाहीत असे दिसते. समर्थांनी स्पष्ट शब्दात संतांची लक्षणे दिली आहेत. ज्ञानेश्वर महाराजांनीही संतांची लक्षणे दिली आहेत. पण त्यांची भाषा कळणे अवघड.

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचे गांव ।

बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।। ज्ञा. १८-१७९८

हे सगळे संतांचेच वर्णन आहे. पण –

जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिजे संत ।

या साध्या भाषेत आपल्याला संत कळतात. दासबोध हा ग्रंथ साधकांना अत्यंत जवळचा आहे. बद्ध कोण ते नेमके सांगितले आहे.

हाती द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्वकाळ ।

सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ।। दा. ५-७-३९

या लक्षणात आपण बरोबर सापडतो.

अवगुणाचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग ।

तयासि बोलिजे मग । साधक ऐसा ।। दा. ५-९-२

जो संतांसि शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।

मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं ।। दा. ५-९-३

उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।

दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक ।। दा. ५-९-४

सगळे आपल्या स्वतःला साधकच समजतात. पण ते खरे नाही. अवगुणांचा संपूर्ण त्याग झाल्याशिवाय तो साधक होऊच शकत नाही. समर्थांच्या दासबोधावरून हे कळते. म्हणून हा ग्रंथ पुन्हापुन्हा वाचावा, त्याचा अभ्यास करावा. त्यात जे सांगितले आहे ते अंतःकरणात

मुरवण्यासाठी पुन्हापुन्हा त्याची आवृत्ति करावी. असे ग्रंथ एकदाच ऐकून, वाचून भागत नाही. काही मंडळी म्हणतात की आम्ही दासबोध, ज्ञानेश्वरी एकदा वाचून टाकली. पण हे ग्रंथ नुसते वाचून टाकण्यासारखे नाहीत. ते वाचायचे, त्याचे चिंतन करायचे आणि त्यामध्ये सांगितले तसे होण्याचा आपण प्रयत्न करायचा. ही अती अवघड गोष्ट आहे. एऱ्हवी 'आवृत्तिरसकृदुपदेशात्' असे ब्रह्मसूत्रांनी कशाला सांगितले असते! उपनिषदात ऋषिमुनींनी, भगवद्गीतेत भगवंतांनी, ज्ञानेश्वरीत ज्ञानदेवांनी, दासबोधात समर्थांनी, गाथेत तुकोबांनी, भागवतात नाथांनी सांगितले त्याच्या पुन्हापुन्हा आवृत्त्या कराव्यात.

सेविलेंच सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ।। दा. ७-८-४७

तेच तेच काय ऐकायचे असे म्हणणे बरोबर नाही. आपण परमेश्वरस्वरूप झाल्यावर मग नाही ऐकले तर एक वेळ चालेल. पण १९६८ मध्ये मी प्रथम पांवसला गेलो तेव्हा पू. स्वामी स्वरूपानंद प्रवचन ऐकायला बसले होते. ज्ञानेश्वर महाराज ज्ञानेश्वरी सांगत होते, तेव्हा निवृत्तिनाथ ऐकायला बसत होते. म्हणजे निवृत्तिनाथांनादेखील पुन्हापुन्हा ऐकावेसे वाटत होते. तेव्हा हे ग्रंथ वाचून टाकले, ऐकून सोडले असे म्हणणे बरोबर नाही. संसाराला जसे आपण पक्के धरून ठेवतो तसे परमार्थाला आपण धरत नाही. 'बघू या, जमले तर करू' असे म्हटले तर आपण आत्मरूप होऊ शकत नाही. संतांना आपल्याकडून असे अभिप्रेत आहे की आपण शुद्ध परमार्थी व्हावे.

देह परमार्थीं लाविलें । तरीच याचें सार्थक जालें ।
नाहीं तरी हे वेर्थचि गेलें । नाना आघातें मृत्यपंथें ।। दा. १-१०-६१

देह परमार्थाला लावला तर त्याचे सार्थक झाले. नाहीतर देह हे काळाचे भक्ष्य आहे. तो केव्हातरी जाणारच आहे.

देह जाईल जाईल । यासी काळ बा खाईल ।
कां रे नुमजसी दगडा । कैंचे हत्ती घोडे वाडा ।।

संतांनी आपल्याला 'दगड' म्हटले. इतके का आपण दगड आहोत! जी मंडळी साधना करतात, सद्ग्रंथांचे श्रवण करतात, पुन्हापुन्हा त्याची

आवृत्ति करतात ती तदाकार होण्याचा प्रयत्न करतात. 'चिंतने चिंतने तद्रूपता' चिंतन करत तो जीव परमात्म्याशी एकरूपच होऊन जातो; आणि स्वयमेव समर्थ, नाथ, तुकोबाच होतो. असा हा दासबोध ग्रंथ आहे.

वीस दशक दासबोध । श्रवणद्वारें घेतां शोध ।
मननकर्त्यास विशद । परमार्थ होतो ।। दा. २०-१०-३१
वीस दशक दोनीसें समास । साधकें पाहावें सावकाश ।
विवरतां विशेषाविशेष । कळों लागे ।। दा. २०-१०-३२

दासबोध ग्रंथाचे श्रवण केल्याने काय होते त्याचे वर्णन करताना समर्थ म्हणतात.

आतां श्रवण केलियाचें फळ । क्रिया पालटे तत्काळ ।
तुटे संशयाचें मूळ । येकसरां ।। दा. १-१-२८
मार्ग सांपडे सुगम । न लगे साधन दुर्गम ।
सायोज्यमुक्तीचें वर्म । ठाईं पडे ।। दा. १-१-२९
नासे अज्ञान दुःख भ्रांती । शीघ्रचि येथें ज्ञानप्राप्ती ।
ऐसी आहे फळश्रुती । ईये ग्रंथीं ।। दा. १-१-३०

असा हा ग्रंथ आहे. समर्थांचे या महाराष्ट्रावर महान उपकार आहेत. परमार्थ आणि व्यवहार याची त्यांनी सुंदर सांगड घालून दिली आहे. ज्ञानोबा म्हणतात –

जयां ऐहिक धड नाहीं । तयाचें परत्र पुससी काई ।

ऐहिक संसारदेखील ज्याला धड करता येत नाही असा जो अवलक्षणी मनुष्य आहे, तो जर परमार्थाच्या मोठ्या गोष्टी नुसत्या तोंडाने बोलू लागला तर काय उपयोग आहे! ज्ञानेश्वर महाराजांनी हे पुन्हापुन्हा स्पष्ट केले आहे.

देहातीत वस्तु आहे । तें तू परब्रह्म पाहे ।
देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ।।

दासबोधाच्या आठव्या दशकातील आठव्या समासातील ही ओवी आहे. अतिशय महत्त्वाची ओवी आहे. आठवा दशक हा ज्ञानदशक आहे. त्यातील आठवा समास हा आत्मदर्शन निरूपण समास. पूर्ण ज्ञानाचा हा समास आहे. त्यातील ही अप्रतीम ओवी आहे. या ओवीवरून लक्षात येते

की समर्थ कोणत्या बोधाच्या पातळीवर गेले होते. 'देहातीत वस्तु आहे' समर्थ प्रथमच सांगतात की देहाच्या पलिकडे अशी एक वस्तु आहे. सूक्ष्म वस्तु ग्रहण करायला बुद्धि अति सूक्ष्म लागते. स्थूल बुद्धीला हा विषय ग्रहणच होत नाही. सामान्य विषयाचे ज्ञानदेखील अजबच असते. एकाला विचारले, "पांडव किती?" त्याने सांगितले, "बाजेच्या खुराइतके तीन आणि बोटे दाखवली दोन. म्हणजे काहीच माहिती नाही. स्थूल दृष्टीला जे दिसते त्याविषयी देखील आपण किती गोंधळ करतो हे लक्षात येते. साधा संसार करायचा, पण तोदेखील नाना प्रकारचे गोंधळ केल्याखेरीज होत नाही; आणि संत तर म्हणतात की केवळ संसार करण्यासाठी हा नरजन्म नाही. केवळ संसार केल्याने नरजन्माचे सार्थक होते असे कोणाही विचारवंताने म्हटलेले नाही.

देह, देहविषयक सगळ्या गोष्टी या प्रत्येकाला करायला पाहिजेत. पण त्या करत असताना त्यातील सुखदुःखे भोगत असताना या देहाच्या, सुखदुःखाच्या पलिकडे परमात्मा या नांवाची एक वस्तु आहे. त्या परमात्म्याची आपण ओळख करून घ्यायला पाहिजे. तो परमात्मा अचल, सनातन, सच्चिदानंदरूप आहे; आणि तत्त्वतः तोच तू आहेस. सर्व विचारवंतांनी, साधुसंतांनी एकमुखाने हेच सांगितले आहे की 'देहातीत वस्तु आहे'. पण अशी काही वस्तु असेल याची बहुधा कोणाला कल्पनाच नसते. लोकांना वाटते की हा एक जन्म संपला की संपले. आता कसली वस्तु? पण स्थूल देह येथेच संपतो, तसा लिंग देह येथेच संपत नाही. तसा संपला असता तर बरे झाले असते. पण तसे होत नाही.

आपण जन्मभर जे जे काही केले असेल – हाताने, पायाने, डोळ्याने, जिभेने – जे पाहिले, खाल्ले, बोलले असेल ते सर्व सूक्ष्म इंद्रियांवर, लिंगदेहावर परिणाम करून राहतात आणि मग तो जीव कृतकर्माप्रमाणे उर्ध्व किंवा अधोगतीला जातो. म्हणून परमेश्वराला स्मरावे. परमेश्वराची उपासना करावी. एवढाच जन्म असता तर 'ऋणं कृत्वा घृतं पिबेत्' असे झाले असते. मग कुणाचाही गळा दाबा, कुणालाही लुबाडा आपली तुंबडी भरली म्हणजे झाले. पण तसे ते नाही. प्रत्येकाला कृतकर्माचा झाडा द्यावा लागतो. तो झाडा दिल्याखेरीज कुणी सुटणार

नाही. या स्थूल देहाच्या पलिकडे सूक्ष्म देह आहे, कारण देह, महाकारण देह आहे आणि या चारही देहाचे निरसन केल्यानंतर आत्मा या नांवाची वस्तू आहे. कशावरून आहे? याज्ञवल्क्य, वाल्मिकि, सगळे आचार्य, ज्ञानदेव, समर्थ यांच्यासारखी थोर थोर मंडळी सांगत असताना आपल्याला शंका कशाला? चारही देहांचे निरसन झाल्यानंतर देहातीत अशी एक वस्तु आहे. तो आत्मा आहे. त्यालाच परमात्मा म्हणतात. पण आपल्याला त्याच्याशी काय करायचे? समर्थ म्हणतात –

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।

त्या परब्रह्माकडे तू पहा. कसे पहायचे? दासबोध, ज्ञानेश्वरी, इतर दृश्य वस्तु पाहता येतात. पण

दृश्यते त्वग्र्यया बुद्धया सूक्ष्मया सूक्ष्मदर्शिभिः ।

असे ज्याला उपनिषदांनी म्हटले त्याला पहायचे कसे?

आत्मारेवा द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः ।

त्या सच्चिदानंद परमात्म्याला पहायला पाहिजे. त्याखेरीज आपले जीवन सफल होत नाही. तेथे पोचल्याखेरीज आपले जीवन धन्य होत नाही, आपण सच्चिदानंद होत नाही. आपल्याला आपला आनंद प्राप्त करून घ्यायचा असेल तर त्यासाठी हे करायला पाहिजे.

न संदृशे तिष्ठति रूपमस्य न चक्षुषा पश्यति कश्चनैनम् ।

हृदा मनीषा मनसाभिक्लृप्तो य एतद् विदुरमृतास्ते भवन्ति ॥

परमात्मा हा डोळ्याने पाहण्याचा, कानाने ऐकण्याचा विषय नाही. डोळे कान बंद करून अंतर्मुख होऊन जो याला पाहील, याचा अर्थ असा की जो याच्याशी सोऽहं बोधाने तदाकार होईल तोच त्या परमात्म्याला पाहू शकेल. बहिर्मुख होऊन त्याला पाहता येणार नाही. बाहेर दिसते ती प्रत्येकाची प्रकृति. काळा-गोरा, स्त्री-पुरुष, माझा-तुझा हे दिसते. परमात्मा दिसतच नाही. प्रकृतीच दिसते. भगवंताची गुणमयी माया दिसते. भगवंत दिसतच नाही. परमात्म्याला प्रथम डोळे मिटून आत पहायला लागते. त्यासाठी सगळ्या इंद्रियांची, मनाची बाहेरची धाव बंद करून अंतर्मुख होऊन शांतपणे तो सच्चिदानंद स्वरूप परमात्माच मी आहे या बोधामध्ये बसायला लागते. हळूहळू आपल्या मनाच्या सगळ्या वृत्ती लीन व्हायला

लागतात. त्यानंतर त्या परमात्म्याचे दर्शन होते.

प्रथम स्वरूपसमाधान । पावोनि ठेला अर्जुन ।
सवेचि उघडी लोचन । तंव विश्वरूप देखे ।। ज्ञा. ११-१९५

प्रथम स्वरूपाचे समाधान – स्वरूपानंद. मग डोळे उघडून जगाकडे पहायला लागल्यावर त्या व्यक्तीची प्रकृति बाजूला होते आणि सर्व ठिकाणी एकच सच्चिदानंद घन आत्मा अखंड, अफूट भरून आहे हे लक्षात येते. पण जर स्वरूपाचे समाधान होण्यापूर्वीच डोळे उघडे ठेवून बाहेर बघायला लागलो तर विश्व, संसार, माणसे दिसायला लागतील. परमात्मा दिसणार नाही. स्थूल गोष्टी पहायला बुद्धि लागत नाही. पण सूक्ष्म परमात्मा जर पहायचा असेल तर त्याचा मार्ग काय?

पराञ्चि खानि व्यतृणत् स्वयंभूः ।
तस्मात् पराङ् पश्यति नान्तरात्मन् ।।
कश्चिद्धीरः प्रत्यगात्मानमैक्ष – ।
दावृत्त चक्षुरमृतत्वमिच्छन् ।। कठोपनिषद्

या इंद्रियांची स्वाभाविक धाव बाहेर असते. क्वचित् कोणी एखादा बाहेरून दृष्टि आत वळवतो. त्या मनुष्याला हा दिसतो.

न चक्षुषा गृह्यते नापि वाचा नान्यैर्देवैस्तपसा कर्मणा वा ।
ज्ञानप्रसादेन विशुद्धसत्त्वस्ततस्तु तं पश्यते निष्कलं ध्यायमानः ।।

डोळ्याने, वाणीने, इंद्रियाने, तपाने अथवा कर्माने त्या परमात्म्याला पाहता येत नाही. परंतु ज्ञानाच्या प्रसादाने निर्मल व प्रसन्न झालेल्या मनाने हा परिपूर्ण असलेला परमात्मा पाहता येतो. या ठिकाणी पाहणे ही क्रिया, मी पाहणारा, ज्याला पहायचे ती एक माझ्याखेरीज दुसरी वस्तु अशी त्रिपुटी नष्ट होते आणि ज्याला पहायचे तो आणि पाहणारा एकरूप होऊन जातात. अशा अर्थाने 'दृश्यते' 'पश्यते' हे शब्द आलेले आहेत.

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।

देहातीत जी वस्तु आहे तिचे अनुसंधान तू कर असे समर्थ सांगतात. घरदार, पैसा, संसार याचे चिंतन पुरे. हे सर्व असले तर असू दे. पण त्याचे ममत्व नसावे.

माथां प्रपंचाचें वोझें । घेऊन म्हणे माझें माझें ।

बुडतांहि न सोडी फुंजे । कुळाभिमानें ।। दा. ३-१०-६

हे मी, माझे सोड आणि त्या देहातीत परमात्म्याचे अनुसंधान कर. कसे करशील? मी देह नाही, मन नाही, बुद्धि नाही. त्या देह मन बुद्धीच्या अतीत जो परमात्मा आहे त्याला तू पहा. त्याचे अनुसंधान ठेव.

इन्द्रियाणि पराण्याहुरिन्द्रियेभ्यः परं मनः ।

मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ।। भ. गीता ३-४२

परमात्मा जसा सच्चिदानंद तसा जीवही सच्चिदानंद. परंतु जीवाने मी देह, मन, बुद्धि आहे असे आपल्यावर आरोपित करून घेतले आहे. वस्तुतः मनाच्या कोणत्याही व्यापाराशी, बुद्धीच्या कोणत्याही निश्चयासी तत्त्वतः माझा कोणताही संबंध नाही. देहाच्या सगळ्या हालचाली माझ्याशी यत्किंचित्देखील संबंध न ठेवता होतात. मी केवळ त्याचा साक्षी, द्रष्टा, प्रकाशक आहे. मला कळल्याशिवाय कोणतीही हालचाल होऊ शकत नाही. मी हात ठेवला, उचलला मला कळते. मी डोळे मिटले, उघडले मला कळते. हा कळणारा जो आहे तो केवळ या सगळ्या ज्ञान अज्ञानाच्या पलिकडला ज्ञप्तिमात्र परमात्मा तोच मी सच्चिदानंद आहे. त्याचे अनुसंधान बाहेरून आत जाऊन करावयाचे आहे. किती वेळ करायचे असे विचारू नका. जितका वेळ असेल तितका वेळ करावे. सकाळ, दुपार, संध्याकाळ, एका वेळेला एक दोन तास बसता आले तर बसावे.

नित्य नेम प्रातःकाळीं । माध्यानकाळीं सायंकाळीं ।

नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ।। ४-३-३

संसार किती वर्षे करतो? वयाची साठी सत्तरी ओलांडली तरी संसारातून मन बाहेर पडत नाही. त्यामुळे अगदी आपल्या जवळ असलेला परमात्मा आपल्याला दिसत नाही. त्याचे अनुसंधान बळेच करावे म्हटले तरी ते होत नाही. मी सच्चिदानंद हा बोध होत नाही.

पाहे पां दूध पवित्र आणि गोड । पासी त्वचेचिया पदराआड ।

परि ते अव्हेरूनि गोचिड । अशुद्ध काय न सेविती? ।। ज्ञा. ९-५७

संत आपल्याला दगड, गोचीड काय काय म्हणतात. पण शंभरात नव्याण्णव लोकांची हीच परिस्थिती आहे. जो परमार्थ करतो तो धन्य. जो मुखाने 'राम राम,' 'कृष्ण कृष्ण,' 'विठ्ठल विठ्ठल,' म्हणतो, 'सोऽहं

सोऽहं' करतो त्याचा अर्थ त्याला परमेश्वर पाहिजे आहे. पण त्याला परमेश्वराचे नेमके ठिकाण माहिती नाही. ते ठिकाण आहे हृदय.

तैसा हृदयामध्यें मी रामु । असतां सर्वसुखाचा आरामु ।
कीं भ्रांतासी कामु । विषयावरी ॥ ज्ञा. ९-६०

तो आतच आहे. परमेश्वर इतका जवळ असून दूर झालेला आहे.

बहिरन्तश्च भूतानामचरं चरमेव च ।
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चान्तिके च तत् ॥ भ. गीता १३-१५
अविद्याकल्पित नामरूपवर्ण विशेषाकार अपहृत बुद्धिवात् ।

नाम, रूप, वर्ण, आकार यांनी अपहृत बुद्धि झाल्यामुळे अत्यंत जवळ असणारा हा आत्माराम दूर आहे, परका आहे असे वाटते. वस्तुतः त्याच्या इतका जवळ कोणी नाही. आपला देहही त्याच्या जवळ नाही. आपणच ते आहोत तत्त्वतः! एकदा 'तोच मी' असे म्हटले की वस्तुतः तसे व्हायला पाहिजे. पण ते होत नाही. म्हणून पुन्हापुन्हा घोकायचे. 'सः अहं' मनात येते की तो 'सः' केवढा आणि 'मी अहं' केवढासा! हो. पण शंभर भार सोने आणि गुंजभर सोने हे जसे तत्त्वतः एक, तरंग लहान, पण सागर आणि तरंग एक, तसा जीव अल्पज्ञ, अल्पशक्तिमान तरी तो व्यापक परमात्म्याशी तत्त्वतः एकरूप आहे. जो जीव तसा एकरूप झाला, तो सुटला.

आपले सारखे देहाकडे अनुसंधान आहे. मला काय पाहिजे याचाच विचार. जरा देहाला काही झाले की चिंता. मग डॉक्टर, औषधे सुरू. पण संत सारखे तळमळून सांगतात त्या परमार्थाच्या वाटेला आपण अजून लागलो नाही, याची खंत नाही. परमात्मा ही वस्तू ज्या ज्ञानाने दिसते ते खरे ज्ञान. बाकी सर्व अज्ञान. आपले परमात्म्याकडे लक्षच नाही.

देहातीत वस्तू आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।
देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ॥

तू विदेही आहेस. या देहामध्ये वस्तीकर आहेस. भगवंत म्हणतात – 'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ।'

मीच तो प्रत्यक्ष या देहामध्ये वस्तीकर झालेलो आहे. त्याचाच अंश. तोच तो. जसे सूर्याचे प्रतिबिंब आणि सूर्य यात काही फरक नाही, तसा

जीव देहाच्या उपाधीने नटलेला आहे. म्हणून त्याला अंश म्हणावे. वस्तुतः आपण स्वयमेव आत्माराम असताना त्या आत्मारामाकडे पाठ फिरवून जन्मभर आपण जेवढे व्यवहार केले तेवढे सगळे वाया गेले. समर्थ म्हणतात –

जन्मदारभ्य आठवावें । म्हणिजे अवघें पडेल ठावें ।
नाना दुःख मोजावें । काये म्हणोनी ।। दा. १७-६-८

आयुष्य हळूहळू नष्ट होत जाते.

आयुर्नश्यति पश्यतां प्रतिदिनं याति क्षयं यौवनं
प्रत्यायान्ति गताः पुनर्न दिवसाः कालो जगद्भक्षकः ।
लक्ष्मीस्तोयतरङ्गभङ्गचपला विद्युच्चलं जीवितं
तस्मान्मां शरणागतं शरणद त्वं रक्ष रक्षाधुना ।।

परमेश्वरा! तू माझे रक्षण कर. मी तुला शरण आलेलो आहे. माझे सगळे आयुष्य नष्ट झाले आहे.

श्रीमदाद्यशंकराचार्य आपल्या चर्पटपञ्जरिकास्तोत्रात म्हणतात –

यावद्वित्तोपार्जनसक्तस् तावन्निजपरिवारो रक्तः ।
पश्चाद्धावति जर्जरदेहे वार्ता पृच्छति कोऽपि न गेहे ।।
जटिलो मुण्डी लुञ्चितकेशः काषायाम्बरबहुकृतवेषः ।।
पश्यन्नपि च न पश्यति मूढ उदरनिमित्तं बहुकृतवेषः ।।
भगवद्गीता किंचिदधीता गङ्गाजललवकणिका पीता ।
सकृदपि यस्य मुरारिसमर्चा तस्य यमः किं कुरुते चर्चाम् ।।
भज गोविन्दं भज गोविन्दं भज गोविन्दं मूढमते ।

ही थोर मंडळी आपल्याला मूढ म्हणतात.

संत सांगतात तसे अनुसंधान जर आपण ठेवले नाही तर काय होईल? काही नाही. इतरांसारखे खाणे पिणे, नाटक सिनेमा, गाणी सर्व विषय आपण भोगू शकतो. त्यात काही फरक पडत नाही. ज्ञानी पुरुषांना लोकात वावरत असताना ज्ञान असते की मीच सच्चिदानंद आहे. सामान्याना ते ज्ञान नसते. हा संत आणि सामान्य यातील फरक आहे. ज्ञान नसल्याने काय होते असा प्रश्न काही लोक विचारतात. काय होणार! जन्मभर सुखदुःखाच्या गटांगळ्या खात राहतात. मनाला शांती नाही. मन

सदा व्यग्र. कितीही पैसे असोत, आनंद नाही. याचे कारण त्यात परमार्थ मिसळला नाही. जर नाम घेत प्रपंच करता आला, 'तोच मी आहे' असे म्हणता आले, तशी बुद्धि झाली तर! समर्थ म्हणतात.

ज्याची बुद्धि होय ऐसी । वेद वर्णिती तयासी ।
शोधितां नाना शास्त्रांसी । न पडे ठाईं ।। दा. ८-८-२९
ऐश्वर्य ऐसें तत्वतां । बाणे देहबुद्धि सोडितां ।
देह मी ऐसें भावितां । अधोगती ।। दा. ८-८-३०

म्हणून देहातीत जो आहे तो आत्मा. त्याला पहावे. केवळ देहाकडे पाहून चालणार नाही. कोणी काळा असेल, कोणी गोरा असेल, कोणी उंच असेल, कोणी बुटका असेल, ही सगळी उपाधी सोडून द्यावी. एवढेच नाही तर देह मन बुद्धि हीदेखील उपाधी सोडून द्यावी. कारण कोणी प्रेमळ असेल, कोणी कठोर असेल, कोणी सुष्ट, कोणी दुष्ट, कोण अहंकारी, कोण निरहंकारी. या सगळ्या उपाधीच्या गोष्टी आहेत. त्याही सोडून द्याव्या; आणि अंतर्यामी निखळ सत्य, ज्ञान, अनंत स्वरूपात असा जो परमात्मा प्रत्येकाच्या अंतःकरणात वास करतो आहे त्याचे अनुसंधान ठेवावे. कसे अनुसंधान ठेवायचे? त्याला सुंदर उपमा दिली आहे ज्ञानेश्वर महाराजांनी! ते म्हणतात, "आरशामध्ये आपण बघायला लागलो की आरशाची काच बाजूला होते आणि आपली दृष्टि आपल्याला पाहते." आरशासमोर आपण उभे राहिलो की आपणच आपल्याला भेटतो. मधील काच निघून जाते. काच आपण पहात नाही. त्या काचेमधून आपण पाहतो. तसे कोणी व्यक्ति भेटली रे भेटली की त्याची जी उपाधी आहे ती सोडून तिच्यामधून तिच्या आत जे चैतन्य आहे त्याची भेट होते.

या उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे सर्वगत ।
तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ।। ज्ञा. २-१२६

बाकी सगळी उपाधी नष्ट होते.

तसे कोणीही व्यक्ति भेटली की मीच चैतन्यरूप परमात्मा त्या चैतन्यरूप परमात्म्याला भेटतो आहे असा बोध होतो. एवढे हे सोपे आहे.

जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत ।
हा भक्तियोगु निश्चित । जाण माझा ।। ज्ञा. १०-१८

पण आपल्याला भूतेच दिसतात. भगवंत दिसतच नाही. जर सुनेला वाटेल की आपली सासू ही भगवंत आहे आणि सासूला वाटेल की आपली सून ही भगवंत आहे, तर! पतीला वाटेल आपली पत्नी ही भगवत्स्वरूप आहे आणि पत्नीला वाटेल आपला पती भगवत्स्वरूप आहे, तर! पूर्वी आपल्या भारतीय संस्कृतीत पत्नी पतीला 'आर्य' म्हणत असे आणि पती पत्नीला 'देवी' म्हणत असे. आता उपनिषदे, भगवद्गीता, ज्ञानेश्वरी, दासबोध या ग्रंथातून जो शुद्ध परमार्थ सांगितला आहे त्यापासून आपण च्युत झालो आहोत. खूप खाली आलो आहोत.

'देहातीत वस्तु आहे' ज्याला ती सापडली, ज्याने ती जाणली, तो शाश्वत सुखाचा धनी झाला. मेहेरबाबा म्हणत I am not this body form. I am the ancient one. मीच तो सनातन पुरुष आहे. स्वामी स्वरूपानंद कदापि देहदुःखाने दुःखित झाले नाहीत किंवा कोणत्या सुखाची इच्छा त्यांनी केली नाही. ते म्हणत देहाच्या सुखदुःखापलिकडे एक वेगळे सुख आहे, एक आनंद आहे.

जो ते आत्यंतिक सुख जाणू शकतो, ज्याचे त्याला ज्ञान होते तो स्वयमेव ब्रह्मच होऊन जातो. 'ब्रह्मविद् ब्रह्मैव भवति'. एवढी मोठी स्थिती या नरदेहात प्राप्त होणे आपल्यापैकी कोणालाही शक्य आहे. ज्यांना ही स्थिती प्राप्त झाली त्या समर्थांचेच हे उद्गार आहेत. 'ऐश्वर्य ऐसे तत्त्वता । बाणे देहबुद्धि सोडता ।' तुला ऐश्वर्य पाहिजे ना! मग ऐश्वर्य देहबुद्धि सोडून मिळते. पैशाचे ऐश्वर्य नाही. स्थूल गुणांचेही ऐश्वर्य नाही. तर भक्त जेव्हा भगवंताशी एकरूप होऊन जातो तेव्हा भगवंताचे सारे ऐश्वर्य त्याचे होते. जेवढे लोक विठ्ठलाच्या पायावर डोके ठेवतात, त्यापेक्षा अधिक लोक ज्ञानेश्वरांच्या पायावर डोके ठेवतात. जेवढा महिमा पंढरीचा तेवढाच महिमा आळंदीचा. कशासाठी आळंदीचा महिमा? भक्तराज ज्ञानदेव तेथे आहेत. कशाने ते भक्तराज झाले? देह मन बुद्धीच्या पलीकडील परमात्मा त्यांनी ठाई पाडून घेतला. 'याचि देही याचि डोळा पाहे भक्तीचा सोहळा' हे आपल्यापैकी कोणाही साधकाला शक्य आहे. अशक्य गोष्ट संतांनी सांगितली नाही.

प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् । हे प्रत्यक्ष करण्यासारखे

आहे. करायला सुखावह आणि आनंदरूप आहे. ध्यान करताना काही दुःख नाही. उलट ध्यानाने मन शांत होते. एक दीड तास ध्यानाला बसल्यानंतर मन आनंदरूप होऊन जाते. आपण त्या सच्चिदानंद प्रभूशी एकरूप होऊन जातो. सगळे जग विसरून जातो.

सत्य ज्ञानानंत गगनाचे प्रावर्ण । नाहीं रूप वर्ण गुण जेथे ।
तो हा श्रीहरी पाहिला विटेवरी । पाहते पाहणें दुरी सारोनिया ।।
वाचेचा उच्चार न चले साचार । स्वरूप निर्विकार कोंदाटले ।।
नामदेव म्हणे ज्योतीची निजज्योती । ते हे उभी मूर्ति विटेवरी ।।

ही ज्योतीची निजज्योती, त्या प्रकाशाचा प्रकाश 'तस्य भासा सर्वमिदं विभाति' त्याच्या प्रकाशाने हे सर्व प्रकाशित झाले आहे. त्याच्या प्रकाशाने आपल्याला प्रकाशही कळतो आणि अंधकारही कळतो. आपण म्हणतो काय गडद अंधकार आहे, मी दिसतच नाही. अमृतानुभव ग्रंथात नाना प्रकारांनी हे सांगितले आहे. एक लाकुडतोड्या दुपारी चार वाजता रानात गेला. दोन तीन तास लाकडे तोडून दमला. जरा विश्रांती घ्यावी म्हणून पडला, तो त्याला गाढ झोप लागली. तो झोपला हे सांगायला तेथे कोणी नाही. त्याला स्वतःचा आठव नाही की मी आहे म्हणून. मग आता तो आहे की नाही? कोणत्या रूपाने आहे? आता देह मन बुद्धि सगळे लीन झाले आहेत.

जो निरंजनीं निदेला । तो आणिकीं नाहीं देखिला ।
आपुलाहि निमाला । आठवु तया ।। अमृतानुभव ४-३३

मग अशा स्थितीत तो आहे की नाही? आहे. तो स्वरूपाने आहे. निद्रेमध्ये हे लक्षात येत नाही की मी स्वरूपाने आहे. मला गाढ झोप लागली होती एवढेच नंतर लक्षात येते आणि समाधि अवस्थेत लक्षात येते की मी निखळ स्वरूप आहे. मीच सच्चिदानंद ब्रह्म आहे. मला सुख दुःख, निंदा स्तुती, पाप पुण्य नाही.

न पुण्यं न पापं न सौख्यं न दुःखं ।
न मन्त्रो न तीर्थं न वेदा न यज्ञाः ।
अहं भोजनं नैव भोज्यं न भोक्ता ।
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।।

अहं निर्विकल्पो निराकाररूपो ।
विभुर्व्याप्य सर्वत्र सर्वेन्द्रियाणि ।
सदा मे समत्वं न मुक्तिर्न बन्ध - ।
चिदानन्दरूपः शिवोऽहं शिवोऽहम् ।।

असा सच्चिदानंदरूपाने तो अखंड राहतो. ही ती 'देहातीत वस्तु' आहे. जेथे देह मन बुद्धि नाही अशी ही अवस्था. सुषुप्तीकाली देखील ही अवस्था आपल्या लक्षात येते. त्यावेळी आपण देहाच्या अतीत असू शकतो. फक्त आपला आठव त्यावेळी आपल्याला नसतो. पण आपला आठव राहील आणि देहातीत आपण होऊ अशी समाधि अवस्था जर कुणाला प्राप्त होईल तर समर्थांची ओवी आपल्या प्रत्ययाला येईल.

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।

तू त्याचे अनुसंधान कर. कसे करशील? 'राम राम' 'विठ्ठल विठ्ठल' म्हण. 'माझ्या जीवीची आवडी । पंढरपुरा नेईन गुढी ।' असे मोठ्याने म्हणत, नाचत गात पंढरी आळंदी करत असला तरी ही स्थिती प्राप्त होईल. देहभाव ज्या योगे जिरून जातो. नष्ट होतो अशा कोणत्याही साधनेमध्ये तुम्ही असा. आपण सगळे करतो, पण देहभावासहित ते होते, आणि ही तर देहातीत वस्तु आहे. आपल्याला पुन्हापुन्हा देहभावाचा आठव होतो. ध्यानाला बसल्याबरोबर जरा कसला आवाज घरात झाला की ह्यांचे बिनसले. पत्नीवर, मुलांवर रागवायला सुरवात. 'मी ध्यान करतो आहे. कळत नाही का तुम्हाला?' ध्यान करून काय उपयोग? सारखा देहभावावर असतोस? म्हणजे देहभाव किती बळकट असतो पहा.

अनुसंधान करण्यासारखी एकच गोष्ट या जगात आहे

आत्मारेवा द्रष्टव्यः श्रोतव्यो मन्तव्यो निदिध्यासितव्यः ।

एकच आत्मा आहे. त्याचा निदिध्यास घ्यावा. पैसा, मानमरातब यासारख्या गोष्टींचा निदिध्यास घ्यायचा नाही.

आम्ही तरी आस । झालों टाकोनि उदास ।।१।।
आता कोण भय धरी । पुढें मरणाचें हरी ।।२।।
भलते ठायीं पडों । देह तुरंगीं हा चढों ।।३।।
तुमचें तुम्हांपाशीं । आम्ही आहों जैसीं तैसीं ।।४।।

गेले मानामान । सुखदुःखाचें खंडन ।।५।।

तुका म्हणे चित्तीं । नाहीं वागवीत खंती ।।६।।

गादीवर बसून प्रवचन केले अथवा दगडावर बसून प्रवचन केले तर प्रवचनात फरक काय पडणार? मान अपमान या वरवरच्या गोष्टी आहेत. या मनाला तशी काही किंमत नाही. काशीमध्ये नाथ महाराजांना म्हटले, "एवढे सुंदर रामायण आपण लिहिले. तेव्हा या रामायण ग्रंथासह आपली हत्तीवरून मिरवणूक काढू या." त्यावर नाथ म्हणाले, "या रामायणाचे खरे महत्त्व आहे. तो ग्रंथ हत्तीवर ठेवू या. मी तुमच्या बरोबर चालत त्याच्या पाठीमागून येईन."

संतांनी हा देहभाव झडझडून टाकलेला असतो.

तरि झडझडोनि वहिला निघ । इये भक्तीचिये वाटे लाग ।

जिया पावसी अव्यंग । निजधाम माझें ।। ज्ञा. ९-५१६

भक्तीसंबंधी सांगताना समर्थांनी दासबोधात एक श्लोक घेतला आहे.

श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनम् ।

अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ।।

नवमी भक्ति आत्मनिवेदन ।

न होतां न चुके जन्ममरण । दा. ४-९-२५

समर्थांनी स्पष्ट सांगितले –

आत्मनिवेदनाचे लक्षण । आधीं पाहावें मी कोण ।

मग परमात्मा निर्गुण । तो वोळखावा ।। दा. ८-८-१३

रमण महर्षि म्हणतात, "Find out who am I? मी कोण ते शोधून काढा." मग परमात्मा आणि मी दोन्ही सच्चिदानंद. तीच ती आत्मवस्तु असे सारखे अनुसंधान ठेवा. तू विदेही आहेस. तुला देहाची आसक्ति, देहाचा संग शोभत नाही अशी ही ओवी आहे.

देहातीत वस्तु आहे । तें तूं परब्रह्म पाहे ।

देहसंग हा न साहे । तुज विदेहासी ।।

जो कोणी जनकासमान विदेही झाला तो या सगळ्या जगाचे वैभव भोगत राहतो, तो निष्काम असतो.

काम नाहीं काम नाहीं । झालों पाहीं रिकामा ।।१।।

फावल्या त्या करू चेष्टा । निश्चळ द्रष्टा बैसोनि ॥२॥
नसत्या छंदें नसत्या छंदें । जग विनोदें विव्हळतसे ॥३॥
एकाएकीं एकाएकीं । तुका लोकीं निराळा ॥४॥

असा तो असतो. कामनाच नाही कसली! निष्काम कर्मयोग. त्याची जी जी कर्मे असतात ती निष्काम असतात.

आपण देवापुढे हात जोडले की आपली मागण्यांची एक यादीच तयार असते. पत्नी आजारी आहे ती दुरुस्त होऊ दे. तिचे माझे जमत नाही ते जमू दे. मुले ऐकत नाहीत ती ऐकायला लागू देत. नाना प्रकारच्या प्रार्थना. भगवंतांनी यांच्यासाठी काय काय करायचे? आणि मग यांनी काय करायचे? एक कवडी द्यायची आणि त्या ब्राह्मणाकडून सगळ्यांची प्रायश्चित्ते करून घ्यायची. अशा प्रकारची कुविद्या बाजूला टाकली पाहिजे. ऐश्वर्य ते की ज्यावेळेला भगवन्नामसंकीर्तन मुखातून येते. ऐश्वर्य ते जेव्हा कोणी एखादा ध्यानाला बसतो. किती ध्यान लागले हे महत्त्वाचे नाही. कसे रामनाम घेतो हे महत्त्वाचे नाही. मुखाने रामनाम आले की तो मुक्त आहे. तो केव्हाना केव्हा तरी मुक्त होणार. 'देवाचिये द्वारी उभा क्षणभरी । तेणे मुक्ति चारी साधियेल्या ।' आपला संसार पाठीमागे टाकून क्षणभर हात जोडून जो देवापुढे उभा राहील तो केव्हा ना केव्हा चारही मुक्तींचा धनी झाल्याखेरीज राहणार नाही. तेव्हा अशी जी देहातीत वस्तु परमात्मा त्याचे सारखे अनुसंधान करावे. त्यानेच ऐश्वर्य प्राप्त होते, असे मोठ्या तळमळीने दासबोध, ज्ञानेश्वरी सारख्या ग्रंथातून संतांनी सांगितले आहे. तुकोबा म्हणतात,

याजसाठी केला होता अट्टाहास । शेवटचा दिस गोड व्हावा ॥१॥
आतां निश्चिंतीनें पावलो विसावा । खुंटलिया धांवा तृष्णेचिया ॥२॥
सार्थक वाटे झालिया वेंचाचें । नांव मंगळाचें तेणें गुणें ॥३॥
तुका म्हणे मुक्ति परिणिली नोवरी । आता दिवस चारी खेळमेळीं ॥४॥

कसे वैभव आहे बघा! अशा प्रकारचा भाव, असे ज्ञान, असा बोध आपल्या सगळ्यांना होऊ शकेल. आपण प्रयत्न मात्र जिद्दीने केले पाहिजेत. त्यासाठी संसार टाकून देण्याचे कारण नाही.

संसारत्याग न करितां । प्रपंच उपाधी न सांडितां ।

जनामध्यें सार्थकता । विचारेंचि होये ।। दा. ६-९-२४
तस्मात् विचार करावा । देव कोण तो ओळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ।। दा. ४-९-७

देव कसा आहे? सच्चिदानंद. सत् म्हणजे जन्ममरणरहित. चित् म्हणजे चैतन्यमय, जाणीवमय, आणि आनंदमय. 'तोच मी आहे' असा सोऽहं बोधाने पूर्ण बोध दृढ झाल्याबरोबर याच जन्मी मुक्तीचा सोहळा बघावा. आनंदनिर्भर जीवन जगावे. संसारही होतो आणि परमार्थही होतो. सहज होतो, काही अवघड नाही. तशी बुद्धि आपली होवो. समर्थांचा दासबोध आपण पुन्हापुन्हा वाचू या. मनन करू या आणि देहातीत वस्तु होऊन राहू या.

ॐ तत् सत्
जय जय रघुवीर समर्थ ।

●

।। श्री ।।
।। आरती श्रीसमर्थांची ।।

आरती रामदासा ।। सद्गुरु सर्वेशा ।
कायावाचामनोभावें । वोवाळूं परेशा ।।१।।
रामदास मूर्तिमंत । रामचंद्र अवतार ।
कलियुगीं अवतरोनी । केला भक्तांचा उद्धार ।
वैराग्य भक्ति ज्ञान । शांति क्षमा विरक्ती ।
विवेक सालंकृत । क्षमा दया सर्वभूतीं ।।३।।
सच्चिदानंदघन । रामदास केवळ ।
दिनकर कृपायोगें । रामचंद्र निर्मळ ।।४।।

।। श्रीरामचंद्रार्पणमस्तु ।।
।। जय जय रघुवीर समर्थ ।।